# उपनिषदांतील दहा गोष्टी

[ मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील विद्याखात्यांनीं हें पुस्तक शाळांकरितां मंजूर केलें आहे. ]

शंकर दत्तात्रय देव

सुलभ राष्ट्रीय ग्रन्थमाला–पुणें, पुष्प ८

# उपनिषदांतील दहा गोष्टी

—लेखक—
शंकर दत्तात्रय देव

शके १८५८ ] किंमत ६ आणे [ आवृत्ति २ री

मुद्रक

स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी.,

नवीन समर्थ विद्यालयाचा ‘ समर्थ भारत ’ छापखाना,

१४७ सदाशिव, पुणें २.

प्रकाशक

गो. वा. कुलकर्णी

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २.

# उपनिषद्विद्येंत प्रवेश

निरनिराळ्या उपनिषदांतील दहा सुंदर व बोधप्रद कथा या छोट्या पुस्तकांत सांगितलेल्या आहेत. हिंदुस्थानांतील आर्य लोकांच्या संस्कृतीचा पाया उपनिषत्कालांत घालण्यांत आला. खाणींतून काढलेला हिरा घेऊन त्यांला निरनिराळे पैलू पाडतात व नंतर त्याला कोंदण करून तो अंगावर धारण करतात, त्याचप्रमाणें निरनिराळे समाज आपल्यामध्यें जन्माला येणाऱ्या मुलांच्या मनांवर निरनिराळे संस्कार करून त्यांचें उपजत तेज अधिक खुलून दिसावें आणि त्यांच्यामुळें समाजाला शोभा यावी म्हणून प्रयत्न करीत असतात. हे सर्व संस्कार मिळून त्या समाजाची संस्कृति होत असते. प्रत्येक समाजांतील नव्या पिढीच्या नजरेसमोर पूर्वी होऊन गेलेल्या थोर व्यक्तींच्या चारित्र्याचे आदर्श ठेवण्यांत येत असतात. भरतखंडांतील आर्यांच्यापुढें हजारों वर्षे उपनिषत्कालीन ऋषी, त्या ऋषींचे आश्रम, त्यांतील ऋषिकुमार, ब्रह्मवेत्त्या आर्य स्त्रिया आणि त्या सर्वांचे ब्रह्मविद्येच्या संबंधींचे विचार व अनुभव हे ठेवण्यांत आलेले आहेत. आर्य संस्कृतीला आधारभूत असलेल्या या गोष्टींचा मुलांना लहान वयापासून परिचय व्हावा आणि उपनिषदें म्हणजे आहे तरी काय व त्यांत काय सांगितलें आहे याचें थोडेंसें ज्ञान त्यांना व्हावें म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांच्या मातापितरांनीं किंवा गुरुजींनीं थोडीशी मदत केल्यास या दहा गोष्टींपासून मुलांना बराच बोध होईल व उपनिषत्कालीन कांहीं थोर व्यक्तींचे विचार व स्वभाव यांचे त्यांच्या मनावर चांगलेच ठसे उमटतील अशी आशा आहे.

भारतीय आर्यांच्या संस्कृतीच्या मुळाशीं आपणांस चार पुरुषार्थ, चार वर्ण आणि चार आश्रम या कल्पना किंवा ध्येयें असलेलीं दिसतात. या सर्व कल्पनांशीं मुलांचा थोडक्यांत परिचय व्हावा अशी या पुस्तकाची योजना करण्याचा प्रयत्न केलेला आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करून घेतल्याखेरीज मनुष्याला खरें सुख प्राप्त होणार नाहीं,

व त्याचा सर्वांगीण विकास होणार नाहीं, हें भारतीय संस्कृतीचें आद्य तत्त्व आहे. अर्थ व काम या पुरुषार्थांसच व्यवहारांत संपत्ति व संतति असें म्हणतात. धर्म म्हणजे आपलें इतरांसंबंधींचें कर्तव्य. यांत सर्व सामाजिक कर्तव्यांचाहि समावेश होऊन शिवाय आत्मोन्नतीसाठीं अवश्य असणाऱ्या कर्तव्यांचाहि समावेश होतो. संपत्ति व संतति यांपासून मिळणाऱ्या सुखांचा उपभोग घेत असतां त्या सुखलालसेस कर्तव्यबुद्धीनें नियंत्रित केलें नाहीं तर समाजांत सर्वत्र गोंधळ माजेल व कोणासहि कोणताहि पुरुषार्थ साध्य करून घेतां येणारच नाहीं. शिवाय समाजभावनेमुळें जें विशिष्ट सुख मिळतें तेंहि प्राप्त होणार नाहीं. व्यक्तिधर्म, कुलधर्म, ग्रामधर्म किंवा स्थानधर्म, राष्ट्रधर्म, मानवधर्म आणि विश्वधर्म या शब्दांनीं व्यक्तीचें स्वत:संबंधींचें, आपल्या कुलासंबंधींचें, आपल्या स्थानासंबंधींचें, राष्ट्रासंबंधींचें, मानव-समाजासंबंधींचें व अखेरीस सर्व विश्वासंबंधींचें किंवा भूतमात्रासंबंधींचें कर्तव्य असा बोध होतो. या कर्तव्यासंबंधींच्या बाह्य कल्पना युगायुगानुसार बदलत असल्या तरी व्यक्तिहिताहून कुलहित, कुलहिताहून ग्रामहित, ग्रामहिताहून राष्ट्रहित, राष्ट्रहिताहून मानवहित किंवा विश्वहित, अधिकाधिक व्यापक व श्रेष्ठ आहेत ही कल्पना बदलण्याचें कारण नाहीं. तसेंच "सर्वेऽत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु । न कश्चिद्दुःखमाप्नुयात् ।। " म्हणजे सर्वांना सुख लागावें, सर्वांना आरोग्य व आयुष्य लाभावें, सर्वांचें कल्याण व्हावें व कोणासहि दुःख लागूं नये ही उपनिषद्मंत्रांत अगर प्रार्थनेंत व्यक्त झालेली धर्मभावना बदलत नाहीं, ती सनातनच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. **मला एकट्यालाच सुख लागावें ही बुद्धि जाऊन सर्वांना सुख लागावें ही बुद्धि जागृत होणें म्हणजेच धर्मबुद्धि जागृत होणें.** पाप व पुण्य या कल्पनांचेंहि खरें व शुद्ध स्वरूप याच धर्मबुद्धींत आहे. परोपकार म्हणजे पुण्य आणि परपीडा म्हणजे पाप ही मूलभूत कल्पना आहे. कशांत परोपकार आहे व कशांत परपीडा आहे याबद्दलच्या कल्पना मनुष्याच्या ज्ञानाबरोबर बदलतात व म्हणून एके काळीं पुण्य वाटणाऱ्या कृत्याला पुढें पाप मानण्यांत येतें. पण हा भेद सोडून दिला तर परोपकार व परपीडा या दोन शब्दांत पुण्य, पाप किंवा धर्म-अधर्म या कल्पना व्यक्त करतां येतील. ज्याप्रमाणें अग्नि मंद झाला

म्हणजे त्याच्यावर राख सांचते त्याप्रमाणें या पापपुण्याच्या व धर्माधर्माच्या कल्पनांवर पुष्कळ राख चढलेली आहे. ती फुंकून टाकून आंतील परोपकारबुद्धीचा, कर्तव्यबुद्धीचा अगर धर्मबुद्धीचा अग्नि प्रदीप्त केला पाहिजे.

अमुक गोष्ट केली असतां पुण्य लाभतें व तमुक गोष्ट केली असतां पाप लागतें, अशीं वाक्यें अगदीं लहानपणापासून मुलांच्या कानांवर घातलेलीं असतात. मुलांना त्या वाक्यांतील अर्थ चौकस बुद्धीला पटेल अशा रीतीनें समजून सांगितला पाहिजे. परपीडेचें पाप घडलें कीं अशा प्रत्येक कृत्याचा जो ठसा आपल्या अंतःकरणावर उमटतो तोच अर्थ पाप लागतें याचा आहे. कोणताहि वाईट विचार, वाईट भावना किंवा वाईट कृति यांचा संसर्ग मनाला झाला कीं जसा वस्त्राला माती लागली असतां डाग पडतो तसा मनुष्याच्या मनावर व एकंदर शीलावर त्याचा डाग लागतो. हा डाग इतरांना दिसला नाहीं तरी तो त्या मनुष्याचा अधःपात केल्याखेरीज—त्याच पापाकडे अधिक प्रवृत्ति केल्याखेरीज—राहत नाहीं. जसा मळलेलीं वस्त्रें घालणारा मनुष्य वाटेल त्या घाण ठिकाणीं बसण्यास मागेंपुढें पाहत नाहीं, किंबहुना त्याचें त्याला कांहींच वाटत नाहीं त्याचप्रमाणें पापविचारांनीं किंवा पापकर्मांनीं ज्याचें शील मलिन झालें आहे त्याला अधिक पापें करतांना लज्जा किंवा खेद वाटत नाहीं. याच्या उलट पुण्यविचार किंवा आचार यांची गोष्ट आहे. यांच्या योगानें मनुष्याचें शील अधिकाधिक निर्मल व शुद्ध बनूं लागतें. ज्याप्रमाणें शुभ्र वस्त्रें वापरण्याची संवय असलेल्या मनुष्यास त्यास थोडाहि डाग पडलेला खपत नाहीं त्याचप्रमाणें नेहमीं शुद्ध शील ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या मनुष्याला पापी विचार किंवा आचार यांचा संपर्कहि दुःसह होतो. मागें केलेल्या सदाचाराचें व सद्विचारांचें पुण्य त्याला लागलेलें असतें व तें त्याचें पुढील पापवृत्तीपासून संरक्षण करतें. तात्पर्य, पुण्य किंवा पाप लागतें याचा अर्थ मनुष्य जी जी वाईट बुद्धि, भावना किंवा कृति करतो तिचा संस्कार त्याच्या अंतरंगावर होतो व त्यामुळें त्याच्या भावी आयुष्यावर बरेवाईट परिणाम घडतात.

पाप किंवा अधर्म यांपासून मनुष्याला अलिप्त राहावयाचें असल्यास त्याला केवळ पाप काय, पुण्य काय, धर्म कोणता, अधर्म कोणता किंवा सत्

काय, असत् काय एवढें बुद्धीनें कळून भागत नाहीं. हें कळून त्याप्रमाणें वर्तन किंवा प्रवृत्ति झाली पाहिजे. पुष्कळ वेळां आपण, कळतें पण वळत नाहीं म्हणजे हातून घडत नाहीं, असें म्हणतों. असा थोडाफार अनुभव प्रत्येकास असतो. दुर्व्यसनांच्या आधीन झालेल्यांस हा अनुभव रोज येत असतो. आपल्या व्यसनांमुळें स्वतःचें व स्वकीयांचें आपण नुकसान करीत आहों याची त्यांना जाणीव असते. पण त्यांचें मन त्यांना आवरतां येत नाहीं. अहितावह गोष्टी प्रिय वाटतात पण त्या कल्याण करीत नाहींत. हितप्रद असतें तें पुष्कळ वेळां प्रिय वाटत नाहीं. अशा वेळीं मनुष्याच्या मनांत श्रेय व प्रेय यांचा झगडा सुरु होतो. या झगड्याचा उल्लेख नचिकेताच्या गोष्टींत आला आहे. जे मंद असतात ते प्रेयाचा स्वीकार करतात व जे धीर असतात ते श्रेयाचा स्वीकार करतात, असें तेथें सांगितलें आहे. यांतील 'धीर' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. प्रेय आपणास मोह पाडीत असतें, आपल्या इंद्रियांना व मनाला वश करून घेत असतें, आपणास गुलाम बनविण्या-साठीं आपणावर चाल करून येत असतें; त्या मोहाला वश न होण्यास मनुष्याच्या अंगीं केवळ शहाणपणा असून भागत नाहीं. या हल्ल्यांतून आपला बचाव होण्यास मनुष्याच्या अंगीं धैर्य लागतें. इंद्रियें व मन आपल्या ताब्यांत असावीं लागतात. इंद्रियरूपी घोड्यांना मनाचा लगाम घालून तो बुद्धीच्या हातांत द्यावा लागतो. प्रेय व श्रेय यांच्यांतील भेद बुद्धीला समजला पाहिजे व त्याप्रमाणें तिनें मनाला व इंद्रियांना वळविलें पाहिजे. बुद्धि शुद्ध असली पाहिजे. **शुद्ध बुद्धि म्हणजे समबुद्धि**, आपल्याप्रमाणेंच इतरांच्याहि सुखदुःखांचा विचार करणें आणि तात्कालिक सुखाप्रमाणेंच चिरकालीन सुखाकडे लक्ष देणें हें सम बुद्धीचें लक्षण आहे. इंद्रियें व मन यांना आपल्या ताब्यांत न ठेवतां उलट त्यांच्या ताब्यांत बुद्धि गेली म्हणजे ती अशुद्ध होते व तिला प्रेय व श्रेय यांच्यांतील विवेक करतां येत नाहीं. आत्मा हा क्षणभंगुर नाहीं, तो चिरंजीव आहे व त्याचें स्वरूप संकुचित नसून सर्वव्यापक आहे, हें ज्या बुद्धीला पटतें व जी मनाला व इंद्रियांना आपल्या ताब्यांत ठेवूं शकते, तिला शुद्ध, सम किंवा आत्मनिष्ठ बुद्धि म्हणतात. बुद्धि सम, शुद्ध व आत्मनिष्ठ असली म्हणजे तिची दृष्टि तात्कालिक सुखावरून निघून चिरकालीन सुखावर आणि आपल्या एकट्याच्याच

सुखावरून निघून सर्वांच्या सुखावर स्थिर होते. बुद्धीला अशी दूर व व्यापक दृष्टि प्राप्त होऊन तदनुसार मनाचे व इंद्रियांचे व्यापार घडवून आणण्यासाठीं मनुष्याच्या अंगीं धीर असावा लागतो. हें धैर्य इंद्रिय-संयम व मनोनिग्रह यांच्या अभ्यासानें प्राप्त होतें. **या अभ्यासासच तप किंवा तपश्चर्या म्हणतात.** आपल्या बुद्धीला व्यापक दूरदृष्टि प्राप्त व्हावी, मन व इंद्रियें यांच्यावर तिचा ताबा असावा, आपल्या मनाला, वाणीला व शरिराला परोपकाराची संवय लागावी, आणि परपीडेची दुष्ट खोड नाहींशी व्हावी यांकरितां जे नियम पाळतात त्यांलाच **तप** हें नांव आहे. प्रेय व श्रेय यांच्या झगड्यांत यशस्वी होऊन प्रेयाला दूर सारून श्रेयाचा, पुण्याचा, धर्मांचा किंवा कर्तव्याचा मार्ग स्वीकारण्यास लागणारें **धैर्य** या तपोबलानें प्राप्त होतें.

ही तपश्चर्या पूर्ण झाली म्हणजे मनुष्याची बुद्धि स्वभावतःच व्यापक व दूरदर्शी बनते. प्रेयाचा मोह तिला कधींच पडत नाहीं. श्रेयांतच आनंद वाटूं लागतो. सामान्य मनुष्याला तात्कालिक सुख जितकें प्रिय वाटतें, तितकेंच अशा मनुष्याला चिरकालीन सुख प्रिय वाटूं लागतें व त्याची तिकडे सहज प्रवृत्ति बनते. सामान्य मनुष्याला जितकें स्वतःचें सुख प्रिय वाटतें, तितकेंच जगाचें सुख अशा मनुष्याला प्रिय वाटूं लागतें. आईला मुलाच्या प्रेमामळें त्याचें सुख तेंच आपलें सुख असें वाटतें, त्याप्रमाणें जगाचें सुख तेंच आपलें सुख अशी वृत्ति अशा मनुष्याच्या अंतःकरणांत बाणते. त्याचें सर्व अंतःकरण प्रेमानें व सत्यानें भरून गेलेलें असतें. सत्याची व प्रेमाची प्रस्थापना करणें हाच त्यांचा व्यवसाय बनतो व त्या व्यवसायांत ते रमलें म्हणजे त्यांना अखंड आनंद लाभत असतो. हेंच अमृतत्व होय. याच अखंड आनंदाची प्राप्ति वित्तापासून किंवा कोणत्याहि बाह्य पदार्थांपासून होत नाहीं, असें याज्ञवल्क्यानें आपल्या प्रिय पत्नीस म्हणजे मैत्रेयीस सांगितलें आहे. या आत्मानंदाचा अखंड आस्वाद घेणें हाच चौथा पुरुषार्थ मोक्ष होय. हीच स्थितप्रज्ञावस्था किंवा जीवन्मुक्ति. याज्ञवल्यासारखे तपोनिष्ठ ऋषी, मैत्रेयी किंवा गार्गी यांच्यासारख्या ब्रह्मज्ञानी स्त्रिया, नचिकेतासारखे ऋषिकुमार, जनकासारखे राजर्षी किंवा भिक्षान्देही करून विद्योपासना करणारे ब्रह्मचारी यांनीं या अमृतत्वाचा आस्वाद घेतला होता. त्यांची बुद्धि स्थिर,

सम, शुद्ध आणि आत्मनिष्ठ बनली होती. सर्व भूतमात्रांचा आत्मा एकच आहे हें ज्ञान त्यांना झालें होतें. हें ज्ञान त्यांनीं अनुभविलें होतें व म्हणून संतति व संपत्ति यांचा लोभ किंवा मोह त्यांना उरला नव्हता. त्यांच्याच नाशाची नव्हे तर स्वतःच्या मृत्यूचीहि त्यांना भीति उरली नव्हती. संतति, संपत्ति यांचा मोह किंवा मृत्यूचें भय त्यांना श्रेयसाधनाच्या किंवा सत्याच्या मार्गावरून परावृत्त करण्यास समर्थ नव्हतें. सत्य आणि भूतमात्रावरील प्रेम हेंच त्यांचें जीवन बनलें होतें. त्यांच्या देहाची त्यांना मातब्बरी वाटत नसल्यामुळें सत्याकरितां व जगावरील प्रेमाकरितां वाटेल तेव्हां आपलें बलिदान करण्यास त्यांची तयारी होती. सर्व भूतमात्रांत एकच आत्मा आहे व तोच माझा अंतरात्मा आहे, हें आत्मज्ञान श्वेतकेतूप्रमाणें त्यांनीं अवगत करून घेतलें होतें. सर्व जगाला आधारभूत असें जें तत्त्व आहे तेंच परमात्मस्वरूपी परब्रह्म होय हें गार्गी व याज्ञवल्क्य यांच्या संवादांतील रहस्य त्या सर्वांनीं ओळखिलें होतें. सत्य, प्रेम व तप या तीन शब्दांत त्यांच्या तेजस्वितेचें सर्व रहस्य सांठलेलें आहे. **एकच परमात्मा सर्वत्र भरलेला आहे हें जाणणें हेंच आत्मज्ञान, हें ओळखून सर्व भूतमात्रांचा अंतरात्मा सुखरूप बनविणें हीच सर्वश्रेष्ठ उपासना आणि या व्यवसायांत अविरत परिश्रम करणें हाच कर्मयोग;** हा त्यांच्या सर्व शिकवणीचा निष्कर्ष आहे व तो बिनमोल आहे.

अशा रीतीनें आत्मज्ञानापासून प्राप्त होणारा आनंद जरी अत्यंत महत्त्वाचा असला व या दृष्टीनें सर्व पुरुषार्थांत मोक्षाला जरी श्रेष्ठ स्थान असलें तरी अर्थ व काम यांची योग्यता कमी होत नाहीं. मनुष्याला संपत्ति व संतति यांच्यापासून प्राप्त होणारें सुख अवश्य आहे. मात्र तेंच त्याचें अंतिम ध्येय नाहीं. अन्नादि इंद्रियसुखें हीं जशीं त्याला हवींत त्याचप्रमाणें सत्य आणि प्रेम व कर्तव्यपरायणता यांपासून प्राप्त होणारा आनंद हाहि त्याला हवा असतो. संपत्ति, संतति यांच्या प्राप्तीसाठींहि समाजधारणा व्हावी लागते. ही समाजधारणा करणें हेंच धर्माचें कार्य आहे आणि सर्व अधर्मवृत्ति नष्ट करून केवळ धर्मरूप, सत्यरूप बनणें हें मोक्षाचें ध्येय आहे. प्राचीन आर्यांनीं आपल्या समाजाची रचना या चार पुरुषार्थांच्या दृष्टीनें करण्याचा प्रयत्न केला होता.

समाजांत त्यांनीं चार वर्ण कल्पिले होते. समाजाच्या ज्ञानांत किंवा विद्येंत भर घालणारा ब्राह्मण वर्ग, त्याच्या संपत्तींत भर घालणारा वैश्य वर्ग, शरीरकष्टानें समाजाची सेवा करणारा तो शूद्र वर्ग आणि या सर्वांचें शौर्यानें संरक्षण करणारा तो क्षत्रिय वर्ग. समाजाचे नेहमीं असे चारच वर्ग पडतील असें नाहीं. कालमानाप्रमाणें ते बदलतहि जातील व जावयास हवेतहि. पण त्यांच्या यासंबंधींच्या तत्त्वज्ञानांत दोन तत्त्वें होतीं तीं फार महत्त्वाचीं आहेत. मनुष्यांनीं आपल्या गुणानुसार समाजाची कोणती तरी सेवा करावी व ती स्वार्थबुद्धीनें न करतां कर्तव्यबुद्धीनें करावी. मनुष्याची योग्यता तो कोणत्या प्रकारें समाजाची सेवा करतो यावर अवलंबून न ठेवतां ती सेवा स्वार्थानें करतो किंवा निःस्वार्थ कर्तव्यबुद्धीनें करतो यावरून ठरविली जावी. हीं सर्व तत्त्वें केव्हांहि पूर्णपणें अमलांत आलीं नाहींत, तथापि तीं तत्त्वें उत्तम आहेत यांत शंका नाहीं. मनुष्याचा वर्ण केवळ त्याच्या जन्मावरून न ठरतां त्याच्या प्रकृतिगुणावरून ठरला गेला पाहिजे. या तत्त्वाचें महत्त्व सत्यकाम जाबाल याच्या कथाप्रसंगानें या पुस्तकांत सांगितलें आहे.

या चार वर्णांच्या कल्पनेप्रमाणेंच चार आश्रमांची कल्पनाहि फार रमणीय आहे. प्रत्येक मनुष्यानें ब्रह्मचर्याश्रमांत विद्यार्जन करावें, कर्तव्यबुद्धि जागृत करावी. मन आणि बुद्धि यांना सम आणि शुद्ध बनवावें आणि नंतर सामाजिक कर्तव्यांचा भार उचलण्यास लायक बनून गृहस्थाश्रमांत प्रवेश करावा. तेथें संपत्ति, संतति यांचें सुख उपभोगीत असतांना समाजधर्माला व आत्मोन्नतीला नित्य जागावें व त्याच सुखांत मूढ होऊन जाऊं नये. कुटुंब-संस्थेंत राहून निरनिराळ्या देहांच्या आड एकच आत्मतत्त्व असतें याचा अनुभव घ्यावा. मातेचें मुलावरील प्रेम, मुलाचें आईबापांवरील प्रेम, पति-पत्नींचें परस्परांवरील प्रेम हीं सर्व आत्मप्रेमाचींच प्रतीकें आहेत हें ओळखावें आणि आत्म्याच्या व्यापक स्वरूपाचा अनुभव घ्यावा. यानंतर कुटुंबाचा भार आपल्या प्रौढ व विद्याविनयसंपन्न मुलांवर सोंपवून आपल्या छोट्या कुटुंबांतून मोठ्या विश्वकुटुंबांत प्रवेश करण्यासाठीं वानप्रस्थाश्रमाची दीक्षा घ्यावी. आपल्या प्रेमाचा व कर्तव्याचा व्याप आतां मोठा करावा आणि समाजसेवेच्या मार्गानें आत्मोन्नतीचाच एक ध्यास घ्यावा. अखेरीस

संन्यासाश्रम घेऊन ज्या वेळीं आपला देह पंचमहाभूतांत विलीन होईल तेव्हां आपला आत्मा परमात्म्यांत विलीन करावा व अमर व्हावें.

अशा प्रकारची चार पुरुषार्थ, चार वर्ण व चार आश्रम यांनीं युक्त अशी भारतीय आर्यांची संस्कृति होती. हिच्या सर्व गुणदोषांचें विवेचन करण्याचें हें स्थळ नाहीं. तिच्या बुडाशीं असणाऱ्या सत्तत्त्वांची ओळख थोडक्यांत करून देण्याचा प्रयत्न वर केलेला आहे. शूद्र व अतिशूद्र वर्गांना या संस्कृतीनें आपल्या धनाचा भरपूर उपभोग घेऊं दिला नाहीं, हा एक तिचा दोष असून कदाचित् यामुळेंच तिची पुढें अवनति झाली असावी. आपल्या संस्कृतीचा आदर राखणें याचा अर्थ पूर्वजांनीं केलेल्या सर्व बऱ्या-वाईट कृत्यांचें अंध अनुकरण करणें नव्हे. ही विचारांची गुलामगिरी ही संस्कृति जिवंत होती तेव्हां नव्हती. "यानि अस्माकं सुचरितानि तानि सेवितव्यानि नो इतराणि।" असा उपदेश त्या वेळचे गुरु करीत असत. आपलीं मतें शिष्यावर न लादतां त्यालाच आपल्या बुद्धीनें सत्यसंशोधन करतां यावें अशी त्यांची अपेक्षा असे. श्वेतकेतूच्या कथेंत त्याच्या वडिलांनीं त्याला जो ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला तो पाहिला असतां त्यालाच निरीक्षण करण्यास व सत्यसंशोधन करण्यास मदत करण्यापलीकडे त्यांनीं आपले सिद्धान्त त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न केलेला नाहीं असें दिसून येईल. इतर सर्व विद्येप्रमाणें अध्यात्मविद्येंतहि स्वानुभव हाच अखेरचा निकष असतो. पूर्वजांच्या संस्कृतीचा विकास करणें, त्यांतील हिणकस भाग झाळून टाकणें व शुद्ध तत्त्वांचें तेज वृद्धिंगत करणें हें वंशजांचें काम आहे. पूर्वजांनीं जीं सत्यें शोधून काढिलीं त्यांत भर घालणें व त्यांतील असत्यांश नष्ट करणें हाच त्यांच्याविषयींचा आदर व्यक्त करण्याचा उत्कृष्ट मार्ग आहे. या मार्गानें आपण जाऊं लागूं तेव्हांच नचिकेतासारखे तेजस्वी व धैर्यवान् कुमार, जाबालासारखे सत्यकाम विद्यार्थी, मैत्रेयीसारख्या अमृतत्वाचा शोध करणाऱ्या पतिव्रता, गार्गीसारख्या सभाधीट ब्रह्मवेत्त्या स्त्रिया, याज्ञवल्क्यासारखे आदर्शभूत गृहस्थाश्रमी ऋषी आणि जनकासारखे राजर्षी किंवा राष्ट्रनायक आपणांमध्यें पुनः चमकूं लागतील. याकरितां आपल्या शिष्यांना गुरूंनीं किंवा अपत्यांना मातपितरांनीं हीच दृष्टि ठेवून पुढील गोष्टी समजून द्याव्यात अशी अपेक्षा आहे.

**शंकर दत्तात्रेय जावडेकर.**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | मृत्यूच्या दाढेंत | १– ९ |
| २ | मृत्यूवर विजय | १०–१६ |
| ३ | खरी उपासना | १६–२० |
| ४ | गर्वहरण | २०–२७ |
| ५ | श्रेष्ठ कोण ? | २७–३५ |
| ६ | गुणांवरून वर्ण | ३६–४० |
| ७ | स्वकुटुंबांतून विश्वकुटुंबांत | ४१–४८ |
| ८ | तें तूं आहेस | ४८–५९ |
| ९ | तपश्चर्येनें ब्रह्मज्ञान | ५९–६८ |
| १० | ब्रह्मच जगाचा आधार | ६९–७४ |

# मुलांनो.

भारतवर्षामध्यें फार प्राचीन काळीं घडलेल्या कांहीं गोष्टी मी तुम्हांला सांगणार आहें. हं, जरा थांबा, या जुन्या गोष्टींचें आम्हांस काय? हा विचार मनांत येऊं देऊं नका. थोडा धीर धरा व या सर्व गोष्टी वाचा. माझी खात्री आहे कीं, शेवटीं तुम्ही माझी सेवा गोड करून घ्याल. या गोष्टींचें वाचन तुमचें मनोरंजन तर करीलच, परंतु तें तुमच्या बुद्धीला चालना देईल व मनाला बोध करील. या गोष्टींत जीं धार्मिक व नैतिक तत्त्वें भरलीं आहेत, तीं अतिशय सुंदर व बोधप्रद आहेत. तशींच तीं शाश्वत म्हणजे सर्वकाल टिकणारीं व सदैव लागू पडणारीं आहेत. ज्याप्रमाणें सूर्य कधीं शिळा होत नाहीं त्याप्रमाणेंच हीं तत्त्वेंहि कधीं जुनीं होत नाहींत. म्हणून मी म्हणतों कीं, हीं तत्त्वें पुनः पुनः ऐका, वाचा व समजावून घ्या, त्यांचें मनन करा व स्वतःला त्याचा ध्यास लावून घ्या. या बोधानें तुमच्या जीवनाचें कमल उमलेल व त्याचा परिमळ सर्वत्र पसरेल. त्यामुळें तुमच्या आईबापांना व इतर कुटुंबियांना परम आनंद व संतोष मिळेल. त्यांना तुमच्याबद्दल अभिमानयुक्त आदर वाटेल व ते तुमच्यावर निर्व्याज प्रेम करूं लागतील. तुमचें जीवन सुखी होऊन तुम्ही आदर्श युवक बनाल. जेव्हां तुम्ही मोठे व्हाल तेव्हां तुमच्या विचारांचें व आचाराचें लोक अनुकरण करतील. तुमच्या हातून तुमच्या समाजाची व देशाची सेवा होईल व तुमची कीर्ति सर्वत्र पसरेल. तुमचा जन्म सफल होईल.

मी तुम्हांला प्रथम नचिकेताची गोष्ट सांगणार आहें. अगदीं चित्त एकाग्र करून ऐका हं.

# उपनिषदांतील दहा गोष्टी

म. ग्रं. सं.
ग्रंथ प्रकार ... ... ... ...
ग्रंथांक ... ... ... ...
विभाग क्रमांक ... ... ...

## गोष्ट १ ली.*

## मृत्यूच्या दाढेंत

कठोपनिषदांतील गोष्ट आहे. वाजश्रवस गौतमी नांवाचा एक ऋषि होता. त्याचा नचिकेता नांवाचा एक मुलगा होता. नचिकेताचें वय किती होतें हें आपल्याला सांगितलेलें नाहीं. पण तो कुमार होता असें म्हटलें आहे. तेव्हां तो फार मोठा नसावा हें निश्चित आहे. परंतु त्या वेळची त्याची विद्वत्ता व कर्तृत्व लक्षांत घेतलें तर तो फार लहानहि असणें शक्य नाहीं. तेव्हां त्याचें नक्की वय काय होतें हें ठरविण्याचें मी तुमच्यावर सोंपवितों व माझी गोष्ट पुढें सुरू करतों. एकदां वाजश्रवसानें ब्राह्मणांना बोलावून त्यांना आपलें सर्व धन दान दिलें. त्या वेळीं लोकांचें मुख्य धन 'गोधनच' असे. वडिलांचें हें कृत्य पाहून नचिकेताला फार वाईट वाटलें व तो मनामध्यें फार कष्टी झाला. 'यांत नचिकेताला वाईट वाटण्यासारखें काय होतें' असा तुमचा प्रश्न ना? वडिलांच्या या चांगल्या कृत्यानें त्याला उलट आनंद व्हावयाला पाहिजे होता. बापानें सर्व धन ब्राह्मणांना देऊन आपणाला कंगाल केलें म्हणून नचिकेताला दुःख झालें असावें; होय ना? परंतु नचिकेता स्वार्थी नव्हता हें तुम्हांला पुढें दिसून येईल. स्वार्थी माणसाचा आदर्श मीं

*कठोपनिषद् अ. १, वल्ली १.

तुमच्यापुढें कशाला ठेवला असता? नचिकेताच्या दुःखाचें कारण अगदीं वेगळेंच होतें. नचिकेता आपल्या वडिलांना चांगलेंच ओळखत होता. त्याच्या वडिलांनीं दातृत्वाचा मोठा आव आणून आपला स्वार्थ साधला होता. देवब्राह्मणांना फसवून समाजामध्यें दंभ माजविण्याचा त्यानें घाट घातला होता. नचिकेताला हें दृश्य पाहून विषाद वाटला. वडिलांनीं ब्राह्मणांना ज्या गाई दिल्या होत्या त्या भाकड व म्हाताऱ्या होत्या, हें नचिकेताला माहीत होतें. गाई दुभत्या असतील तेव्हां त्यांचा उपयोग आपण करून घ्यावयाचा व त्या भाकड व निरुपयोगी झाल्या कीं त्यांच्या पोषणाचा भार टाळण्यासाठीं त्यांचें दान करावयाचें; खासा न्याय! वडिलांचें कपट सरळ व निष्कपटी नचिकेताला कसें सहन व्हावें?

नचिकेताला खेद तर झालाच; परंतु संतापहि आला. खोटा पैसा चालवून चांगला माल खरेदी करणारे लोक तुम्हीं कधीं पाहिले आहेत काय? नचिकेताचे वडील यांपैकींच एक होते. खोट्या दानावर (देवांच्याकडून) स्वर्गाला जाण्यासाठीं शिड्या विकत घेण्याची त्यांची इच्छा होती. परंतु 'जसें करावें तसें भरावें' या न्यायानें आपल्या बापाचें हें कृत्य त्याला दुःखाच्या खाईंत लोटणार असें नचिकेताला पक्कें वाटलें. अशा वेळीं आपलें कर्तव्य काय? हा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. शेवटीं त्याच्या मनोदेवतेनें त्याला कौल दिला. वडील झाले म्हणून काय झालें? जर त्यांच्या हातून दुष्कर्म होत असेल तर त्यांना तसें स्पष्ट सांगितलें पाहिजे. जरूर तर त्याग व दुःख सहन करूनहि त्यांचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें नचिकेतानें ठरविलें. निश्चय झाला कीं त्याप्रमाणें वागणें हें तर थोरांचें लक्षण. नचिकेता ताबडतोब आपल्या वडिलांकडे गेला व त्यांस म्हणाला,

"बाबा, गाई ब्राह्मणांना दिल्या; आतां मला कोणाला देणार? गायी ब्राह्मणांना देऊन खर्च टाळलात, आतां मलाहि कोणाला तरी देऊन माझासुद्धां खर्च वांचवा." असा नचिकेतानें वडिलांना टोमणा मारला आहे. वडिलांची स्वार्थपरायणता, कपट व दंभ पाहून नचिकेताला संताप येणें अगदीं स्वाभाविक होतें. परंतु त्यानें आपला संताप आवरला असता व वडिलांशीं सरळ संभाषण केलें असतें तर किती बहार झाली असती! दुधांत साखर त्याप्रमाणें नचिकेताच्या चारित्र्याची गोडी अधिक वाढली असती. माझ्या तरुण मित्रांनो, तुम्हांलाहि असें नाहीं वाटत? काय म्हणतां, जशास तसेंच पाहिजे? पण हा तर झाला आपला मूळ स्वभाव. आपल्याला शेवटपर्यंत मनुष्यच राहावयाचें नाहीं, तर देव बनावयाचें आहे.

नचिकेताला ताबडतोब जबाब मिळाला नाहीं. मुलाच्या प्रश्नांतील खोंच वाजश्रवसाच्या खास लक्षांत आली असली पाहिजे. नचिकेतानें तोच प्रश्न पुन: विचारला. तरी उत्तर नाहीं. नचिकेतानें तोच प्रश्न तिसऱ्यांदा विचारला! आतां मात्र बापाचा राग पोटांत मावला नाहीं; त्याचा स्फोट झाला व त्यानें उत्तर दिलें, "मी तुला मृत्यूला देतों."

गोष्टी या थराला जातील अशी नचिकेताची कल्पना नसावी. वडिलांचा स्वभाव त्याला माहीत होता. परंतु ते असा जमदग्नीचा अवतार धारण करतील असें त्याला वाटलें नसावें. परंतु आतां उपयोग काय? 'प्राण जाय पण बचन न जाय' हाच खरा धर्म. रागाच्या आवेशांत उद्गारलेलें असलें तरी वडिलांचें वचन सत्य झालें पाहिजे. शिवाय वडिलांचा क्रोधाग्नि त्याच्याच अविवेकानें भडकावला होता. तो एकांतांत जाऊन विचारमग्न झाला. एक मति सांगे, 'बापाचें वचन खरें कर;' तर दुसरी मति ताबडतोब सांगे, 'ध्यानांत धर, मृत्यूशीं

गांठ आहे.' नचिकेताचें मन हेलकावे खाऊं लागलें. वडिलांचें वचन खरें करावयाचें तर मृत्यूला आलिंगन दिलें पाहिजे; बरें मृत्यूला भ्यावें तर वचनभंगाचें पाप लागणार. इकडे आड व तिकडे विहीर अशी नचिकेताची स्थिति झाली. नचिकेताबद्दल कोणाला दया व सहानुभूति वाटणार नाहीं? थोडा आपल्या मनाशीं विचार करा. ज्यांना भिण्याचें बिलकुल कारण नसतें अशा कितीतरी गोष्टींना आपण भीत असतों. वडिलांनीं काळोखांतून एखादी वस्तु आणावयाला सांगितली तर तुम्हांला भीति वाटते व वडिलांचा राग येतो! मग नचिकेताला तर प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत जावयाचें होतें. मृत्यूच्या घरीं जाऊन कोणी परत आला आहे काय? कालकूट विष पिऊन कोणी वांचला आहे काय? परंतु नचिकेताच्या मनांतील झगडा फार वेळ टिकला नाहीं. सुजनांच्या येथें अखेर सुमतीचाच विजय होतो. नचिकेतानें विचार केला मीं मृत्यूला कां भ्यावें? मी आज कुमार आहें म्हणून मला मृत्यु दूर वाटतो. परंतु मी नेहमींच कांहीं तरुण राहणार नाहीं. केव्हां तरी वृद्ध होणारच. मग मात्र मला मृत्यूला टाळणें शक्य नाहीं. कारण जन्माला आलेल्यांना मृत्यु आणि मेलेल्यांना जन्म अनिवार्य आहे. तेव्हां जी गोष्ट उद्यां खात्रीनें घडणार तिला भिऊन मीं आज अधर्म कां करावा? प्राण द्यावा लागला तरी द्यावयाचा, पण वडिलांचें वचन खरें करावयाचें, असें नचिकेतानें ठरविलें. कुमार नचिकेता मृत्यूकडे जाण्याला निघाला.

नचिकेताचें पुढें काय झालें हें जाणण्याची तुम्हांला उत्कंठा लागली आहेना? मग कान देऊन ऐका.

नचिकेता मृत्यूच्या घरीं सुखरूप जाऊन पोहोंचला. परंतु योगायोग असा कीं यमधर्म त्या वेळीं आपल्या घरीं नव्हता. तो कोठें बाहेर गेला होता. यम परत येईपर्यंत नचिकेतानें अन्नाचा एक कण किंवा

पाण्याचा एक थेंब पोटांत घातला नाहीं. यमाच्या घराला कुलूप होतें कीं काय असा तुमचा प्रश्न ना? समजलों. परंतु निश्चित उत्तर देणें कठीण आहे. यमाला बायकामुलें होतीं किंवा नाहीं हें मला माहित नाहीं. संकटांतून 'शीर सलामत' बचावून जाण्याला अंगीं बल लागतें, हें तुम्ही जाणतांच. कदाचित् या बलासाठीं नचिकेतानें हें तप केलें असेल. कारण सात्त्विक तपाचें सामर्थ्य फार मोठें आहे. तें कसेंहि असो, नचिकेतानें तीन दिवस व तीन रात्री कडकडीत उपोषण केलें. त्यानें उपवासाला प्रार्थनेची जोड दिली नसेल हें सांगण्याचें मी तरी धारिष्ट्य करीत नाहीं.

यमाची स्वारी घरीं परत येते तों आपल्या दारांत एक तपस्वी कुमार बसलेला. 'पहिला घाव म्हणजे अर्धी लढाई' अशी एक म्हण आहे. नचिकेतानें हा पहिला घाव आपण मारण्याचें ठरविलें. बुद्धिमंत व धैर्यशील पुरुष आलेल्या संकटाचा उपयोग मोठ्या चातुर्यानें आपल्या कल्याणाकडेच करून घेतात. नचिकेतामध्यें धैर्य, बुद्धि व चातुर्य हे गुण उत्कटतेनें वास करीत होते. तूं कोण? कोठला? वगैरे प्रश्न विचारण्याला यमाला अवकाश न देतां नचिकेतानें आपणच यमाला अतिथिधर्माचा पाठ देण्याला प्रारंभ केला. तो म्हणाला:—

"यमधर्मा, पाणी आण. अतिथि हा अग्निदेव आहे. ज्या ब्राह्मणाच्या घरांत अतिथि उपाशी राहतो त्याचें सर्व बाजूंनीं नुकसान होतें."

अतिथीला देव म्हणजे श्रेष्ठ पुरुष मानावा अशी हिंदुधर्माची आज्ञा आहे. सत्पात्र अतिथीचा योग्य सत्कार केला नाहीं व त्याचा उत्तम प्रकारें परामर्ष घेतला नाहीं तर मोठा अधर्म होतो. आपली बुद्धि, शक्ति व संपत्ति केवळ आपल्या स्वत:च्याच भोगासाठीं नाहीं. समाज-

सेवेसाठीं तिचा उपयोग करावयाचा असतो. असें केलें तरच आपलें व आपण ज्या समाजाचे घटक आहोंत त्या समाजाचें असें दोघांचेंहि कल्याण होतें. जो केवळ स्वत:साठींच पाकसिद्धि करतो तो 'पाप' भक्षण करतो असें म्हटलें आहे. यमधर्माला हा अतिथिधर्म मान्य होता. त्यानें अतिथीची क्षमा मागितली व तो त्याला म्हणाला:--

" हे अतिथिदेव, मला क्षमा करावी. ज्याअर्थी तुम्ही माझ्या घरीं तीन दिवस उपाशी आहांत त्याअर्थी मी तुम्हांला तीन वर देतों. माझें कल्याण व्हावें."

मृत्यु आणि तो इतका साम्य व सरळ ! माझ्या तरुण मित्रांनो, तुम्हांला अचंबा वाटत असेल नाहीं ? परंतु मी तुम्हांला सांगतों कीं मृत्यु जसा भयंकर व भेसूर आहे असें आपल्याला भासविण्यांत येतें तसा तो नाहीं. आपल्याला समजायला लागल्यापासून मृत्यु हा आपला शत्रु आहे असें आपल्या कानींकपाळीं सारखें मारण्यांत येतें. म्हणून आपण त्याचा द्वेष करतों, त्याला भितों व त्याला टाळण्याचा प्रयत्न करतों. आपण त्याच्या भयानें पुष्कळ वाईट कर्मे करतों व चांगलीं कर्मे करीत नाहीं. पण तुम्हांला हें माहीत आहे का ? मरण हें जन्माचें सहोदर आहे, हें जो लक्षांत ठेवतो व जगांत नेहमीं अनासक्तीनें कर्में करतो त्याला मृत्यूचें भय कधींच वाटत नाहीं. उलट, मृत्यु त्याच्यावर प्रसन्न होऊन नचिकेताप्रमाणें त्याचें खरें कल्याण करतो.

यमधर्मानें 'वर माग' म्हटल्याबरोबर पडत्या फळाची आज्ञा समजून नचिकेतानें यमापाशीं पहिला वर मागितला.

" यमधर्मा, माझ्या बापाच्या सर्व वासना शांत होवोत. तो सुमन म्हणजे शुद्धचित्त होवो, माझ्यावरचा त्याचा राग जावो, व मी

तुझा निरोप घेऊन परत गेल्यानंतर तो माझें प्रसन्न चित्तानें स्वागत करो."

एका धोंड्यानें दोन पक्षी मारणें ही म्हण कधीं तुम्हीं ऐकली आहे काय? नचिकेताची त्याच्याहि वर ताण आहे. त्यानें एका वरानें तीन गोष्टी मागून घेतल्या. त्याच्या वडिलांच्या हातून जो अधर्म झाला त्याचें कारण त्यांची स्वार्थबुद्धि व चित्ताची मलीनता हें होतें. म्हणून आपल्या बापाच्या वासना म्हणजे स्वार्थी इच्छा नष्ट व्हाव्यात व चित्त स्फटिकासारखें स्वच्छ व्हावें अशी त्यानें यमाला पहिली मागणी केली. वडिलांनीं रागावून त्याला यमाकडे पाठविलें त्याचें कारण त्यांचा अविचार हेंच होतें. दुसऱ्या मागणीनें नचिकेतानें त्याचें परिमार्जन केलें. यमधर्म आपल्याशीं गोडगोड भाषण बोलत असला तरी आपण त्याच्या मुखांत आहोंत या गोष्टीकडे नचिकेताचें दुर्लक्ष झालें नव्हतें. "तुझा निरोप घेऊन मी परत गेल्यावर माझा बाप माझें प्रसन्न चित्तानें स्वागत करो" असा वर मागून, अखेर तुझ्या पाशांतून माझी मुक्तता होवो असें त्यानें ध्वनित केलें होतें. याचें नांव सावधानता. यमानें उत्तर दिलें,

"नचिकेता, मी तुला हा वर दिला."

नचिकेतानें दुसरा कोणता वर मागितला असेल तें ओळखा पाहूं. तो तुमच्यासारखाच कुमार होता. आपण नेहमीं सुखाच्या शीतल चांदण्यांत रमावें व दुःखाच्या काळोखांत ठेचा खाण्याचा प्रसंग आपल्यावर कधीं येऊं नये असें, माझ्या मित्रांनो, तुम्हांला नाहीं वाटत? सत्याला संकोच कसला? तुम्हांला तसें वाटलें तर त्यांत तुमची मुळींच चूक नाहीं. तसें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे; नव्हे जरूर आहे. ही सुखेच्छाच मानवी उत्कर्षाचा पाया आहे. काय म्हणतां? अशी सुखेच्छा धरणें वाईट आहे असें वडील

सांगतात ? माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. तें त्यांचें अज्ञान आहे. तुमच्या वडिलांना दोष दिल्याबद्दल क्षमा करा हं. प्रत्येक माणसाची सुखासाठींच धडपड असते. परंतु सर्वच सुखी होत नाहींत. तुम्हांला याचें कारण समजलें का ? सुखाची किंमत देण्याची त्यांची तयारी नसते. वस्तूची किंमत दिल्याशिवाय ती बाजारांत मिळेल काय ? मग सुखच फुकट मिळावें ही अपेक्षा कां ? सुख पाहिजे असेल तर दीर्घोद्योग करून विद्या संपादन केली पाहिजे. सुखाची किल्ली देवी सरस्वतीजवळ आहे. आपलें आयुष्य सुंदर व सुखमय व्हावें असें तुम्हांला वाटतें ना ? मग आपलें बाळपण व यौवन सरस्वतीदेवीच्या उपासनेंत घालवा. आपल्या नचिकेताला हा सुवर्ण-नियम माहीत होता म्हणून त्यानें यमधर्माला पुढीलप्रमाणें दुसरा वर मागितला, " यमधर्मा, ज्या विद्येमुळें स्वर्ग प्राप्त होतो ती अग्नि-विद्या मला दे. स्वर्ग लोकांत भय नाहीं, मृत्यु नाहीं व तेथें लोक आनंदानें राहतात; आणि क्रमानें अमृतत्व म्हणजे मोक्ष मिळवितात, त्या स्वर्गाची मला इच्छा आहे ती पूर्ण कर. "

स्वर्ग हा सुखाला पर्यायशब्द आहे. स्वर्गलोक म्हणजे सुखलोक. नचिकेतानें सुखाची वांच्छा केली आहे. स्वर्ग म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूनंतर प्राप्त होणारा लोक, अशी आपली समजूत आहे. खरें सुख स्वर्गांतच; या पृथ्वीवर खरें सुखच नाहीं, असें आपणाला सांगण्यांत येतें. आपण जगाच्या व्यवहाराकडे दुर्लक्ष करतों व हातचें सोडून पळत्याच्या मागें लागतों. स्वर्गसुख तर दूरच राहतें; पण आपल्या वर्तनानें या पृथ्वीलाच आपण नरक बनवितों. पण उलट तुम्हीं मना-वर घेतलेंत तर या भूलोकावरच स्वर्ग निर्माण करूं शकाल. हा स्वर्ग तुमच्या माझ्या हृदयांत आहे. मात्र हें ओळखून त्याच्या प्राप्तीसाठीं उद्योग केला पाहिजे. शिवाय मला तुम्हांला हेंहि सांगितलें पाहिजे कीं,

नचिकेतानें सुखाची मागणी केली हें खरें. परन्तु सुखासाठीं सुख हा त्याचा दंडक नव्हता. जो सुखासाठीं सुखाची वांच्छा करतो व त्याचा उपभोग घेतो त्याचा नाश होतो. उलट जो या सुखाचा उपयोग अमृतत्व मिळविण्यासाठीं करतो त्याला सुख मिळून शिवाय मोक्ष मिळतो. नचिकेतानें सुखाची मागणी याच हेतूनें केली आहे. कुमार नचिकेताची जिज्ञासा, ज्ञानपिपासा व त्याच्यासाठीं दीर्घोद्योग करण्याची त्याची तत्परता पाहून यमधर्म संतुष्ट झाला. त्यानें नचिकेताला सर्वांगांसह अग्निविद्या सांगितली. आपल्या शिष्यावर तो अतिशय प्रसन्न झाला व उदार अंतःकरणानें त्याला म्हणाला,

"हे नचिकेता, मी तुला आणखी एक वर देतों. त्या वरानें हा अग्नि यापुढें जगामध्यें तुझ्या नांवानें म्हणजे 'नचिकेत अग्नि' या नांवानें प्रसिद्ध होईल."

आपला नचिकेत सुखाचा स्वामी झाला व कीर्तीनें त्याला वरलें, परंतु त्याचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. तो सुखवादी नव्हता. त्याला तुमच्या आमच्याप्रमाणें सुखाची इच्छा होती; परंतु केवळ सुखानें मनुष्याला खरी व शाश्वत शांति मिळत नाहीं, हें ज्ञान त्याला होतें. त्याला शाश्वत सुखाची शांति पाहिजे होती. यमाच्या घरून सुरक्षित परत जाण्याची व्यवस्था त्यानें अगोदरच करून ठेवली होती. परंतु जरी त्यानें मृत्यूला प्रसन्न केलें होतें तरी कायमचें जिंकलें नव्हतें. कुमार नचिकेतानें अखेर मृत्यूला कसें जिंकलें तें मी तुम्हांला दुसऱ्या गोष्टींत सांगेन.

---

## गोष्ट २ री*

# मृत्यूवर विजय

मृत्यूवर विजय मिळवावयाचा असेल तर ब्रह्मविद्या मिळविली पाहिजे हें नचिकेताला माहीत होतें म्हणून तो प्राप्त झालेल्या जयानें गाफील झाला नाहीं. उलट आपल्या अंतिम ध्येयपूर्तीसाठीं त्याचा मोठ्या चातुर्यानें उपयोग करून घेण्याचें त्यानें ठरविलें. अमृतत्वाशिवाय शाश्वत सुख नाहीं व ब्रह्मविद्येशिवाय अमृतत्व नाहीं. तेव्हां उरलेल्या वरानें ब्रह्म किंवा आत्मविद्या संपादन करण्याचें नचिकेतानें ठरविलें. त्यानें यमधर्मापाशीं शेवटचा वर मागितला.

"यमधर्मा, ज्याच्याबद्दल लोक नाना तर्कवितर्क करतात तो आत्मा काय आहे हें मला सांगा."

यमानें उत्तर दिलें, "नचिकेता, देवांनाहि या आत्म्याच्या स्वरूपाबद्दल संशय पडला होता. या आत्म्याचें ज्ञान फार गहन आहे. तूं त्याचा आग्रह धरूं नको." नचिकेतानें उत्तर दिलें, "ज्याच्या स्वरूपाबद्दल देवांनाहि संशय पडला होता तो आत्मा महानच असला पाहिजे. शिवाय तुझ्यासारखा अन्य गुरु शोधूं म्हटला तर मिळावयाचा नाहीं. तेव्हां मी मागितलेलाच वर मला दे." संतापाच्या भरांत नचिकेत आपल्या वडिलांना कटु वचन बोलला हें खरें, परंतु त्याची वाणी खरोखर किती मधुर आहे. त्याचें वचन सत्य व प्रियहि आहे. यमानें उत्तर दिलें,

"नचिकेता, सुंदर व सद्गुणी स्त्रिया, दीर्घायुषी सुपुत्रपौत्र, हत्ती, घोडे, सोनें माग. पृथ्वीचें राज्य माग. तुझा वाटेल तो अन्य

* कठोपनिषद् अ. ११, वल्ली २, ३.

मनोरथ पुरविण्याला मी तयार आहें. परंतु आत्मविद्येचा आग्रह धरूं नकोस."

यमानें खूप प्रलोभन दाखविलें; परंतु नचिकेता भाळला नाहीं. त्यानें आपल्या ध्येयावरची दृष्टि बिलकुल चळूं दिली नाहीं. स्त्रीपुत्र, संपत्ति हेंच सर्वस्व असें मानणें हें ध्येयसिद्धीला मारक आहे. धीर पुरुषानें त्यांच्या पाशांत कायमचें गुंतून न पडतां आपलें ध्येय गांठलें पाहिजे हें तो पक्कें जाणत होता. त्यानें यमाला उत्तर दिलें, "यमधर्मा, हीं सुखें अनित्य म्हणजे अल्प काळ टिकणारीं आहेत. शिवाय त्यांच्या उपभोगानें मनुष्याच्या तेजाचा नाश होतो. तुझ्या-सारखा उदारधी माझ्यावर प्रसन्न झाला आहे. मग मला कोणत्या वस्तूच न्यून आहे? म्हणून मी यांपैकीं एकहि वस्तु तुझ्यापाशीं मागूं इच्छीत नाहीं. कामधेनु प्रसन्न झाली असतां तिच्याजवळ कोरान्न मागणें वेडेपणाचें नाहीं काय? यमधर्मा, मला मोक्षमार्ग दाखीव. हा नचिकेता कसल्याहि वैभवाला अथवा विलासाला भुलून अन्य वर मागील ही आशा तूं धरूं नकोस."

शिष्य विवेकवैराग्यसंपन्न झाला आहे व त्याच्या अंतःकरणांत तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली आहे अशी खात्री करून घ्यावी व मगच त्याला आत्मविद्येचा उपदेश करावा असा नियम आहे. नचिकेता या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला आला. यमानें त्याची अगदीं कसून परीक्षा घेतली हें तुम्हीं पाहिलेंच आहे. नचिकेतानें आपल्या डोळ्यांपुढें उदात्त ध्येय ठेवलें होतें. त्या ध्येयापासून त्याला परावृत्त करण्यासाठीं यमानें त्याच्या पुढें सुंदर सुंदर मोहांचें जाळें पसरलें. परंतु नचिकेता त्याच्यामध्यें सांपडला नाहीं. नचिकेता तीव्र जिज्ञासू व आत्मविद्येचा पूर्ण अधिकारी आहे अशी पक्की खात्री झाल्यावरच

यमानें त्याला आत्मविद्या उपदेशिली. मीं तुम्हांला ती अगदीं सार-रूपानें थोडक्यांत सांगावयाचें ठरविलें आहे.

यमधर्म नचिकेताला म्हणाला,

" मनुष्याच्या आयुष्यांत त्याच्यापुढें नेहमीं दोन प्रकारचीं सुखें येतात. एक सुख आरंभीं सेवनाला गोड असतें तर परिणामीं अहित-कारक असतें. दुसरें आरंभीं दुःखकारक असतें तर अंतीं कल्याण-प्रद असतें. पहिल्याला प्रेय व दुसऱ्याला श्रेय असें म्हणतात. या दोन सुखांपैकीं वाटेल तें सुख निवडण्याचें स्वातंत्र्य मनुष्याला आहे. मनुष्याचीं इंद्रियें त्याला पहिल्या सुखाच्या मागें जावें असा नेहमीं सल्ला देतात. जो पुरुष आपल्या इंद्रियांच्या सल्ल्याला बळी पडून या सुखाच्या मागें लागतो तो शेवटीं नाशाच्या खड्डयांत जाऊन पडतो. उलट जो पुरुष धीर व बुद्धिमंत असतो तो आपल्या इंद्रियांना ताब्यांत ठेवून दुसऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करतो व शेवटीं आपलें खरें कल्याण साधतो. हा पुरुष अविद्येचा त्याग करून विद्येची इच्छा करतो. ज्याप्रमाणें आंधळा आंधळ्याला मार्ग दाखवूं शकत नाहीं, त्याप्रमाणें जो गुरु ब्रह्मवेत्ता नाहीं व कुशल वक्ता नाहीं तो ब्रह्मविद्येचें ज्ञान देऊं शकत नाहीं. कारण हें ज्ञान फार गहन आहे. केवळ तर्कानें तें प्राप्त होत नाहीं. निपुण गुरूच्या शिक्षणानें संस्कारित झालेल्या स्थिर व शुद्ध बुद्धीनेंच तें मिळवितां येतें. बुद्धि संस्कारानें स्थिर व शुद्ध झाली म्हणजे आपल्या अंतःकरणांत खोल असलेल्या आत्म्याचें आपल्याला दर्शन होतें. पुरुषाला परमात्म्याचें एकदां दर्शन झालें म्हणजे तो हर्षशोकांच्या पलीकडे जातो. हा आत्मा जन्मत नाहीं व मरत नाहीं. आणि देहाबरोबर त्याचा नाश होत नाहीं. हा आत्मा मोहरीहूनसुद्धां लहान आहे, तर मेरुपेक्षांहि मोठा आहे. तुम्हीं पुष्कळ पुस्तकें वाचलींत, किंवा पुष्कळ

बुद्धि चालवलीत अगर अनेक कथा अथवा पुराणें ऐकलींत तर या आत्म्याची तुम्हांला प्राप्ति होईल असें समजूं नका; त्याच्या प्राप्तीची तुम्हांला खरोखरच तळमळ लागली आहे अशी त्याची खात्री झाली तरच तो तुम्हांला दर्शन देईल. जोंपर्यंत तुम्हीं वाईट कार्य करण्याचें सोडलें नाहीं, जोंपर्यंत तुमचा स्वार्थ सुटला नाहीं, जोंपर्यंत तुमचें मन शांत झालें नाहीं, तोंपर्यंत तुमची विद्वत्ता फुकट आहे व हा आत्मा तुमच्यावर प्रसन्न होणार नाहीं. गाडीवान जर चांगला हुशार नसेल व तो घोड्यांचा लगाम खेचून न धरतां सैल सोडील तर घोडे चांगला व सरळ रस्ता टाकून आड रस्त्याला लागल्यावांचून राहणार नाहींत. एखादे दिवशीं तरी हे घोडे गाडी खड्ड्यांत नेऊन घालतील व गाडीवान व गाडींत बसलेलीं माणसें यांचे हातपाय मोडल्याशिवाय राहणार नाहींत. आपलेंहि पण अगदीं हुबेहूब तसेंच आहे. आपली बुद्धि आपल्याला एखादी गोष्ट करूं नकोस असें सांगते. तसें करण्यांत तुझें हित नाहीं असें ती आपल्याला बजावीत असते, परंतु आपलें मन आपल्या बुद्धीविरुद्ध बंड करतें. क्षणिक सुखाला भुलून तें आपल्याला सांगतें कीं, ' बुद्धीचें ऐकूं नकोस. बुद्धीला कांहींच समजत नाहीं. कर्तव्याचा अगर नीतीचा विनाकारण बागुलबुवा करण्याची वाईट खोड तिला लागली आहे. ' मौज अशी आहे कीं, आपलीं इंद्रियें आपल्या बुद्धीपेक्षां आपल्या मनाचें अधिक ऐकतात. कारण त्यांना सुखाची चटक लागलेली असते व बुद्धि मनाप्रमाणें चालल्यास केवळ जिभेलाच काय परंतु सर्वच इंद्रियांना उपवास करावे लागतील अशी त्यांना भीति वाटते. म्हणून हीं इंद्रियें मनाची बाजू घेतात. बुद्धि नको नको म्हणत असतांनाहि तीं मनाला आपल्यामागें खेंचून घेऊन जातात. एकदां मनाचा लगाम सैल सुटला कीं मग बुद्धीचें कांहींहि चालेनासें होतें व मग क्षणिक

सुखाच्या लालसेनें खोडकर घोड्याप्रमाणें तीं आपल्याला कोठें तरी खड्ड्यांत नेऊन टाकतात. म्हणून आपण आरंभापासून बुद्धीच्या सल्ल्याप्रमाणें चालण्याची मनाला संवय लावली पाहिजे. आपलें मन एकदां आपल्या ताब्यांत आलें कीं, मग इंद्रियांचें बंड फार वेळ टिकत नाहीं. मनाचें साहाय्य घेऊन बुद्धि तें लवकरच मोडून टाकते. अशा रीतीनें आपल्या जीवनांत बुद्धीचें एकतंत्री राज्य सुरू झालें कीं मग मन व शरीर आपलें खरें कल्याण असेल तेवढ्याच गोष्टी करतात. आपली बुद्धि व मन प्रसन्न होऊन आपल्याला खरें सुख मिळतें व शेवटीं आपल्याला परमात्म्याची प्राप्ति होते.

परमात्मा सर्वांत श्रेष्ठ आहे. त्याच्याहून श्रेष्ठ असें कांहींहि नाहीं. त्याची प्राप्ति करून घेणें हाच सर्वांत श्रेष्ठ पुरुषार्थ होय. उठा; सावध व्हा. उत्तम प्राप्तव्यें समजावून घ्या—म्हणजे—ध्येय निश्चित ठरवा. तरवारीच्या तीक्ष्ण धारेप्रमाणें ह्या ब्रह्मपदाच्या मार्गाची कठिणता आहे असें अनुभवी विद्वान् सांगतात."

माझ्या तरुण मित्रांनो, कुमार नचिकेतानें जागृत राहून ही विद्या संपादन केली. तुम्ही त्याच्याप्रमाणें जागृत राहून सर्व विद्या संपादन करा. नचिकेताप्रमाणें तुमचेंहि कल्याण होईल ही खात्री बाळगा. . .

[ लहानपणीं आपल्या आईबरोबर किंवा वडिलांबरोबर सुंदर चित्रांच्या किंवा खेळण्यांच्या दुकानांत कधीं गेलेलें तुम्हांला आठवतें कां? सगळ्याच वस्तु सुंदर असतात, आणि वडील सांगतात, ' बाळ, तुला आवडेल ती कोणतीहि एक वस्तू पसंत कर. ' त्या वेळच्या मनःस्थितीचें स्मरण करा. एक क्षण वाटतें कीं हें घ्यावें तों दुसऱ्याच क्षणीं वाटतें, नाहीं, तें घ्यावें. मन अगदीं भांबावून जातें. वडील सर्वच वस्तू घ्यायला कां सांगत नाहींत याबद्दल मनाला खंती वाटते. वडिलांच्या कंजूष वृत्तीचा थोडा रागहि येतो. माझ्या मित्रांनो, तुमच्या पाठांतरासाठीं या उपनिषदांतील कांहीं श्लोकांची निवड करतांना, मी इतका मोठा झालों आहें तरी माझें मन अगदीं बालमन

बनलें आहे. उपनिषदें म्हणजे रत्नभांडार आहे. त्यांपैकीं कोणतें निवडावें आणि कोणतें निवडूं नये? वाटतें सर्वच निवडावींत. मन आवरलें तरी एखाददुसरें अधिक हातांत येतेंच. रत्नच आहे. धारण केलेंत तर वांया जाणार नाहीं; शोभाच वाढवील. ]

श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेत-
स्तौ संपरीत्य विविनक्ति धीरः।
श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते
प्रेयो मंदो योगक्षेमाद् वृणीते ॥ १-२-२ ॥
अविद्यायामन्तरे वर्तमानाः
स्वयं धीराः पण्डितं मन्यमानाः।
दन्द्रम्यमाणाः परियन्ति मूढा
अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ॥ १-२-५ ॥
न जायते म्रियते वा विपश्चि-
न्नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित्।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ १-२-१८ ॥
नायमात्मा प्रवचनेन लभ्यो
न मेधया न बहुना श्रुतेन।
यमेवैष वृणुते तेन लभ्य-
स्तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ॥ १-२-२३ ॥
आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रगहमेव च ॥ १-३-३ ॥
इंद्रियाणि हयानाहुर्विषयान् तेषु गोचरान्।
आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥ १--३--४ ॥
विज्ञानसारथिर्यस्तु मनः प्रग्रहवान्नरः।
सोऽध्वनः परमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ॥ १-३-९ ॥

इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान्परः ॥ १-३-१० ॥
महतः परमव्यक्तमव्यक्तात्पुरुषः परः ।
पुरुषान्न परं किंचित्सा काष्ठा सा परा गतिः ॥१-३-११॥
उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।
क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ॥
१-३-१४ ॥

---

## गोष्ट ३ री*

# खरी उपासना

शौनक व अभिप्रतारी या नांवांचे दोन ऋषि होते. ते वायुदेवाचे उपासक होते. त्यांच्यासाठीं भोजनाचीं ताटें वाढून तयार होतीं. इतक्यांत एक ब्रह्मचारी आश्रमाच्या दारांत येऊन उभा राहिला. त्यानें त्यांच्यापाशीं अन्नाची भिक्षा मागितली. ऋषींनीं उत्तर दिलें,

" येथें अन्न मिळणार नाहीं. "

ऋषींचें हें उत्तर तुम्हांला मोठें चमत्कारिक वाटेल. मला वाटतें, मुलांनो, आश्रमवासी ऋषींच्या या उत्तरानें त्या ब्रह्मचाऱ्याला सुद्धां थोडा धक्का बसला असेल. येथें आपल्याला असें उत्तर मिळेल अशी त्याची अपेक्षा खास नसावी. परंतु तुम्हांला अशा माणसांचा अनुभव आहे किंवा नाहीं तें मला ठाऊक नाहीं. परंतु माझ्या मित्रांनो, मला पुष्कळ लोकांचा तसा अनुभव आहे. या लोकांना भोजनाच्या

---

* छांदोग्योपनिषद्, अ. ४, खं. ३.

पूर्वी वैश्वदेव ( नारायणाची अग्नीच्या रूपानें उपासना ) झाला नाहीं तर मोठा अधर्म झाला असें वाटतें. परंतु वैश्वदेव झाल्यानंतर काकबळी टाकण्याच्या वेळीं जर तोच नारायण भिकाऱ्याच्या रूपानें त्यांच्या दारासमोर येऊन उभा राहिला तर मात्र त्याला ते ओळखत नाहींत. त्या भिक्षेकऱ्याच्या अगर याचकाच्या अंगावर ते वसकन् धांवून जातील. काकाला बळी देण्यांत आपण मोठा धर्म करीत आहों असें या लोकांना वाटत असतें. परंतु त्या वेळीं मनुष्याला अन्नाचे चार घास न देण्यांत आपल्या हातून मोठा अधर्म होत आहे हें त्यांच्या ध्यानांत कसें येत नाहीं कोणाला ठाऊक? हा अधर्म त्यांच्या हातून सहेतुक घडतो असें, मुलांनो, मला म्हणावयाचें नाहीं. त्यांची धर्माची कल्पनाच फार संकुचित असते, एवढेंच मला तुम्हांस सांगावयाचें आहे. धर्मामध्यें केवळ कर्मठपणा आला कीं, त्यांतील चैतन्य नष्ट होतें. आणि मग काकाला बळी देणें हा जितका धर्म त्याच्या शतपटीनें ‘ नित्य तोषवावी कोणी एक काया ’ हा श्रेष्ठ धर्म आहे याचा त्या धर्माच्या अनुयायांना विसर पडतो. आपल्या या ऋषिद्वयांची थोडीशी अशीच स्थिति झाली होती. तथापि जरी त्यांनीं त्या ब्रह्मचाऱ्याला अन्नाची भिक्षा घालण्याचें नाकारलें होतें तरी त्या ब्रह्मचाऱ्यानें त्यांना ज्ञानाचें दान करण्याचें ठरविलें व ते ज्या देवाची उपासना करीत होते त्याची खरी उपासना कोणती हें त्यांना समजावून दिलें. त्यानें त्या ऋषींना प्रश्न केला,

“ तुम्ही कोणत्या देवाचे उपासक आहां ? ”

ऋषि—वायु म्हणजे प्राणदेवाचे.

ब्रह्मचारी—हा वायु सर्वव्यापी असून त्याच्यापासून सर्व जगाची उत्पत्ति होते व त्यांतच त्याचा लय होतो, हें तुम्हांला ठाऊक आहे काय?

ऋषि—होय, ठाऊक आहे.

ब्रह्मचारी—हें अन्न तुम्हीं कोणत्या देवासाठीं तयार केलें आहे ?

ऋषि—ज्याचे आम्ही उपासक आहोंत त्या वायुदेवासाठीं.

ब्रह्मचारी—हा वायु आपल्या व्यापकपणानें सर्व जगाला व्यापून राहिला असल्यामुळें तो तुमच्या डोळ्यांना दिसत नाहीं, तथापि तो इतर वस्तूंप्रमाणें माझ्यामध्येंहि आहे, खरें ना ?

ऋषि—होय.

ब्रह्मचारी—माझ्यामध्यें हा वायु किंवा प्राणदेव आहे. तेव्हां मला अन्न देण्याचें तुम्ही नाकारतां म्हणजे तुम्ही ज्या देवाचे उपासक आहांत त्याचीच अवज्ञा करीत नाहीं काय ?

ऋषींना सर्वव्यापी परमेश्वराची खरी उपासना म्हणजे काय हें समजलें. त्यांनीं त्या ब्रह्मचाऱ्याला सन्मानानें आंत बोलावून त्याला मोठ्या आनंदानें भोजन दिलें व त्याला संतुष्ट केलें. त्याला संतुष्ट करणें म्हणजे आपल्या उपास्य देवालाच संतुष्ट करणें हें त्यांना आतां पटलें होतें.

मुलांनो, नराच्या ठिकाणीं नारायण वसत आहे हें समजून-त्याची सेवा करणें ही खरी ईशोपासना होय. आज हिंदु समाजांत धातूंच्या देवाच्या अन्नासाठीं, वस्त्रासाठीं, शेजेसाठीं, विलासासाठीं, घरासाठीं ( मंदिर ) लाखों करोडों रुपये खर्च होत आहेत. तरीही परमेश्वर आज हिंदु समाजावर रुष्ट झालेला दिसतो याचें कारण काय बरें ? याचें कारण शोधावयाला तुम्हांला फार दूर जावें लागणार नाहीं. मी तें तुम्हांला सांगतों. श्रीसमर्थ जर फिरून ‘ धर्म-रक्षायाकारणें ’ आपल्यामध्यें येतील तर ते तुम्हांआम्हांला सांगतील, “ बाबांनो, ‘ जनीं थोरला देव तो चोरलासे । ’ तुमच्यामध्यें खरा देव

मुळीं राहिलेलाच नाहीं. हा थोरला देव संगमरवरी दगडांच्या देवळांत अथवा सोनें, चांदी, वगैरे धातूंच्या मतींत नसून चैतन्यमय सुंदर नरदेहांत आहे." खरोखर हिंदु समाजाला या गोष्टीचें विस्मरण पडलें आहे. तेव्हां इकडे धर्म व देव यांच्या नांवाखालीं लाखों करोडों रुपयांचा चक्काचूर होत आहे व तिकडे लाखों करोडों लोकांना पोटभर अन्न मिळत नाहीं, अंगावर वस्त्र मिळत नाहीं, निजावयाला कांबळ्याचें पटकूरसुद्धां मिळत नाहीं, राहावयाला एक छोटीशी खोपटीहि मिळत नाहीं, असें चमत्कारिक दृश्य आज हिंदु समाजांत दिसत आहे. ज्या समाजांत खरा देव वावरत आहे त्या समाजामध्यें चार कोट लोक अस्पृश्य समजले जाऊन मनुष्यत्वाला पारखे होणें कधीं तरी शक्य आहे काय? मुलांनो, तुम्ही कधीं एखाद्या बागेंत जाऊन तेथें फळझाडें व फुलझाडें यांना पाणी देण्याची कशी नीट व सुंदर व्यवस्था केलेली असते ती पाहिली आहे काय? मोटेचें अगर पंपाचें पाणी विहिरींतून वर आलें म्हणजे तें प्रथम थारोळ्यांत पडतें; तेथून तें मोठ्या पाटानें बागेंत नेलें जातें. या मोट्या पाटालाच लहान लहान दुसरे पाट काढलेले असतात. हे लहान पाट झाडाच्या भोंवतीं केलेल्या आळ्यांत हें पाणी नेऊन पोहोंचवतात. तेथें तें पाणी झाडांच्या मुळांना जाऊन पोहोंचतें. बागेंत पाणी खेळण्याची अशी नीट व्यवस्था केलेली असते म्हणूनच तें निरुपयोगी न होतां झाडांना मिळतें व त्यामुळें झाडांना फुलांचा व फळांचा बहर येतो. पाण्याची अशी व्यवस्था न करतां जर तें विहिरींतून नुसतें बागेंत सोडून दिलें तर तें बागेंतील व पाटाबांधावरील गवत वाढवण्याला मदत करील व त्यामुळें झाडांना त्रास पोहोंचून बागेची नासाडी करील. हीच स्थिति धर्माच्या नांवाखालीं होणाऱ्या उपासनेवरील व दानावरील खर्चाची आहे. ही रक्कम,

भुकेलेल्यास अन्न, तृषिताला पाणी, वस्त्रहीनाला वस्त्र, अशिक्षिताला शिक्षण, निरुद्योग्याला उद्योग, आजाऱ्याला औषध व निराश्रिताला आश्रय देण्यांत खर्च झाली तरच ती नारायणाची उपासना होईल व खऱ्या धर्माचें पालन होईल. कारण यांपैकीं कोणाचीही केलेली सेवा परमेश्वराचीच सेवा होय. आणि तीच परमेश्वराच्या घरीं रुजू होते. मुलांनो, आपल्या ब्रह्मचाऱ्यानें त्या ऋषिद्वयाला या खऱ्या सर्वव्यापी धर्माचा व उपासनेचा उपदेश केला. आज हिंदु समाजाला अशा शेंकडों हजारों ब्रह्मचारी उपदेशकांची जरूरी आहे. माझ्या मित्रांनो, तुमच्यापैकीं कांहीं थोडेजण तरी या ब्रह्मचाऱ्याचा आदर्श आपल्या डोळ्यांपुढें ठेवतील काय?

---

## गोष्ट ४ थी*

## गर्वहरण

देवांनीं दानवांचा पराभव केला. देवांनीं मोठें सामर्थ्य प्रगट केलें व त्यांचा मोठा उत्कर्ष झाला. देव खरे, परंतु या सामर्थ्यानें व उत्कर्षानें लोहाराच्या भात्याप्रमाणें गर्वानें फुगले. साधा वर्गांत पहिला नंबर आला तर आपल्याला अस्मान ठेंगणें होतें. मग देवांनीं तर सामर्थ्य व उत्कर्ष दोन्हींहि संपादन केलीं होतीं. विजयाच्या मदानें ते आपल्या धन्याला विसरले. हें सर्व सामर्थ्य ब्रह्माचें असून त्याच्यापासून तें आपल्याला मिळालें आहे व आपल्यांत स्वतंत्र सामर्थ्य नाहीं या गोष्टीचें भान देवांना राहिलें नाहीं.

* केनोपनिषद्, खं. ३ व ४.

मुलांनो, तुमच्यापैकीं कांहीं मुंबईंतीलच राहणारे असतील, तर कांहींनीं मुंबई पाहिली असेल. मी ज्याचें आतां वर्णन करीत आहें तें दृश्य त्यांनीं स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें असेल. मुंबई कलकत्त्यासारख्या मोठया शहरांतून रहदारी व वाहतूक फार मोठी असते. मोठमोठ्या चौकांतून या रहदारीचें जर नियमन केलें नाहीं तर रोज किती तरी अपघात व भयंकर नुकसान होईल. तें टाळण्यासाठीं सरकार पोलिसांच्या मार्फत हें नियमन करतें. प्रजेच्या पैशांतूनच सरकारचा सर्व खर्च चालतो; तेव्हां प्रजेच्या जीविताचें व मत्तेचें रक्षण करणें हें सरकारचें कर्तव्यच ठरतें. चौकांत उभा असलेला पोलिस आपल्या एका अंगुलीनें हें सर्व नियमन करतो. त्याच्या या अंगुलीमध्यें इतकें विलक्षण सामर्थ्य असतें कीं त्यानें ती वर केल्याबरोबर लक्षाधीशाची अगर बड्या सरकारी अंमलदाराची कोणाचीहि गाडी असली तरी ती ताबडतोब थांबलीच पाहिजे. ती चिमकुली अंगुली परवानगी देईल तेव्हांच ती गाडी पुढें सरकूं शकते. आतां जर या शिपायाला आपल्या अंगुलीचें हें सामर्थ्य कोठून आलें हें समजलें नाहीं व जर हें सामर्थ्य आपलेंच आहे असें समजून तो गर्वानें लाटण्यासारखा ताठ झाला तर तुम्हीं त्याला हंसाल व वाकुल्या दाखवाल किंवा नाहीं? ‘तेवढा पट्टा खालीं काढून ठेव, आणि मग एखाद्या चौकांत जाऊन तुझी अंगुली वर कर, म्हणजे काय चमत्कार होतो तो तुला दिसेल. गाडी थांबणें दूरच राहिलें, परंतु घोड्यांच्या ऐवजीं तुझ्या पाठीवर चाबकाच्या वादीचा आवाज झाला नाहीं म्हणजे मिळविली,’ असें तुम्ही त्याला बजावाल कीं नाहीं? तुमच्याच प्रमाणें ब्रह्मालाहि असें वाटलें कीं, देवांच्या डोळ्यांत चांगलें झणझणीत अंजन घालून त्यांचा अकारण गर्व काढून टाकावा व त्यांची खरी योग्यता काय

आहे ती त्यांना दाखवावी. ब्रह्मानें तेजाचें रूप धारण केलें व तें देवापुढें येऊन उभें राहिलें.

तें विलक्षण तेज पाहून देवांची तारांबळ उडाली. ही काय गदा आपल्यावर येऊन कोसळली आहे हें त्यांना समजेना. त्याचा शोध काढून आणण्यासाठीं अग्नीला त्याच्याकडे पाठविण्याचें देवांनीं ठरविलें व त्याप्रमाणें त्याला विनंति केली. अग्नीनेंहि मागचा पुढचा विचार न करतां मोठ्या डौलानें देवांची कामगिरी मान्य केली व तो मोठ्या आवेशानें त्या तेजापुढें येऊन दाखल झाला. त्या तेजानें अग्नीला प्रश्न केला, " तूं कोण आहेस ? "

अग्नीनें उत्तर दिलें, " मी अग्नि आहें. मला ' जातवेदस् ' म्हणजे सर्व पदार्थांत असणारा या नांवानेंहि लोक ओळखतात."

देवळांतील कुंचा किंवा चवरी मुद्दाम उंच ठिकाणीं बांधून कां ठेवतात याचें कारण, मुलांनो, तुमच्या कधीं ध्यानांत आलें आहे काय ? तुमच्या ध्यानांत आलें नसेल तर मी तुम्हांला सांगतों. ' येणाऱ्या जाणाऱ्या आबालवृद्धांना ती दिसावी म्हणून.' जी गोष्ट चवरीची तीच गोष्ट पुष्कळ पदवीधरांच्या पदवीची. आपली पदवी काय आहे हें सर्व लोकांना समजावें ही यांच्या मनाची मोठी मनीषा. जेथें जेथें आपल्या नांवाचा उच्चार करण्याची किंवा लिहिण्याची संधि त्यांना मिळते तेथें तेथें त्याच्या मागें आपल्या पदवीचीं अक्षरें उच्चारण्याला अगर लिहिण्याला ते कधीं चुकत नाहींत. परंतु माझ्या मित्रांनो, मी तुम्हांला तुमच्या हिताची एक गोष्ट सांगतों. समाजांत केवळ पदवी-वरून मनुष्याची पायरी ठरत नाहीं. अंगीं पुष्कळ दुसरे गुण असले तरच समाजांत खरी मान्यता मिळते; हें तुम्ही सदैव ध्यानांत ठेवा. त्या तेजानें " तूं कोण आहेस ? " असा अग्नीला प्रश्न केला असतां " मी अग्नि आहें " असा साधा जबाब न देतां " उष्णतेच्या रूपानें

सर्व पदार्थांवर अंमल चालविणारा मी अग्नि आहें," असा त्यानें दर्पोक्तिपूर्ण जबाब दिला. त्या ब्रह्मानें त्याला विचारलें,

" त्या तुझ्या ठिकाणीं काय सामर्थ्य आहे ? "

" जें हें पृथ्वीवर आहे तें सर्वहि मी जाळीन. "

गर्वाची धुंदी येणें असें म्हणतात तें, मुलांनो, किती सार्थ आहे ! कारण गर्विष्ठ मनुष्याला सर्व जग तुच्छ वाटूं लागतें व समोर कोण व काय आहे हें त्याला दिसत नाहीं. त्याचप्रमाणें गर्वाला विधायक कार्यापेक्षां विध्वंसक कार्य अधिक प्रिय असतें. साहजिकच आहे. तसें नसतें तर गर्वाचें घर केव्हांना केव्हां जें खालीं येतें तें मुळींच आलें नसतें. उष्णतेशिवाय प्राणिमात्राचें एक क्षणभरहि चालणार नाहीं. मुलांनो, आपल्या अंगांतील सर्व उष्णता नष्ट झाली तर आपण चिखलाच्या गोळ्याप्रमाणें निर्जीव होऊन जाऊं. परंतु अग्नीला आपल्या या धारणा म्हणजे परोपकारी शक्तीचा अभिमान न वाटतां, आणि आपल्या सामर्थ्यानें सर्व जगाचा जाळून नाश करूं शकतों, या गोष्टींतच त्याला अनन्य धन्यता वाटली. त्या ब्रह्मानें ह्या अग्नीपुढें गवताची एक काडी टाकली व तें त्याला म्हणालें,

" हे अग्नि, ही तृणाची एवढी काडी जाळ. "

अग्नीनें त्या काडीवर झडप टाकली. परंतु त्याला ती काडी जाळतां आली नाहीं. अग्नि तोंडांत मारल्याप्रमाणें मुकाट्यानें जेथें देव होते तेथें परत आला व त्यानें स्वमुखानें आपली झालेली फटफजिती देवांना निवेदन केली. त्याचे एकट्याचे डोळे उघडले. परंतु देवांचे अजून झांकलेलेच होते. देवांनीं अग्नीची कामगिरी वायूवर सोंपवली. 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' हा पाठ वायुमहाराजांच्या

गुरूनें त्यांना पढविला नव्हता किंवा गुरूनें पढविलेला असला तरी ‘ नळी फुंकिली सोनारें, आणि इकडून तिकडे गेलें वारें ’ अशी वायूची गत झाली होती. तो देवांच्या कामगिरीवर निघाला. लोकांनीं आपल्यावर सोंपविलेलें काम करण्याला आपण पात्र आहोंत किंवा नाहीं याचा पुरा विचार न करतां कीर्तीच्या आशेला अगर अन्य लोभाच्या बळी पडून तें काम आपल्या अंगावर घेणारे पुष्कळ लोक समाजांत असतात. वायु झपाट्यानें त्या तेजाकडे गेला. त्या तेजानें अग्नीप्रमाणेंच वायूलाहि प्रश्न केला,

“ तूं कोण आहेस ? ”

“ मी वायु किंवा मातरिश्वा म्हणजे आकाशांत संचार करणारा आहें. ” असें वायूनें उत्तर दिलें. मुलांनो, अग्नीप्रमाणेंच वायूहि आपली पदवी व कर्तबगारी सांगण्याला विसरला नाहीं हें ध्यानांत ठेवा. त्या ब्रह्मानें वायूला विचारलें,

“ त्या तुझ्या ठिकाणीं काय सामर्थ्य आहे ? ”

“ जें हें सर्व पृथ्वीवर आहे तें सर्वहि मी उडवून देईन. ”

“ असें का ! मग ही काडी उडवून दे पाहूं. ”

वायूनें त्या काडीवर अति वेगानें झडप घातली. परंतु तो त्या काडीला जमिनीवरून हलवूंहि शकला नाहीं. मग वर उंच उडविण्याच्या गप्पा दूरच राहिल्या.

अग्नि त्या काडीला जाळूं शकला नाहीं व वायु हलवूं शकला नाहीं. याचें कारण, माझ्या मित्रांनो, तुमच्या ध्यानांत आलेंच असेल. अग्नि व वायु यांच्या अंगीं जें सामर्थ्य होतें तें खरें त्या ब्रह्माचें सामर्थ्य होतें. देवांना स्वतंत्र सामर्थ्य नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांना

स्वतंत्र अस्तित्वहि नाहीं. एकाच ब्रह्माचीं हीं निरनिराळीं रूपें आहेत. व त्याचें एकत्वाचें सामर्थ्यच या देवांच्या करवीं या विश्वावर सत्ता चालवतें. आपण ' माणसें ' तर ही गोष्ट नेहमींच विसरतों. परंतु कधीं कधीं देवांनाहि या गोष्टीचें विस्मरण होतें! ब्रह्मानें या देवां-पासून आपली शक्ति आतां काढून घेतली होती. त्यामुळें विजयी अग्नि व वायु पराभूत होऊन परत आले.

राजाच्या खजिन्यामध्यें लाखों करोडों रुपये असतात. हा खजिना व त्याची किल्ली खजिनदाराच्या ताब्यांत असते. या रुपयांचा सर्व बटवडा खजिनदाराच्या सहीनेंच होतो. तथापि तो सर्व पैसा राजाचा असतो. त्या करोडों रुपयांपैकीं एक पैहि खजिनदाराच्या मालकीची नसते. रुपयांची देवघेव करतांना त्याचे हात मात्र काळे होतात. परंतु पुष्कळ वेळां या सत्याचें खजिन-दाराला विस्मरण होतें व आपण स्वतःच या खजिन्याचे मालक आहोंत या भ्रामक समजुतीनें तो त्या पैशाशीं खेळूं लागतो. डाव अंगावर येतो व हातचा मळ तोंडाला लागतो! राजा एका क्षणांत तो सर्व खजिना त्याच्यापासून काढून घेतो व तूं ' कुबेर नसून कंगाल आहेस ' हें त्याला तात्काळ सिद्ध करून देतो. त्या ब्रह्मानें अग्नीला व वायूला हेंच सिद्ध करून दिलें.

आपण पाठविलेल्या दोन्हीहि महावीरांची झालेली फजीति पाहूनहि देवांच्या डोळ्यावरील धूर नाहींसा झाला नाहीं. त्यांनीं आतां अगदीं निर्वाणीचा बाण म्हणून देवांचा राजा जो इंद्र त्याला त्या तेजाकडे जाऊन तें काय आहे हें पाहून येण्याची विनंति केली. इंद्र त्या तेजाकडे गेला. इंद्र जवळ येतांच तें तेज अंतर्धान पावलें व इंद्राला त्या ठिकाणीं हैमवती म्हणजे सुवर्णाप्रमाणें कांति असलेली उमा म्हणजे परमेश्वराचें ज्ञान असलेली परा देवता दिसली.

या वेळेला तेथें ज्ञानदेवतेनें प्रगट होणें किती प्रसंगोचित होतें ! देव मोठे शहाणे असून त्यांच्या हातून असें कसें वर्तन घडलें असा तुमच्यापुढें प्रश्न उभा राहिला असेल. परंतु मुलांनो, यांत तुम्हीं आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नाहीं. मनुष्य जितका अधिक शहाणा, शहाणा बरें का—ज्ञानी नव्हे, तितका तो गर्वाच्या डोहांत अधिक खोल बुडतो. कारण त्यानें गळ्यांत अहंकाराची धोंड बांधलेली असते. परंतु ज्ञानाचें तसें नाहीं. ज्याप्रमाणें वज्र पर्वताचा त्याप्रमाणें ज्ञान या गर्वाचा चक्काचूर करतें. ज्याला ज्ञान झालें त्याला मेरूच्या पुढें जशी मोहरी त्याप्रमाणें परमेश्वरापुढें आपण आहोंत ही जाणीव येते. ज्ञानसागराची खोली अगाध आहे. परंतु मनुष्य जेव्हां त्यामध्यें उडी घालतो तेव्हां विनय त्याला तारतो. हें ज्ञान देवांना होणें जरूर होतें. तेव्हां तें देण्याला ज्ञानदेवतेपेक्षां दुसरें अधिक पात्र कोण असणार ? इंद्रानें त्या देवतेला विचारलें:—

" हे देवी, जें तेज आतां अंतर्धान पावलें तें कोण व काय होतें ?"

देवी म्हणाली, " हे इंद्रा ! ज्याच्यापासून हें सर्व जग निर्माण झालें आहे व ज्याच्या सत्तेनें तें अनादि कालापासून चालत आहे तें ब्रह्मच तें तेज होतें. हे इंद्रा, तूंहि लक्षांत ठेव व इतर देवांनाहि जाऊन सांग कीं, जगांतील सर्व सामर्थ्य व उत्कर्ष हा त्या ब्रह्माचाच आहे. ज्या सामर्थ्यानें तुम्हीं जय मिळविला तें सामर्थ्य तुमचें नसून त्या ब्रह्माचें आहे. हें सत्य नेहमीं हृदयांत बाळगा व त्या ब्रह्मानें तुमच्यासाठीं जगद्व्यापारामध्यें जें कार्य नियोजित केलें आहे तें त्याचें आहे व आपण केवळ निमित्तमात्र आहोंत ही जाणीव ठेवून निरहंकार वृत्तीनें तें करीत राहा. "

मुलांनो, इंद्राकरवीं देवांना परमेश्वराचा एवढा निरोप सांगून ती देवी अंतर्धान पावली.

तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा वेदाः
सर्वांगानि सत्यमायतनम् ॥ ४–८ ॥

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।
अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥ २–३ ॥
आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥ २–४ ॥

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति
न चेदिहावेदीन्महती विनष्टिः ।
भूतेषु भूतेषु विचित्य धीराः
प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २–५ ॥

ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः । केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः । केनेषितां वाचमिमां वदन्ति । चक्षुःश्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥ १–१ ॥

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनः ।
न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यात् ॥ १–३ ॥
यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ १–७ ॥

---

## गोष्ट ५ वी*

# श्रेष्ठ कोण ?

मुलांनो, आमच्या वेळेला मराठी तिसऱ्या किंवा चवथ्या, नक्की स्मरत नाहीं, क्रमिक पुस्तकांत ' पोट व त्याचे अवयव ' यांची गोष्ट होती. पोट आयतोबासारखें बसून खातें अशी बाकीच्या अवयवांची

---

* छांदोग्योपनिषद्, अ. ५, खं. १, व बृहदा., अ. ६, ब्रा. १.

तक्रार होती व म्हणून त्यांनीं पोटाविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. हा बंडाचा अग्नि पुढें कसा विझला हें जाणण्याची तुमची इच्छा आहे होय? आपल्या अवयवांना आपल्या पोटाविरुद्ध बंड करायला सांगा म्हणजे तुम्हांला तें आपोआप समजेल. अशाच तऱ्हेचें भांडण फार प्राचीन काळीं प्राण, वाणी, कान, डोळे, मन वगैरे इंद्रियांमध्यें जुंपलें. चार माणसें एकत्र नांदूं लागलीं कीं, कांहीं काळानें तेथें ' कलह ' बुवानें प्रवेश केला म्हणून समजा. याचें कारण काय असावें बरें? जेव्हां डोंगरावर वणवा पेटलेला तुम्ही पाहतां तेव्हां इतक्या उंचावर जाऊन कोणीं आग लावली असावी याचें, मुलांनो, तुम्हांला मोठें कोडें पडतें नाहीं? परंतु त्यांत कोडें असें कांहींच नाहीं. तेथें जाऊन कोणी मुद्दाम आग लावीत नाहीं. फांदीवर फांदी घासून त्यांतून जी अग्नीची ठिणगी बाहेर पडते ती सर्व डोंगर जाळून टाकते. शेकडों हजारों कुटुंबांतील सुखाची राखरांगोळी कोण करतो? कुटुंबांतील स्त्री व पुरुष यांच्यामध्यें कुटुंबाचा खरा पोषणकर्ता कोण याच्याबद्दल तंटा लागतो. प्रत्येक माणसाला वाटतें, मीच खरा पोषण करणारा व म्हणून मला सर्वांनीं मान द्यावा; व माझ्या सुखासाठीं इतरांनीं झटावें. प्रत्येकाची कल्पना या बाबतींत निरनिराळी असल्यामुळें त्यांच्यामध्यें चुरस लागते व घासाघाशीला प्रारंभ होतो. या घासाघिशींतून जो मत्सराग्नि उत्पन्न होतो तो कौटुंबिक सुखाचा नाश करतो. जी गोष्ट कुटुंबाची तीच गोष्ट सार्वजनिक संस्थांची व संघटनांची. कुटुंबांतील काय किंवा संस्थेतील काय घटकांमध्यें निष्काम बुद्धीनें परमेश्वरासाठीं काम करण्याची वृत्ति नसेल तर हा नाश टळणें शक्य नाहीं.

प्राणादि इंद्रियांमध्यें हाच तंटा लागला होता. ' आपल्या सर्वांत श्रेष्ठ कोण?' हें तंटयाचें मूळ कारण होतें. खूप खडाजंगी झाली, परंतु

तंटा मिटण्याचीं शुभ चिन्हें दिसेनात. कान म्हणे "मी सर्वांत श्रेष्ठ", तर वाणी पुढें सरसावून कानाच्या अंगावर धांवून जाई व मोठ्यानें ओरडून म्हणे, "हे काना, फार शेफारून बोलूं नकोस. चूप बैस, नाहींतर एक चांगली कानशिलांत ठेवून देईन. मी सर्वांत श्रेष्ठ आहें." इतक्यांत डोळे, डोळे वटारून वाणीच्या अंगावर धांवून जात व मोठ्यानें ओरडून म्हणत, "हे जिभळे, किती चुरचुर बोलतेस? तोंड आवर. नाहींतर जीभ उपटून तुझ्या हातांत देईन. तुला समजत नाहीं का? सर्वांत श्रेष्ठ मी आहें." त्यांच्यापैकीं माघार कोणीच घेईना. परंतु अशीं भांडणार तरी किती वेळ? वाणीसुद्धां दमली. मग इतर इंद्रियांची काय कथा? तेव्हां तीं सर्व प्रजापतीकडे गेलीं व त्याचे पाय धरून त्याला म्हणालीं, "हे प्रजापति, आमच्यामध्यें सर्वांत श्रेष्ठ कोण, याबद्दल तंटा लागला आहे. आम्ही आपापसांत त्याचा सर्वमान्य निवाडा करूं शकत नाहीं. तेव्हां आम्ही तुला शरण आलों आहों. तूं जो निकाल देशील तो आम्ही सर्व मान्य करूं, असें आम्ही तुला आश्वासन देतों."

• माझ्या मित्रांनो, आपला तंटा आपण मिटवूं शकलों नाहीं तर दुसऱ्याचे पाय कसे धरावे लागतात याचें हें करुणाजनक चित्र आहे. आपल्या देशाच्या इतिहासाचीं पानें चाळा म्हणजे पानापानावर तुम्हांला अशीं कितीतरी चित्रें रेखाटलेलीं दिसतील! प्राणादि इंद्रियांना खरोखर तंटा करण्याचें कांहींच कारण नव्हतें. परमेश्वरानें त्यांना प्राण्याच्या शरिरांत निरनिराळीं स्थानें व कार्यें नेमून दिलीं होतीं. तींच आपल्याला योग्य असलीं पाहिजेत ही जाणीव ठेवून त्यांनीं वागावयाला पाहिजे होतें. बरें, तसें न करतां अविचाराच्या भरांत त्यांनीं तंट्याला प्रारंभ केला असला तरी थोड्या विचाराअंतीं त्यांना तो आपापसांत मिटवितां आला असता. परंतु मनुष्य एकदां

इरेला बळी पडला कीं मग त्याला मागचा पुढचा विचार राहत नाहीं व तो पागल बनून आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतो. परंतु नशीब त्या इंद्रियांचें कीं, ज्याच्याकडे आपला तंटा घेऊन तीं गेलीं होतीं तो प्रजापति निःस्वार्थी व न्यायी होता. दुसऱ्याच्या भांडणाचा फायदा घेऊन त्यानें तापलेल्या तव्यावर स्वतःची पोळी भाजून घेतली नाहीं. या मंडळींचें भांडण त्यानें मोठ्या खुबीनें सोडवून त्यांच्यामध्यें फिरून मिलाफ करून दिला. त्यांच्यामध्यें सर्वांत श्रेष्ठ कोण याचा निवाडा स्वतः न देतां तें ठरविण्याची त्यानें त्यांना एक नामी युक्ति सुचविली. तो म्हणाला,

"तुमच्यापैकीं जो निघून गेला असतां, शरीर तेजोहीन होईल व त्याचे व्यापार बंद पडतील तो सर्वांत श्रेष्ठ असें समजा."

अशी बिनतोड तोड सुचविल्यावर सर्व इंद्रियांनीं प्रजापतीला धन्यवाद दिले. सर्वच मनांतून हर्षभरित झालीं. कारण फक्त आपल्यावांचून शरिराचें खात्रीनें अडणार, अशी प्रत्येकाला मनांतून घमेंड वाटत होती.

हें दिव्य करण्याला प्रथम वाणी तयार झाली. अगदीं स्वाभाविक होतें. वाणीइतकें भांडकुदळ व आगींत तेल ओतणारें या जगांत, मुलांनो, दुसरें कोण आहे? मात्र स्वानुभवावरून सांगा हं. वाणी कराराप्रमाणें एक वर्ष बाहेर राहिली. हें सबंध वर्ष वाणीनें कोठें व कसें घालवलें असेल तें, मुलांनो, ओळखा पाहूं. माझ्या मतें तिनें तें सभेंतून वादविवाद करण्यांत घालविलें असलें पाहिजे! पहा तुमच्या मतांशीं माझें हें अनुमान जळतें कां तें. एक वर्ष वाग्युद्ध करून व असंख्य अजिंक्यपत्रें मिळवून वाणी मोठ्या दिमाखांत परत आली. ज्याप्रमाणें लावीचीं पिलें लावी पक्षिणीची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहत असतात त्याप्रमाणें सर्व इंद्रिय आपल्या

परत येण्याची मार्गप्रतीक्षा करीत असलीं पाहिजेत असें तिला वाटत होतें. आपण परत येण्याचा अवकाश कीं सर्व इंद्रियें आपला जयजयकार करतील या सुखस्वप्नाच्या पायघड्यांवरूनच ती परत चालत आली होती. पण पाहते तों काय चमत्कार! आपल्या गैरहजेरींत इंद्रियांचे सर्व व्यापार नीट व सुरळीत चालले आहेत व आपल्याला सर्व विसरून गेले आहेत, असें तिनें पाहिलें. वाणीची बोबडीच वळली. तिचा सर्व गर्व पार मावळला. तिनें बाकीच्या इंद्रियांना भीतभीत विचारलें,

"इंद्रियांनो, माझ्यावांचून तुमचें कसें रे चालूं शकलें?" इंद्रियांनीं एकच उत्तर दिलें,

"वाणी मावशी, मुक्याचें जसें चालतें तसेंच, मावशी काकू, तुझ्यावांचून आमचें विशेष कांहीं अडलें नाहीं."

मुक्याचें आपल्यावांचून चालतें हे शब्द कानांवर पडतांच वाणी मुकाट्यानें आपल्या मूळ स्थानीं जाऊन बसली.

वाणी हरली. परंतु डोळ्यांना वाटलें, "वाणी बोलून चालून अबला. तेव्हां ती हरली यांत कांहींच नवल नाहीं. परंतु आपलें तसें नाहीं. नेत्रावांचून आंधळें शरीर काय करणार?" एक वर्षानें आपण परत आलों आहों व सर्व इंद्रियें आपल्याला श्रेष्ठत्वाचा अभिषेक करीत आहेत असें दृश्य डोळ्यांना बाहेर पडण्यापूर्वींच दिसूं लागलें. त्यांनीं शरीर सोडलें. विश्वांतील नयनमनोहर दृश्यें पाहण्यांत एक वर्ष घालविल्यानंतर डोळे परत आले. पाहतात तों काय चमत्कार! आपल्या गैरहजेरींत शरिराचें बरेंवाईट कांहीं झालेलें नाहीं व त्याचे सर्व व्यापार नीट चालले आहेत, असें त्यांनीं पाहिलें. डोळ्यांची धुंदी उतरली. डोळ्यांचा अहंकार व्यर्थ ठरला. डोळ्यांच्या प्रमाणेंच,

मुलांनो, पुष्कळ माणसांना आपल्यामागें आपल्या कुटुंबाचें, आपल्या ज्ञातीचें, देशाचें अगर विश्वाचें कसें होईल याबद्दल चिंता पडते. भावी दुःखाची चिंता आपलें सध्यांचें सुख अर्धें जाळून टाकत आहे हें या वेड्यांच्या लक्षांत येत नाहीं. आपल्या कुटुंबाचें पोषण-कर्ते आपण आहोंत असा या मंडळींना अहंकार असतो. त्यांना परमेश्वराचें विस्मरण झालेलें असतें. ज्याला आपण आपलें कुटुंब म्हणतों तें आपलें नसून परमेश्वराचें आहे हें ज्ञान त्यांना नसतें. आपल्या कुटुंबाचा पाळनवाला व चिंता वाहणारा तो परमेश्वर आहे, असें जर यांना कोणीं समजावून सांगितलें तर त्यांची त्यावर श्रद्धा बसत नाहीं. परमेश्वरानें आपल्याला ज्या कुटुंबांत, ज्ञातींत, अगर देशांत जन्माला घातलें त्या कुटुंबाची, ज्ञातीची अगर देशाची निर-हंकार बुद्धीनें निष्काम सेवा निधनापर्यंत करावयाची एवढेंच आपलें कर्तव्य हें त्यांना समजत नाहीं. आपल्यामागें आपल्या कुटुंबाची सेवा करण्यास कोणी नाहीं या भ्रामक समजुतीला बळी पडून त्याची दूर कालपर्यंतची तरतूद करून ठेवण्यासाठीं ते ज्ञातीचें व देशाचें अहित करतात. हे लोक परत येऊन पाहतील तर आपली चिंता व स्वार्थ व्यर्थ होता हें त्यांना दिसल्याशिवाय खास राहणार नाहीं. असो.

डोळ्यांना मोठा अचंबा वाटला व त्यांनीं प्राणादिकांना विचारलें, "माझ्यावांचून तुम्ही कसे जगूं शकलांत?" त्यांनीं उत्तर दिलें,-- "जसा आंधळा जगतो त्याप्रमाणें."

आंधळ्याचें आपल्यावांचून चालतें, त्याचे व्यापार अडून राहत नाहींत, हें ऐकतांच डोळे अचूक आपल्या ठिकाणीं जाऊन बसले.

आतां कानांची पाळी आली. डोळ्यांचे डोळे उघडले, तथापि तेवढ्यावरून कानांनीं काय म्हणून शहाणें व्हावें? कानांना वाटलें

कीं जर आपण लांब गेलों तर आपल्यावांचून शरिराचें खास चालणार नाहीं. ठरावाप्रमाणें ते बाहेर पडले. एक वर्षपर्यंत जगामध्यें जें कांहीं म्हणून श्रुतिमनोहर होतें तें श्रवण करून श्रोत्र परत आले. या एका वर्षाच्या दौऱ्यांत कानांस पुष्कळ बहिरे भेटले होते व त्यांचे व्यवहार आपल्याशिवाय सुरळीत चालूं शकतात हें त्यांनीं दुरून कां होईना, परंतु पाहिलें होतें. तेव्हां परत आल्यावर त्यांना वाणी व डोळे यांच्याप्रमाणें अनुभव आला तर त्यांत नवल काय ? कानठळ्या बसतील इतक्या जोरानें कानांनीं जाहीर केलें कीं, आपण फिरून ‘ श्रेष्ठ कोण ’ याबद्दल भांडण करणार नाहीं व ते आपल्या कामावर रुजू झाले.

मुलांनो, वाणी गप्प बसली तरी नेत्रांनीं ऐकलें नाहीं, जेव्हां नेत्रांच्या डोळ्यांत चांगलें अंजन पडलें तेव्हां कानांनीं मनावर घेतलें नाहीं. आतां कानांना चांगल्याच कानपिचक्या बसल्या तेव्हां मन भडकलें. तें जें बाहेर सटकलें तें एक वर्षभर सारख्या पृथ्वीप्रदक्षिणा करीत राहिलें. माझ्या अंगावरचे केंस किती आहेत हें, माझ्या मित्रांनो, मला तुम्हांला एक वेळ सांगतां येईल; परंतु मारुतीवेगी मनानें या एका वर्षांत एकंदर किती पृथ्वीप्रदक्षिणा केल्या हें मला सांगतां येणार नाहीं. परंतु त्यामुळें मनाचा एक मोठा चांगला फायदा झाला. या काळांत त्याला प्रत्येक वेळेला नवीन नवीन जन्माला आलेलीं शेकडों, हजारों मुलें भेटलीं. या मुलांना पाहून मन अगदीं थक्क होऊन गेलें. जणुं काय तीं मनाला मुळीं ओळखतच नाहींत अशा रीतीनें या मुलांचा व्यापार चाललेला मनानें पाहिला. चांगले वाईट, काळे गोरे असा भेद हीं मुलें आपल्या व्यापारांत करीत नाहींत हें लक्षांत येण्याला सूक्ष्म मनाला फारसा अवधि लागला नाहीं. आणि ही निवड करण्याची शक्ति हा तर आपला विशेष गुण अशी

मनाला घमेंड होती. आणि ही शक्ति तर या मुलांत मनाला कोठेंच दिसेना. तथापि या मुलांचे सर्व व्यापार नीट चालले होते व तीं मुलें दिवसेंदिवस वाढत होतीं व आपल्या बालचेष्टांनीं आपल्या मातापित्यांना स्वर्गीय आनंद भूतलावरच देत होती. मनानें या गोष्टीवर खूप मनन केलें व तें मुकाट्यानें मागें मुरडलें. जसें पिकलेलें फळ देठापासून आपोआप गळून पडतें त्याप्रमाणें मनाचा अहंकार गळून पडला. त्यानें शरिरांतील आपलें स्थान घेतलें व पूर्ववत् व्यापार सुरू केला. मुलांनो, तें बिचारें मन बरेच दिवस हिरमुसलेलेंच राहिलें.

आतां पाळी आली प्राणाची. पराजित होऊन सर्व इंद्रियें आपापल्या ठिकाणीं चूप बसलीं होतीं तरी या शर्यतींत प्राणावर चांगलेंच संकट बेतणार अशी त्या सर्वांना मनांतून पक्की खात्री वाटत होती. तीं सर्व आपल्या मनांत विचार करतीं झालीं. "प्राण तर धड ना वाणी, ना श्रोत्र, ना नेत्र, ना मन; मग त्याच्यावांचून शरिराचें कोठें व कसें अडणार? शरिराचें नाक, डोळे, वाणी, मन कायम असतां त्याला या प्राणाची काय पर्वा आहे? गरीब बिचारा प्राण एक वर्षभर भटक्या मारून धापा टाकीत परत येणार यांत तिळमात्र संशय नाहीं." इंद्रियें इतका विचार करतात न करतात इतक्यांत आपल्याला कोणी तरी जोराचा धक्का मारला असें त्यांना वाटलें. प्राणानें शरिराच्या बाहेर पुरतें पाऊल टाकलें नाहीं तोंच सर्व इंद्रियांना वाटलें कीं जणुं आपले स्वतःचेच प्राण बाहेर जात आहेत. वाणी लुळी पडली, डोळे पांढरे झाले, कान बधीर झाले व मनाचें मनपण गेलें. या इंद्रियांची सर्व शक्ति नष्ट झाली. तेव्हां इंद्रियांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. वाणीला समजलें कीं, मी ज्या शक्तीनें बोलतें ती शक्ति माझी नसून प्राणाची आहे. वाणीप्रमाणेंच इतर सर्व इंद्रियांची

खात्री झाली कीं, आपण ज्या सामर्थ्यानें व्यापार करतों तें सामर्थ्य आपलें नसून प्राणाचें आहे. आपल्या सर्वांपेक्षां प्राण श्रेष्ठ आहेत हें त्यांना प्रजापतीनें येऊन सांगण्याची जरूरी उरली नाहीं. तेव्हां सर्व इंद्रियांच्यातर्फें वाणीनें प्राणांची स्तुति करण्यास प्रारंभ केला. ती म्हणाली, "हे भगवन्! तूं आमच्यांतून बाहेर जाऊं नकोस, एक वर्षच काय परंतु एक क्षणहि आम्ही तुझ्यावांचून राहूं शकत नाहीं. आमचें सामर्थ्य तें खरें तुझेंच सामर्थ्य आहे. तूं आमच्यामध्यें सर्वश्रेष्ठ आहेस. आम्ही तुला नमन करतों." वाणीचें प्राणाच्या स्तुतिपर भाषण संपतांच "प्राण की जय, प्राण की जय" असा सर्व इंद्रियांनीं जयघोष केला व वाणीच्या भाषणाला पुष्टि दिली. माझ्या मित्रांनो, प्राणाची ही स्तुति अवास्तव होती असें कोण म्हणेल? प्राण हाच सर्व इंद्रियांत श्रेष्ठ आहे. जसा दिवा मालवला कीं घरांत सर्वत्र अंधार पडतो त्याचप्रमाणें प्राणज्योत हरपली कीं, सर्व शरिरांत अंधःकार पडतो व शरिराचे व्यापार थांबतात. प्राण म्हणजे शक्ति. आणि म्हणूनच जेव्हां तुम्ही अगदीं थकून जातां तेव्हां म्हणतां कीं, माझ्यांत अगदीं प्राण उरला नाहीं. शक्तीवरच सर्व कार्यें अवलंबून आहेत. म्हणून तुम्ही या प्राणाची म्हणजेच शक्तीची उपासना करा व तिला प्रसन्न करून घ्या. तुम्हीं ही शक्ति मिळवलीत कीं, अभ्युदय व निःश्रेयस् तुमच्या हातांत आहे हें लक्षांत ठेवा.

## गोष्ट ६ वी*

# गुणांवरून वर्ण

सत्यकाम अगदीं एकटा पडला. त्याचे सर्व खेळगडी त्याला सोडून गेले होते. त्यांच्या आईबापांनीं त्यांचीं उपनयनें करून त्यांना विद्याध्ययनासाठीं गुरुगृहीं पाठवून दिलें होतें. बरोबरचे सर्व खेळगडी गुरुगृहीं जाऊन विद्याभ्यासाला लागले असतां, आपण मात्र माशा मारीत बसणें किंवा गांवांत भटक्या मारीत राहणें, माझ्या मित्रांनो, सत्यकामासारख्या हुशार व होतकरू मुलाला पसंत कसें पडावें? त्याच्या मनाला मोठी हुरहूर लागून राहिली. आपली आई आपलें उपनयन करून विद्यार्जनासाठीं आपल्याला गुरुगृहीं कां पाठवून देत नाहीं हें त्याच्या बालमनाला उमगेना. तो मोठा बुचकळ्यांत पडला. सत्यकामा, तूं पितृहीन व शिवाय एका दासीचा मुलगा. तुझी काळजी कोण वाहणार? परंतु जगानें आपली काळजी वाहिली नाहीं तरी आपण आपली काळजी घ्यावयाची व बालपणाचा बहुमोल काल फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं, असें सत्यकामानें ठरविलें. गुरुगृहीं जाऊन विद्याभ्यास करावयाचा असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला. गुरुगृहीं गेलें असतां आपलें स्वत:चें नांव, आपलें गोत्र म्हणजे आपल्या कुळाचें नांव वगैरे सांगावें लागतें ही माहिती त्याला होती, म्हणून तो आपल्या आईकडे गेला आणि तिला म्हणाला:

“आई मी ब्रह्मचारी होऊन विद्याभ्यासासाठीं गुरुगृहीं जाऊं इच्छितों. मीं कोणत्या गोत्राचा आहें तें मला सांगतेस?”

---

* छांदोग्योपनिषद्, अ. ४, खं. ४.

मुलाचा प्रश्न अगदीं साधा व सरळ होता, परंतु तिला तो मोठा अवघड लागला असावा. मुलाच्या त्या एका प्रश्नामुळें तिच्या पूर्व चरित्राचा चित्रपट तिच्या डोळ्यांपुढें सुरू झाला असला पाहिजे. तथापि आपल्या मुलापासून सत्य लपवून ठेवावयाचें नाहीं असा तिनें निश्चय केला. तिनें आपल्या मुलाला उत्तर दिलें,

"तुझें गोत्र काय तें मला माहीत नाहीं. दासी म्हणून मी अनेक ठिकाणीं अनेक तऱ्हांचें काम करीत असतां, मुला, तूं माझ्या पोटीं जन्मलास. त्या मला तुझें गोत्र काय तें माहीत नाहीं. माझें नांव जाबाला आणि तुझें नांव सत्यकाम आहे. मी सत्यकामजाबाल आहें, एवढें तूं आपल्या गुरूला जाऊन सांग."

मुलांनो, ती बिचारी आपल्या मुलाला अधिक काय सांगणार? आणि तिनें अधिक सांगितलें असतें तरी त्या निष्पाप बालकाला त्यांत फारसें काय समजलें असतें? एकाच वाक्यांत तिनें आपलें आत्मवृत्त आपल्या मुलाला व त्याच्या निमित्तानें सर्व जगाला सांगून टाकलें. ती अविवाहित असूनहि तिला सत्यकाम झाला होता. अनाथ अबला मूग गिळून गप्प बसली होती. तिच्या करुण कहाणीनें कोणाच्या हृदयाला पाझर फुटणार नाहीं? त्याच्या आईचें हें दुःख व त्यामुळें त्याच्या विद्यासंपादनाच्या मार्गांत उत्पन्न होणारी धोंड सत्यकामाच्या ध्यानांत आली होती, असें त्यानें पुढें गुरूला दिलेल्या उत्तरावरून अनुमान निघतें. परंतु तो विद्येसाठीं अधीर झाला होता. आईचाच सत्य बोलण्याचा कित्ता गुरूपाशीं गिरवावयाचा व त्याचेंच पाय धरावयाचे, असें त्यानें मनाशीं ठरविलें व जरूर ती माहिती आईकडून मिळतांच, तो गौतम ऋषीकडे गेला व त्यांना म्हणाला,

"भगवन्! मी आपल्याजवळ विद्याध्ययनाकरितां ब्रह्मचारी म्हणून राहतों. मी आपल्याला शरण आलों आहें."

सत्यकामानें अटकळ बांधली होती त्याप्रमाणें गौतम ऋषीनें त्याला प्रश्न केला, “ हे मुला, तूं कोणत्या गोत्राचा आहेस ?”

सत्यकामानें उत्तर दिलें, “ मी कोणत्या गोत्राचा आहें हें, महाराज, मला ठाऊक नाहीं. मीं आईला विचारलें; ती मला म्हणाली कीं, परिचारिका दासी अशी मी अनेक तऱ्हांनीं सेवा करीत असतां, तारुण्यामध्यें मला तूं झालास. अशा त्या मला तूं कोणत्या गोत्राचा आहेस हें माहीत नाहीं. फक्त माझें नांव जाबाला आहे आणि तुझें नांव सत्यकाम आहे. तो मी जाबाल सत्यकाम आहें.”

त्या काळच्या रिवाजाप्रमाणें गौतमानें सत्यकामाचा पूर्व इतिहास ऐकून त्याला विद्या देण्याचें कदाचित् नाकारलेंहि असतें. परंतु आईनें सांगितलेल्या माहितीपैकीं सत्यकामानें एक अक्षरसुद्धां आपल्या गुरूपासून लपवून ठेवलें नाहीं. माझ्या मित्रांनो, याला म्हणतात सत्यनिष्ठा. सत्य बोलण्यानें जन्माचें नुकसान होण्याचा संभव असतांहि जो सत्यापासून एक रतिभरहि ढळत नाहीं त्यालाच सत्यवान् हें नांव शोभतें.

सत्यकाम गौतमाच्या कसोटीला उतरला. शिष्याच्या गुणावरून तो उच्च कुळांतीलच असला पाहिजे असें त्यानें ठरविलें व तो सत्यकामाला म्हणाला,

“ तूं उच्चवर्णीय नसतास तर तुझ्या तोंडून असें निर्भय सत्य बाहेर पडलें नसतें. वत्सा, तूं सत्यापासून ढळला नाहींस. एक समिधा आण. मी तुझें उपनयन करतों. ”

मुलांनो, तुमच्यामध्यें स्वतःला उच्चवर्णीय म्हणवून घेण्यांत अभिमान बाळगणारे पुष्कळ असतील. परंतु माझा तुम्हांला असा सवाल आहे कीं, जर गौतम ऋषि आज पुनः आपल्यामध्यें अवतीर्ण

झाले व त्यांनीं या मंडळींची सत्यकामाप्रमाणें परीक्षा घेतली तर त्यांत किती उत्तीर्ण होतील बरें ? या प्रश्नाचें उत्तर माझ्या पत्त्यावर पाठविण्याची आवश्यकता नाहीं. तुमच्यापैकीं प्रत्येकानें त्याचें आपल्या मनाशीं उत्तर दिलें म्हणजे माझें काम झालें. आज हिंदु समाजांत गुण व वर्ण यांचा कांहींच संबंध उरलेला नाहीं. जन्म हाच एक केवळ वर्ण ठरविण्याचें साधन समजला जातो. जो ब्राह्मणकुळांत जन्मला तो ब्राह्मण. मग त्याच्या अंगचे गुण ब्राह्मणाला न शोभणारे असले तरी समाज त्याच्याकडे लक्ष देत नाहीं. त्यामुळें मनुष्याचे अंगचे गुण व त्याचा धंदा यांच्यामध्यें मेळ राहिला नाहीं. या स्थितींत गुणांचा विकास होण्याला संधि मिळत नाहीं. आज हिंदु समाज अपकर्षाच्या उतरणीला लागलेला दिसतो त्याचें हें एक मुख्य कारण आहे. वर्ण ठरविण्यांत जन्माला कांहींच महत्त्व नाहीं असें माझें, मुलांनो, म्हणणें नाहीं. जन्माला स्थान आहे, परंतु तें गौण आहे. मुख्य स्थान आपण गुणांनाच दिलें पाहिजे. ज्याच्यामध्यें ब्राह्मणाचे गुण नसतील तो केवळ ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्माला आला आहे म्हणून आपण त्याला ब्राह्मण मानतां कामा नये. उलट ज्याच्या अंगीं ब्राह्मणाचे गुण असतील तो ब्राह्मणकुळांत जन्मला नसला तरी आपण त्याला ब्राह्मण मानलें पाहिजे. हिंदुधर्मांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे फक्त चारच वर्ण आहेत. समाजाच्या सुव्यवस्थित संघटनेला व धारणेला बुद्धि, शौर्य, संपत्ति व शरीरसेवा या चार गोष्टींची मुख्यतः जरूरी असते. **जो बुद्धीनें समाजाची सेवा करतो तो ब्राह्मण, जो शौर्यानें सेवा करतो तो क्षत्रिय, जो संपत्तीनें समाजाची सेवा करतो तो वैश्य व जो शरिरानें समाजाची सेवा करतो तो शूद्र.** या चार वर्णांचा हेतु गुणांप्रमाणें कर्मांची वांटणी करून व्यक्तीच्या विकासाला मदत

करणें एवढाच आहे. या वर्णाश्रमसंस्थेंत उच्च नीच या भावनेला मुळींच स्थान नाहीं. आपल्या शरिराचे कान, डोळे, दांत, पाय वगैरे निरनिराळे अवयव आहेत, व त्यांचीं निरनिराळीं कार्यें आहेत. म्हणून आपण कानांपेक्षां डोळे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असें कधीं मानीत नाहीं. ( तसें मानूं तर तो आपला मूर्खपणा होईल. ) या अवयवांचे निरनिराळे व्यापार शरिराच्या आरोग्यासाठीं व सुखासाठीं अवश्य असतात. त्याचप्रमाणें समाजपुरुषाच्या धारणेसाठीं व सुखासाठीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या चतुर्विध सेवेची जरूरी आहे. प्रत्येकानें आपला विशिष्ट गुण इतरांच्या सेवेला लावून आपला व त्याचबरोबर आपल्या समाजाचा उद्धार करावयाचा आहे. हे वर्ण प्राधान्यतः गुणांवरूनच ठरले पाहिजेत व पूर्वीच्या काळीं ते तसे ठरत, हें सत्यकाम जाबालाची गोष्ट आपल्याला स्पष्ट दाखवीत आहे.

माझ्या मित्रांनो, पूर्वीच्या काळीं गुणांनाच प्राधान्य देत. म्हणूनच ज्याच्या पित्याचें कुलहि माहीत नाहीं अशा सत्यकाम जाबालासारख्या दासीपुत्राला, गुरूच्या घरीं जाऊन विद्यार्जन करतां आलें; व परमेश्वरानें त्याला जे गुण दिले होते त्यांचा विद्येनें विकास करून त्यांच्या द्वारा त्याला समाजाची सेवा करतां आली. नियमितपणा, कष्टाळूपणा, गुरुसेवा व गुरुभक्ति, दीर्घोद्योग व दांडगा अभ्यास या गुणांच्या जोरावर सत्यकाम जाबालानें गुरूपासून विविध विद्या संपादन केली. विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर तो स्वगृहीं परत आला व योग्य वधूशीं विवाह करून तो आदर्श आश्रमवासी व नागरिक यांचें जीवन कंठूं लागला. त्यानें अनेक सत्पात्र ब्रह्मचाऱ्यांना विद्या देऊन आपल्याप्रमाणेंच त्यांनाहि धन्य केलें.

## गोष्ट ७ वी*

# स्वकुटुंबांतून विश्वकुटुंबांत

याज्ञवल्क्य नांवाचा एक ब्रह्मविद् (ब्रह्म जाणणारा) ऋषि होता. तो गृहस्थाश्रमी असून सधन व सुखी होता. त्याला दोन बायका होत्या. एकीचें नांव मैत्रेयी व दुसरीचें नांव कात्यायनी होतें. समजलों! तुमच्या चेहऱ्यावरील हास्याचा अर्थ मला समजला. दोन बायकांचा दादला आणि म्हणे ब्रह्मवेत्ता! संसारी तो संसारी आणि म्हणे ऋषि! खूप टोकून दिलीत! असेंच तुम्हांला मला म्हणावयाचें आहे ना? मी तुम्हांला त्याबद्दल दोष देत नाहीं. तुम्ही तरी काय करणार? अंधकार व प्रकाश हे जसे एके ठिकाणीं राहूं शकत नाहींत त्याचप्रमाणें संसारी मनुष्य परमार्थी होऊं शकत नाहीं, असें कांहींना वाटतें. आणि या कांहींचें मत तुमच्या कानांवर खास आलें असलें पाहिजे; म्हणून साधु म्हणजे दाढीजटा वाढविलेला, अंगाला विभूति फासलेला व कमरेला लंगोटी लावून धुमीपाशीं बसलेला, हें चित्र तुमच्या डोळ्यांसमोर उभें राहतें. परंतु मी तुम्हांला सांगतों, हें मत खरें नाहीं. परमार्थासाठीं संसार सोडलाच पाहिजे असें नाहीं. विरागी म्हणजे संसाराला विटलेला असला पाहिजे असेंच कांहीं नाहीं.

पूर्वीच्या महात्म्यांपाशीं काय किमया होती हें मला गरिबाला माहीत नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं, त्यांपैकीं पुष्कळ संसारी होते व त्यांचा संसार त्यांच्या परमार्थाच्या आड कधीं आला नाहीं. संसाराच्या शीतल छायेंत बसून ते परमार्थाची उग्र तपश्चर्या

---

* बृहदारण्यकोपनिषद्, अ. २, ब्रा. ४, व अ. ४, ब्रा. ५.

करीत. ते विरागी होते, परंतु संसाराला विटलेले नव्हते. त्यांची विरक्तता म्हणजे निष्कामता होती. विषयभोगाची सीमा कोठें संपते व त्याच्या मर्यादेची सरहद्द कोठें लागते हें त्यांना बरोबर माहीत होतें. त्यामुळें पाण्यांतल्या कमळाप्रमाणें ते संसारांत असूनहि त्याच्यापासून अलिप्त असत. त्यांचे सर्व व्यवहार नियमित चालत, त्यामुळें त्यांच्या संसारांत संतोषाची साखर पेरलेली असे. माझ्या मित्रांनो, हा संतोषच परमार्थाचा खरा आधार आहे.

एके दिवशीं याज्ञवल्क्यानें आपली पत्नी मैत्रेयी हिला हांक मारली व तो तिला म्हणाला,

"हे मैत्रेयी, मी संन्यास घेऊं इच्छितों, तेव्हां तुझ्यामध्यें व कात्यायनीमध्यें माझ्या संपत्तीची वांटणी करून देतों."

मनुष्यानें कौटुंबिक सुखाचा कांहीं काळ उपभोग घेतल्यानंतर, त्याच्यापेक्षां उच्च ध्येयासाठीं आपलें आयुष्य खर्च करावें हें इष्ट आहे. हिंदुधर्माला हें तत्त्व मान्य आहे व त्याच्यासाठीं त्यानें प्रत्येक मनुष्याच्या आयुष्याचे चार विभाग केले आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम हेच ते चार विभाग होत. या चार आश्रमांपैकीं वानप्रस्थ व संन्यास या दोन आश्रमांत 'माझी बायको व माझीं मुलें एवढाच माझा संसार' ही संकुचित दृष्टि मनुष्यानें सोडून द्यावयाची असते व आपली बुद्धि व शक्ति समाजाच्या व जगाच्या सेवेला लावून त्याच्या द्वारें परमेश्वरप्राप्तीचा उद्योग करावयाचा असतो.

याज्ञवल्क्याचा असेंच करण्याचा निश्चय झाला होता. म्हणून त्यानें आपली संपत्ति दोन बायकांमध्यें वांटून देण्याचें ठरविलें होतें. कात्यायनी संसारी वृत्तीची साधी बायको होती. आपला नवरा,

आपलें घरदार व आपलें धन यांतच सर्व सुख सांठविलेलें आहे अशी तिची बुद्धि होती. मैत्रेयी प्रगल्भ विचाराची बायको होती. आपल्या पतीच्या सहवासांत तिनें संसारसुखाचा अनुभव घेतला होता. परंतु अनुभवानें संसारांत खरें सुख नाहीं अशी तिची खात्री झाली होती. म्हणून ती याज्ञवल्क्याच्या भाषणानें विचारांत पडली. तिला पतीच्या संपत्तीची वांटणी पाहिजे होती. परंतु या नश्वर संपत्तीची नको होती. नश्वर संपत्तीपासून नश्वर सुखच प्राप्त होतें, हें तिला कळून चुकलें होतें. ' पुष्पसंगें मातीस वास लागे '—मग मैत्रेयी तर ब्रह्मवेत्त्या याज्ञवल्क्याची सहधर्मचारिणी होती. तिला शाश्वत सुख देणाऱ्या ब्रह्मविद्येची जिज्ञासा होती व ही विद्या आपल्या पतीजवळ आहे हें तिला माहीत होतें. पतीच्या या विद्याधनाची तिला इच्छा होती. ही इच्छा तिनें पतीला पुढीलप्रमाणें खुबीदार प्रश्न विचारून सुचविली.

" हे भगवन् ! पृथ्वीच्या मोलाइतकें द्रव्य जर मला मिळालें तर मी खरी सुखी म्हणजे मुक्त होईन कां ? "

पूर्वीच्या आर्य स्त्रिया विद्याप्रेमी व निर्भय विदुषी होत्या. कारण त्या वेळचें घरांतील व बाहेरील वातावरण शुद्ध व स्वतंत्र होतें. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि विद्या संपादन करण्याचा अधिकार आहे ही गोष्ट समाजानें मान्य केली होती. घरामध्यें स्त्रिया व पुरुष यांच्यामध्यें ब्रह्मविद्येसारख्या गहन विषयावर विनासंकोच संभाषणें होत; तर बाहेर जाहीर सभांतून अनेक सार्वजनिक विषयांच्या चर्चेत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेत. घर व चूल यांच्याबाहेर स्त्रियांचें कार्य नाहीं असें मानलें जात नसे. वृक्षाप्रमाणें वेलींनाहि खुल्या हवेची व सूर्यप्रकाशाची निसर्गानें जरूरी ठेवलेली आहे, ही गोष्ट त्या काळचे लोक विसरले नव्हते. गाडीचीं दोनहि चाकें सारखीं व बळकट नसतील तर गाडी नीट चालणार नाहीं; ती कोठें तरी मध्येंच मोडून

पडेल. त्याचप्रमाणें स्त्री व पुरुष सारखींच सुशिक्षित, सुविचारी, व स्वतंत्र नसतील तर त्यांचा संसार सुखाचा होणार नाहीं, ही गोष्ट त्या काळच्या लोकांना पूर्ण मान्य होती.

बायकांनीं कांहीं घरकूलाबाहेरचा अथवा सार्वजनिक प्रश्न विचारला कीं, "बायकांची बुद्धि चुलीपुरती. त्याच्याबाहेर तुम्हांला काय समजतें?" अशीं उत्तरें यावयाचीच. असा, माझ्या मित्रांनो, तुमचा अनुभव आहे ना? परंतु याज्ञवल्क्य असा नव्हता. आपल्या पत्नीची ही जिज्ञासा व प्रगल्भता पाहून त्याला मोटा आनंद झाला. आपल्या स्त्रीचा अधिकार त्याला माहीत होता. त्यानें तिला उत्तर दिलें,

"मैत्रेयी, तूं म्हणतेस तें खरें आहे. द्रव्यानें तुला खरें सुख मिळणार नाहीं. श्रीमंताप्रमाणें तुझें जीवन विलासी होईल. परंतु द्रव्यानें अमृतत्व मिळत नाहीं."

याज्ञवल्क्यानें आपल्या बायकोची फसवणूक केली नाहीं. त्यानें तिला जें सत्य होतें तेंच सरळ व स्पष्ट सांगितलें. जातां जातां श्रीमंत लोक आपली संपत्ति केवळ स्वतःच्याच चैनीसाठीं खर्च करतील तर त्यांना खरें सुख मिळणार नाहीं, असेंहि याज्ञवल्क्यानें सुचविलें आहे. कारण मनुष्याला खरें सुख देण्याची शक्ति पैशामध्यें नाहीं. यावर मैत्रेयी आपल्या पतीला म्हणाली,

"जर द्रव्यानें अमृतत्व मिळत नाहीं, तर तें घेऊन मी काय करूं? अमृतत्व कसें मिळेल हें ज्ञान आपणाला आहे, तें मला सांगा."

याज्ञवल्क्य म्हणाला "वाहवा!! हे मैत्रेयी, तूं अत्यंत प्रिय भाषण करीत आहेस. ये बैस. मी तुला तें ज्ञान सांगतों. लक्षपूर्वक ऐक."

माझ्या मित्रांनो, मैत्रेयीप्रमाणें तुम्हीहि तें ज्ञान ऐका व आपलें खरें कल्याण करून घ्या. याज्ञवल्क्यानें संभाषणाला पुन्हां सुरुवात केली. तो म्हणाला,

"हे मैत्रेयी, आई मुलावर, पति पत्नीवर किंवा बहीण भावावर जें प्रेम करतात तें त्यांच्यासाठीं करीत नाहींत तर स्वत:साठीं करतात. शेजारच्या घरांत अगर आसपास दुसरीं पुष्कळ मुलें आहेत ही गोष्ट त्या आईला माहीत नसते असें का तुला वाटतें? हीं दुसरीं मुलें आपल्या मुलांहून अधिक बुद्धिमान् व गुणवान् आहेत ही गोष्टहि त्या आईला माहीत असते. तथापि आई आपल्याच मुलांवर खरें प्रेम करते. 'असें कां?' म्हणून जर आपण आईला प्रश्न केला, तर ती एवढेंच उत्तर देईल कीं, 'तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें इतर मुलें माझ्या मुलांहून अधिक गुणवान् व बुद्धिमान् आहेत हें खरें. परंतु तीं मुलें माझीं नाहींत, तर दुसऱ्यांचीं आहेत. माझें मूल कसेंहि असलें तरी तें माझें आहे म्हणून मी त्याच्यावर प्रेम करितें.' तेव्हां आईच्या मुलावरील प्रेमाचें मूळ त्या मुलांत नसून आईच्या त्याच्याविषयींच्या 'माझें' या भावनेंत आहे हें सिद्ध झालें. सर्व प्रकारच्या प्रेमाला हाच नियम लागू आहे. जगांतील ज्या वस्तूबद्दल अगर व्यक्तीबद्दल आपल्याला आपलेपणा वाटतो त्या वस्तूवर अगर व्यक्तीवरच आपण प्रेम करतों. जेथें आपलेपणाची भावना आहे तेथेंच प्रेम असतें. मी माझ्या देशावर प्रेम करतों व अन्य देशांवर करीत नाहीं याचें कारण तरी हेंच आहे. हा देश माझा आहे, दुसरा देश माझा नाहीं, असें मला वाटतें. आपण कांहीं माणसें अशीं पाहतों कीं, ज्यांचें स्वत:शिवाय दुसऱ्या कशावरहि प्रेम नसतें. सर्व जग माझ्याकरितां म्हणजे माझ्या सुखासाठीं आहे असें त्याला वाटतें. पुष्कळ माणसांचें प्रेम आपली बायको, आपलीं मुलें व आपले आप्तजन यांच्यावरच म्हणजे आपल्या कुटुंबावरच असतें. कांहीं लोकांचें प्रेम आपल्या ज्ञातीवर असतें तर कांहींचें प्रेम आपल्या देशावर असतें. तसेंच असे कांहीं उच्च कोटीचे महात्मे असतात कीं ज्यांचें

प्रेम सर्व विश्वावर असतें. प्रेमाप्रेमांत असा फरक कां बरें पडतो? कारण अगदीं उघड आहे. ज्या मनुष्याचें आपल्या स्वतःवर प्रेम असतें त्याला वाटतें मी म्हणजे माझा देह. या देहाच्या पलीकडे माझें कांहीं नाहीं. त्याच्या आपलेपणाच्या वर्तुळाचा मध्यबिंदु तो स्वतःच असतो व त्याचा परीघहि तोच असतो. जो मनुष्य आपल्या कुटुंबावर प्रेम करतो त्याला मी म्हणजे माझें कुटुंब असें वाटतें व त्याच्या आपलेपणाची त्याची व्याप्ति कुटुंबापर्यंत वाढते. कुटुंबाच्या बाहेरचें तें मी व माझें नाहीं, अशी मर्यादा तो आपल्याला घालतो. हाच नियम आपल्या ज्ञातीवर व देशावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींनाहि लागू आहे. जे उच्च कोटींतील महात्मे असतात त्यांच्या ‘मी’ चा विस्तार विश्वाएवढा झालेला असतो. म्हणून त्यांना सर्व विश्वाबद्दल आपलेपणा वाटतो व तें त्यांना प्रिय असतें. जगामध्यें जें जें कांहीं आहे तें सर्व ‘मी’ आहे, माझ्याबाहेर कांहीं नाहीं, असा अनुभव त्यांना आलेला असतो. म्हणून त्यांचीं सर्व कृत्यें जगाच्या कल्याणासाठीं होतात. ‘सर्वभूतहिते रताः’ हा त्यांचा स्वभाव बनतो. हा ‘मी’ दुसरा कोणी नसून आपलाच अंतरात्मा होय व तो सर्वव्यापक आहे. आपलें या अंतरात्म्याचें ज्ञान जितकें संकुचित अगर व्यापक असेल त्या मानानें आपलें प्रेम संकुचित अथवा व्यापक राहील. आपल्याला या परमात्म्याचें खरें ज्ञान झालें म्हणजे आपल्या प्रेमांतील स्वार्थबुद्धि कमी होत जाऊन तें अधिक अधिक निःस्वार्थी व शुद्ध बनत जातें. स्वार्थी प्रेम आपल्याला दुःख देणारें होतें. कारण ज्याला आपलें म्हणून आपण समजतों तें सदैव टिकत नाहीं. तें केव्हांना केव्हां तरी नाश पावतेंच. मग आपल्याला त्याच्या वियोगामुळें दुःख होतें. म्हणून आपण दिवसें-दिवस आपलें प्रेम अधिक शुद्ध व व्यापक करण्याची खटपट केली

पाहिजे. प्रेमाची शुद्धता मीं वर म्हटल्याप्रमाणें या अंतरात्म्याच्या व्यापकतेच्या ज्ञानावर अवलंबून आहे. परमात्मा हाच सर्वत्र भरलेला असून त्याच्याशिवाय बाकीचें सर्व अनित्य आहे, म्हणून हा परमात्मा जेव्हां आपल्या प्रेमाचा विषय होईल तेव्हांच आपलें प्रेम आपल्या दुःखाला कारण होणार नाहीं. कारण हा परमात्मा कधींच नाश पावत नाहीं. म्हणून, हे मैत्रेयी, आपले डोळे ज्यां ज्या वस्तूवर पाहतील त्या वस्तूमध्यें हाच परमात्मा पाहण्याचा आपण प्रयत्न करावा, आपण जें जें कांहीं ऐकूं त्यामध्यें ह्या आत्म्याचे गुण व स्वरूपवर्णन ऐकण्याचा प्रयत्न करावा. आपल्या मनाचा चिंतन करणें हाच स्वभाव आहे, त्याचा फायदा घेऊन मनानें नेहमीं या आत्म्याचेंच चिंतन करावें व आपल्याला याचाच ध्यास लावून घ्यावा. या आत्म्यापासूनच सर्व जगाची उत्पत्ति झाली असल्यामुळें या आत्म्याचें ज्ञान झालें म्हणजे सर्व जगाचें ज्ञान होतें."

याज्ञवल्क्याला या परमात्म्याचें ज्ञान झालें होतें म्हणून सर्व विश्व हेंच त्याचें कुटुंब बनलें होतें. तेव्हां आपल्या कुटुंबाचा भार आपल्या दोन्ही स्त्रियांवर सोंपवून त्यानें आपल्याला उच्च ध्येयासाठीं वाहून घेण्याचें ठरविलें होतें. परंतु त्याच्या दोघी स्त्रियांपैकीं मैत्रेयीला आपल्या पतीचें ध्येय व मार्ग पसंत होता म्हणून त्या ध्येयप्राप्तीसाठीं लागणाऱ्या ज्ञानाची तिनें आपल्या पतीपाशीं मागणी केली व त्याच्याकडून तें संपादन केलें. दुसरी कात्यायनी बिचारी शेवटपर्यंत संसारीच राहिली.

**अमृतत्वस्य तु नाशास्ति वित्तेन । २–४–२ ।**

**न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति । २–४–५ ।**

आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो
निदिध्यासितव्यो मैत्रेय्यात्मनो
वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदम् सर्वं
विदितम् । २-४-५ ।

बृहदारण्यकोपनिषद्.

---

## गोष्ट ८ वी*

# तें तूं आहेस

आरुणि व श्वेतकेतु हे पितापुत्र होते. मुलांनो, आपल्या गोष्टीला जेव्हां प्रारंभ होतो, तेव्हां श्वेतकेतु बारा वर्षांचा होता. आरुणीच्या कुलाची उत्तम व आदर्श ब्राह्मणकुल म्हणून मोठी कीर्ति होती. शुक्ल पक्षांतील चंद्रमा प्रत्येक तिथीला एकेक कलेनें वृद्धि पावतो त्याप्रमाणें प्रत्येक पिढीबरोबर आपल्या कुलाच्या कीर्तींत भर पडत जावी अशी हरएक कुलवानाची स्वाभाविक इच्छा असते. या बाबतींत पुत्राकडून पराभूत होण्यांतच प्रत्येक पित्याला परमानंद होतो. श्वेतकेतु १२ वर्षांचा झाला तरी त्याच्याकडून आपला हा मनोरथ पूर्ण होण्याचीं चिन्हें आरुणीला दिसेनात. एक दिवस अखेर आरुणीनें श्वेतकेतूला हांक मारली व तो त्याला म्हणाला,

"हे श्वेतकेतो, तूं गुरुगृहीं जाऊन संपूर्ण विद्या संपादन करण्याचें कां मनांत आणीत नाहींस? आपल्या कुलांत अध्ययन न करणारा व 'आपण ब्राह्मणकुलांत जन्मलों आहोंत' असा

---

* छांदोग्योपनिषद्, अ. ६, खं. १.

पोकळ अभिमान बाळगणारा परंतु ब्राह्मणाला योग्य असें आचरण न करणारा अद्यापपर्यंत कोणीहि झालेला नाहीं."

उपनयनविधि झाला कीं, ब्रह्मचाऱ्यानें गुरुगृहीं जाऊन तेथें कमींत कमी एक तप राहून सर्व विद्याध्ययन करण्याचा पूर्वींच्या काळीं रिवाज होता. पूर्वींचे ब्रह्मचारी बारा वर्षें गुरुगृहीं राहून कडकडीत ब्रह्मचर्यव्रतपालन व विद्याध्ययन करीत व मग विद्येनें व बलानें संपन्न होत्साते स्वगृहीं परत येत. श्वेतकेतूला वडिलांचे शब्द झोंबले. मुलांनो, तो मोठा स्वाभिमानी मुलगा असावा. वडिलांच्या सांगण्याप्रमाणें तो गुरुगृहीं गेला व तेथें बारा वर्षें अध्ययन करून त्यानें सर्व वेदविद्येमध्यें पारंगतता मिळविली. जेव्हां तो गुरूचा निरोप घेऊन स्वगृहीं परत आला तेव्हां त्याला थोडी 'ग'ची बाधा झाली होती असें दिसतें. ज्याप्रमाणें वृक्ष फळांच्या भारानें त्याप्रमाणें खरे विद्वान् विद्येनें नम्र होतात. परंतु श्वेतकेतूच्या बाबतींत थोडा याच्या उलट परिणाम झाला होता. मुलांनो, स्वाभिमान हा मोठा सद्गुण आहे व ज्याप्रमाणें सन्मित्राची मैत्री काळजीपूर्वक वाढविणें हें आपल्या कल्याणाचें ठरतें त्याप्रमाणें स्वाभिमानाचें पोषण करणें हें स्वोन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत जरूर आहे. परंतु दर्प हा आपला दुर्दम शत्रु आहे व जर त्याचें आपण निर्दलन केलें नाहीं तर आपण स्वतःच आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्याप्रमाणें आपला नाश करून घेऊं, हें पक्कें ध्यानांत ठेवा. स्वपुत्रहितदक्ष प्रेमी आरुणीला आपल्या मुलाला गर्वानें पछाडलेलें पाहून फार वाईट वाटलें. त्यानें आपल्या मुलाचा गर्व शक्य तों काढून टाकण्याचें ठरविलें. एके दिवशीं त्यानें आपल्या मुलाला जवळ बोलावलें व तो त्याला म्हणाला,

"हे श्वेतकेतो, गुरुगृहाहून परत आल्यापासून मी तुझें जें वर्तन पाहत आहें त्यावरून आपण अगदीं कृतकृत्य झालों आहों व आतां

आपल्याला कांहीं करण्यासारखें या जगांत उरलें नाहीं असें तुला वाटत असावें असें मला वाटतें. तूं अनेकशास्त्रपारंगत झाला आहेस हें खरें व त्यापासून मला मोठा आनंदहि झाला आहे. परंतु जी वस्तु जागली असतां सर्व जगाचें ज्ञान होतें व जी वस्तु आपल्याला शब्दांनीं सांगतां येत नाहीं किंवा समजून घेतां येत नाहीं त्या वस्तूचें शास्त्र तुझ्या गुरूनें, मुला, तुला शिकविलें आहे काय?"

जेथें विहिरींतच नाहीं तेथें पोहऱ्यांत कोठून येणार? जें ज्ञान गुरूलाच नाहीं तो तें शिष्याला कोठून सांगणार? वडील म्हणतात त्याप्रमाणें जगांत अशी कांहींएक वस्तु आहे व ती अमुक एक शास्त्र शिकल्यानें प्राप्त होते असें आपल्या गुरूनें आपल्याला शिकविल्याचें श्वेतकेतूला मुळींच स्मरेना. 'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं.' माझ्या मित्रांनो, श्वेतकेतु हा आरुणीचा मुलगा होता. जरी विद्येमुळें श्वेतकेतूमध्यें थोडी अनम्रता आली होती तरी त्याचा मुळचा स्वभाव स्वाभिमानी असला तरी गर्विष्ठ नव्हता. पित्याच्या प्रश्नानें पुत्राची प्रज्ञा जागृत केली. वडील म्हणतात ती वस्तु काय आहे हें समजावून घेण्याची जिज्ञासा श्वेतकेतूमध्यें जागृत झाली व तो आपल्या वडिलांना विनीत भावानें म्हणाला,

"भगवन्! जी जाणल्यानें सर्व जगाचें ज्ञान होतें ती वस्तु कोणती? व तिची प्राप्ति करून देणारें शास्त्र कोणतें? तें मला कृपा करून सांगा." आरुणीनें उत्तर दिलें, "वत्सा, माती हा पदार्थ तुला माहित आहे. या मृत्तिकेचींच अनेक भांडीं अगर चित्रें तयार करतात हें तूं जाणतोस. एकाच मातीचीं अनेक भांडीं तयार केलेलीं असतात. परंतु एकाला आपण घागर म्हणतों, तर दुसऱ्याला रांजण म्हणतों, तर तिसऱ्याला पणति म्हणतों. त्याचप्रमाणें सर्व मृण्मय चित्रेंच; परंतु एकाला आपण हत्ती

म्हणतों, तर दुसऱ्याला घोडा म्हणतों, तर तिसऱ्याला राजा म्हणतों, तर चौथ्याला राणी म्हणून संबोधितों. याप्रमाणें जरी आपण या चित्रांना निरनिराळीं रूपें व नांवें दिलीं तरी सर्व एकाच मातीपासून केलेलीं असतात. या सर्व पदार्थांचें माती हें कारण आहे व हे सर्व पदार्थ मातीचें कार्य आहेत, असें म्हणतात. मातीच्या या कार्यानें आपल्या भाषेंत जरी अनेक नांवें धारण केलीं असलीं व आपण त्याला जरी अनेक आकार दिले असले तरी या सर्वांचें कारण जी माती तीहून तीं खरोखर भिन्न नाहींत. आपण आपल्या व्यवहारासाठीं त्यांना अनेक आकार व नांवें दिलेलीं असतात व आपण तसें केलें नाहीं तर आपला व्यवहार चालणार नाहीं, हेंहि खरें. परंतु तेवढ्यावरून तीं भांडीं व तीं चित्रें त्या मातीहून भिन्न होतात असें मात्र नव्हे. कार्य हें कारणाहून तत्त्वतः निराळें असूं शकत नाहीं, असा सिद्धांत आहे व तो सत्य आहे. मुला, तुला या सिद्धांताचा अनुभव घ्यावयाचा असेल तर ज्याला तूं हत्ती, घोडा, राजा अगर राणी म्हणतोस तीं सर्व चित्रें पाण्यांत नेऊन टाक म्हणजे काय चमत्कार होतो तो तुला दिसेल. राजाराणीच्या ऐवजीं तुला चिखलाचा गोळा म्हणजे माती झालेली दिसेल. म्हणून जे विवेकी असतात ते जरी व्यवहारासाठीं एकाच वस्तूला अनेक आकार व नांवें देतात, तथापि हे नाना रूपांचे व नांवांचे पदार्थ मूळ एकाच वस्तूपासून उत्पन्न झालेले आहेत व त्यापासून ते तत्त्वतः भिन्न नाहींत—नव्हे एकच आहेत हें ते कधींहि विसरत नाहींत, ही गोष्ट, श्वेतकेतो, तूं पक्की लक्षांत ठेव. जी गोष्ट मृत्तिका व मृण्मय वस्तूंची, तीच लोखंड, चांदी, सोनें वगैरे धातु व त्यांच्यापासून तयार केलेल्या पदार्थांची, हें तुझ्यासारख्या चाणाक्ष मुलाच्या लक्षांत केव्हांच आलें असेल. तेव्हां मातीपासून केलेले पदार्थ हे खरोखर

मातीहून भिन्न नसल्यामुळें मातीचें ज्ञान झालें कीं, मातीच्या बनलेल्या सर्व पदार्थांचें ज्ञान झालेंच पाहिजे हें सिद्ध झालें. त्याचप्रमाणें, हे श्वेतकेतो, तुझ्या लक्षांत हेंहि येऊन चुकलें असेल कीं, यांत मृत्तिका हेंच सत्य आहे व तिच्यापासून बनलेले सर्व पदार्थ हे केवळ तिचे विकार म्हणजे बदललेलें रूप आहे."

वडिलांचें हें व्याख्यान ऐकल्यावर श्वेतकेतु पुन: म्हणाला,

"माझ्या आचार्यांना हें शास्त्र किंवा ज्ञान माहित नव्हतें. जर त्यांना हें तत्त्वज्ञान ठाऊक असतें तर तें मला सांगितल्याशिवाय ते खास राहिले नसते. तेव्हां महाराज, आपणच मला या तत्त्वज्ञानाचा संपूर्ण उपदेश करा." बागेंतील फूल व फळझाडांना फुलांचा व फळांचा जसजसा अधिकाधिक बहर येऊं लागतो तसतसा बाग-वानाचा त्यांची जोपासना करण्याचा व त्याला पाणी देण्याचा उत्साह वाढतो. त्याप्रमाणें आपल्या मुलाची बुद्धि ज्ञान ग्रहण करण्यास उत्सुक झालेली पाहून आरुणीनें त्याला मोठ्या उत्साहानें पुढें उपदेश करण्याला पुन: आरंभ केला. तो म्हणाला,

"वत्सा, मी तुला आतां एका मातीपासून अगर अन्य धातू-पासूनच अनेक रूपें असलेले व नांवें धारण केलेले पदार्थ कसे तयार होतात तें सांगितलें. जसे मातीपासून मातीचे अनेक पदार्थ किंवा सुवर्णापासून अनेक सुवर्णालंकार तयार होतात, त्याचप्रमाणें जगांतील नामरूपात्मक सर्व पदार्थ म्हणजेच हें जग, हे श्वेतकेतो, एकाच भावरूप सत्तत्त्वापासून निर्माण झालें आहे. या नाना जगाचें मूळ कारण एकच आहे. हें जगत् त्या एका मूळ कारणाचें कार्य आहे हें तूं नीट समजावून घे."

श्वेतकेतूनें वडिलांना प्रश्न केला,

"भगवन्! जर मुळांत ही एकच अद्वितीय, एकजिनसी व

भावरूप वस्तु होती, तर त्यापासून आपल्याला या जगांत दिसतात त्या असंख्य वस्तू कशा उत्पन्न झाल्या तें मला कृपा करून नीट समजावून सांगा." आरुणीनें उत्तर दिलें, "हे श्वेतकेतो, मुळांत हें तत्त्व एकटेंच होतें. परन्तु त्याला एकट्याला करमेना. आपण 'बहु' म्हणजे विविध व्हावें अशी त्याला इच्छा झाली. म्हणून त्यानें आपल्यापासून ही असंख्य सृष्टि निर्माण केली. मृत्तिकेपासून जशीं मृण्मय पात्रें त्याचप्रमाणें या एका सत्तत्त्वापासून या विश्वांतील सर्व पदार्थ निर्माण झाले आहेत. या पदार्थांचीं नामरूपें निराळीं असलीं तरी हे सर्व पदार्थ मुळांत एकाच तत्त्वापासून झाले असल्यामुळें ते खरोखर त्या सत्तत्त्वापासून भिन्न नाहींत. सर्व खनिज पदार्थ, वनस्पति, पशुपक्षी व मनुष्यप्राणी हे एकाच सत्तत्त्वापासून निर्माण झाले आहेत. परन्तु अज्ञ लोक हें जाणत नाहींत. ज्या सत्स्वरूप आत्म्यापासून हें सर्व जग निर्माण झालें आहे तो अत्यन्त सूक्ष्म म्हणजे अव्यक्त आहे. ज्याप्रमाणें माती सत्य व पात्रें केवळ तिचे विकार होत त्याप्रमाणेंच हा सत्स्वरूप आत्मा सत्य आहे व हें जग त्याचा विकार म्हणजे बदललेलें रूप आहे. जशीं मृण्मय चित्रें नाश पावलीं तरी माती नाश पावत नाहीं त्याचप्रमाणें हें जग नष्ट झाल्यासारखें भासलें तरी हा सत्स्वरूप आत्मा कधीं नाश पावत नाहीं. हे श्वेतकेतो, तूं देखील तें आत्मस्वरूपच आहेस."

श्वेतकेतूनें विचारलें,

"भगवन्! हें सत्तत्त्व परमाणूहूनहि सूक्ष्म व आपल्या डोळ्यांना न दिसणारें आहे असें आपण म्हणतां. मग जें परमाणूहूनसुद्धां सूक्ष्म आहे व जें आपल्या डोळ्यांना दृग्गोचर होत नाहीं त्यापासून, आकाशाचें छत, आपल्या शिरावर सदैव राहणारे मेरुपर्वतासारखे अथवा हिमालयासारखे प्रचंड पर्वत किंवा जे गगनालाहि

भेदून पार निघून गेल्यासारखे दिसतात असे महान वृक्ष कसे निर्माण होतात हें माझ्या बुद्धीला समजत नाहीं. शिवाय हे पदार्थ आमच्या डोळ्यांना स्पष्ट दिसतात. आपल्याच भाषेंत सांगावयाचें तर कार्य आपल्याला दिसतें पण त्याचें कारण मात्र दिसत नाहीं. हें थोडें चमत्कारिक वाटतें. माझी बुद्धि या गोष्टीवर श्रद्धा ठेवण्याला तयार होत नाहीं. कोप करूं नका. मला ही गोष्ट नीट समजावून द्या."

मुलांनो, तुम्ही पाटावर भोजनाला बसलेले असतांना तुमची आई किंवा प्रिय भगिनी तुम्हांला निरनिराळे पदार्थ वाढीत असते. तुम्हांला ते पदार्थ स्वादिष्ट व रुचकर लागतात म्हणून तुम्हीं ते पुनःपुनः मागतां. अशा प्रसंगीं तुमच्या आईला किंवा बहिणीला तुम्हांला ते पदार्थ वाढण्यांत जसा आनंद होतो त्याचप्रमाणें आरुणीला आपल्या मुलाला आपला उपदेश रुचत आहे असें पाहून मोठा संतोष झाला. जें उपदेशामृताचें पक्वान्न आपण आपल्या मुलाला वाढीत आहों तें त्याच्या बुद्धीची भूक अधिकाधिक प्रदीप्त करीत आहे हें पाहून आरुणीला अधिकच उत्साह चढला. तो पुढें उपदेश करूं लागला.

"हे श्वेतकेतो, तिकडून एक वडाचें फळ घेऊन ये."

श्वेतकेतु—भगवन्, हें आणलें.

आरुणि—तें फोड.

श्वेतकेतु—भगवन्! फोडलें.

आरुणि—त्यांत तुला काय दिसतें?

श्वेतकेतु—हीं आतां बारीक परिमाणूसारखीं बीजें दिसत आहेत.

आरुणि—वत्सा, त्यांपैकीं एक बीं घे आणि तें फोड. (पित्याच्या आज्ञेप्रमाणें श्वेतकेतूनें तें फोडलें.)

श्वेतकेतु—भगवन्! फोडलें.

आरुणि—वत्सा, त्यांत तुला काय दिसतें ?

श्वेतकेतु—भगवन्, त्यांत कांहीं दिसत नाहीं.

मुलाच्या तोंडून हें उत्तर मिळतांच आरुणि त्याला म्हणाला, " वत्सा, जो हा अतिसूक्ष्म पदार्थ तुला दिसत नाहीं, त्याच सूक्ष्मांशापासून त्या प्रचंड वटवृक्षाची उभारणी झाली आहे. या बीजांतील अव्यक्त अंशावर श्रद्धा ठेव. तो आहे असें गृहीत धरून चाल. जसा या बीजांतील अव्यक्त अंशापासून हा तुझ्या डोळ्यांना दृग्गोचर होणाऱ्या या वटवृक्षाचा प्रचंड विस्तार झाला आहे त्याप्रमाणें त्या सत्स्वरूप सूक्ष्म आत्म्यापासून हें जग विस्तार पावलें आहे. हे श्वेतकेतो ! तो सत्स्वरूप आत्माच तूंहि आहेस. हा सत्स्वरूप आत्माच सर्वत्र पसरलेला आहे. "

मुलांनो, वटवृक्ष हें कार्य आहे व त्या बीजांतील जो सूक्ष्मांश तें त्याचें कारण आहे. जरी श्वेतकेतूच्या डोळ्यांना हें कारण दृग्गोचर होत नव्हतें तरी तें नाहीं असें म्हणणें त्याला शक्य नव्हतें. जर कार्य दिसत आहे किंवा त्याचा अनुभव येत आहे तर त्याचें कारण जरी आपल्या डोळ्यांना दिसत नसलें तरी त्याचें अस्तित्व आपल्याला कबूल केलेंच पाहिजे. कारण, कारणावांचून कार्य असणेंच शक्य नाहीं असा सिद्धांत आहे. एखादी गोष्ट केवळ आपल्या डोळ्यांना दिसत नाहीं म्हणून ती नाहींच असें म्हणणें, मुलांनो, शहाणपणाचें ठरणार नाहीं. तुम्ही जर एखाद्या बागेंत गेलांत तर तुमच्या डोळ्यांना तेथें सुंदर फुलें दिसतात व तुमच्या घ्राणेन्द्रियांना त्यांचा सुगंध येतो. तथापि हा सुगंध तुमच्या डोळ्यांना दिसत नाहीं; म्हणून तुम्हांला सुगंध नाहीं असें म्हणतां येईल काय ? तुम्ही तो नाहीं असें म्हणूंच शकत नाहीं. कारण त्याचा तुम्हांला प्रत्यक्ष-

अनुभव येत असतो व त्यामुळें तुमचें मन प्रसन्न झालेलें असतें. हा आत्मा आपल्या नेत्रेन्द्रियांना दिसत नसला तरी तो आहे या गोष्टीवर श्वेतकेतूची श्रद्धा बसली. परंतु हा एकटा आत्मा सर्वत्र कसा भरलेला आहे हें कोडें त्याच्या बुद्धीला अद्यापि उलगडेना. म्हणून त्यानें आपल्या पित्याला प्रश्न केला:–" हे भगवन्! हा सत्स्वरूप आत्मा सूक्ष्म असल्यामुळें माझ्या डोळ्यांना दिसत नसला तरी तो कसा भरला आहे हें अद्यापि मला समजलें नाहीं. तरी तें कृपा करून मला सांगा." मुलाचा हा प्रश्न ऐकून आरुणि त्याला म्हणाला, "मुला, मी तेंहि तुला सांगतों. एक प्याला पाणी घे व त्यांत एक मिठाचा खडा टाक व तो प्याला उद्यां सकाळीं माझ्याकडे घेऊन ये. म्हणजे मी तुझ्या प्रश्नाचें उत्तर देईन."

सत्स्वरूप आत्म्याच्या व्यापकत्वाचा व पाण्यांत टाकलेल्या मिठाच्या खड्याचा संबंध काय हें श्वेतकेतूच्या ध्यानांत येईना. परंतु वडिलांच्या सांगण्याप्रमाणें एका प्याल्यांत पाणी भरून त्यांत एक मिठाचा खडा टाकल्यानंतरच तो झोंपीं गेला.

दुसऱ्या दिवशीं प्रात:काळीं स्नानसंध्यावंदनादि उरकल्यानंतर तो तत्त्वज्ञानपिपासू श्वेतकेतु तो मिठाचा प्याला घेऊन आपल्या वडिलांपाशीं आला व त्यांना म्हणाला, "भगवन्! आपल्या आज्ञेप्रमाणें हा मीठ टाकलेला प्याला मी आणला आहे. मला आपण याच्या साहाय्यानें आत्मा कसा सर्वत्र पसरलेला आहे हें सांगणार होतां, तें कृपा करून सांगा. मी तुमचा उपदेश ऐकण्याला अतिशय उत्सुक झालों आहें." यावर आरुणि श्वेतकेतूला म्हणाला, "वत्सा, रात्रीं जो मिठाचा खडा तूं प्याल्यांत टाकला होतास तो काढून माझ्या हातावर ठेव."

श्वतकेतूनें आपलीं बोटें त्या प्याल्यांत घालून सर्वत्र फिरवलीं. परंतु त्याच्या बोटांना मिठाचा खडा कोठेंच सांपडला नाहीं. प्याल्यांत पाण्याशिवाय दुसरें कांहींहि नव्हतें. तो आपल्या वडिलांच्या मुखाकडे पाहूं लागला. तेव्हां त्याचे वडील त्याला म्हणाले,

" श्वेतकेतो ! अगदीं तळाच्या पाण्यांतून एक चमचा पाणी घे, व तें प्राशन कर. " असें श्वेतकेतूनें केल्यावर आरुणीनें विचारलें, " कसें लागतें ? "

श्वेतकेतु—खारट.

आरुणि—आतां मध्यभागांतून एक चमचा घेऊन प्राशन कर. (श्वेतकेतूनें तसें केल्यावर)

आरुणि—कसें लागतें ?

श्वेतकेतु—खारट लागतें.

आरुणि—आतां वरच्या भागांतून आचमन कर. ( श्वेतकेतूनें तसें केल्यावर )

आरुणि—मुला, आतां कसें लागतें ?

श्वेतकेतु—भगवन् ! तरी सुद्धां खारटच लागतें.

आरुणि—श्वेतकेतो, तुला त्या पाण्यांत मिठाचा खडा सांपडला नाहीं व तो तुझ्या डोळ्यांना आतां दिसत नाहीं तरी तें मीठ त्या पाण्यांत आहे किंवा नाहीं ?

श्वेतकेतु—भगवन् ! आहे.

आरुणि—हें तूं कशावरून म्हणतोस ?

श्वेतकेतु—पाण्याच्या खारट चवीवरून.

आरुणि—वत्सा, तूं तळाच्या, मध्यभागाच्या व पृष्ठभागाच्या पाण्याचें आचमन केलेंस तरी तीनहि वेळां तुला तें पाणी खारटच लागलें. यावरून तूं काय निष्कर्ष काढलास ?

श्वेतकेतु——भगवन् ! तें मीठ या पाण्यांत सर्वत्र आहे. ज्यांत तें मीठ नाहीं असा पाण्याचा एकहि थेंब नाहीं.

आरुणि——श्वेतकेतु ! शाबास ! ज्याप्रमाणें तो मिठाचा खडा तुझ्या डोळ्यांना दिसत नाहीं तरी तो अव्यक्त व सूक्ष्म रूपानें या पाण्यांत सर्वत्र सांचलेला आहे अशी तुझी खात्री झाली, त्याप्रमाणेंच हा सत्स्वरूप सूक्ष्म आत्मा या जगाचें मूळ कारण असून तो सर्वत्र भरलेला आहे. हे श्वेतकेतो ! तो सत्स्वरूप सूक्ष्म आत्मा तूंहि आहेस हें मी आतां तुला निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

सत्स्वरूप, सूक्ष्म व अव्यक्त आत्मा या जगाचें मूळ कारण कसा आहे व तो सर्वत्र कसा संचलेला आहे हें श्वेतकेतूला समजलें. परन्तु, माझ्या मित्रांनो, ज्याला या आत्म्याचें ज्ञान झालें त्याच्या बाबतींत सूर्योदयाबरोबर जसा अंधकार त्याप्रमाणें स्वार्थ पार नष्ट होऊन जातो. श्वेतकेतूच्या मनांत असा प्रश्न आला कीं, या आत्म्याचें हें सत्य स्वरूप सर्व लोकांना कसें समजणार ? आरुणी-सारखा ब्रह्मविद्, प्रेमळ व आपल्या मुलाच्या हिताबद्दल कळकळ बाळगणारा पिता मला लाभला हें माझें सद्भाग्य. परन्तु तें सर्वांच्याच ललाटीं कसें लिहिलेलें असणार ? म्हणून त्यानें आपल्या पित्याला प्रश्न केला,

“ भगवन् ! तुम्हीं मला जो शास्त्रोपदेश केलात त्यावरून मला या आत्म्याचें ज्ञान झालें. परन्तु इतरांना त्याचा लाभ कसा व्हावा ? ” आरुणीनें उत्तर दिलें,

“ वत्सा ! समज, कंदाहारमध्यें राहणाऱ्या एका माणसाचे डोळे बांधले व मग त्याला वंग देशांतील एका ओसाड अरण्यांत आणून सोडलें. त्या मनुष्याला इकडच्या देशाची मुळींच माहिती नाहीं. त्याला कंदाहारला परत जावयाचें आहे, तर त्यानें काय करावें ? ”

श्वेतकेतु—जो पहिला मनुष्य त्याला भेटेल त्याला त्यानें प्रश्न करून कंदाहारचा रस्ता विचारावा व अशा रीतीनें तो हुशार व प्रसंगावधानी असेल तर लोकांना प्रश्न विचारीत विचारीत तो परत आपल्या गांवाला जाऊन पोहोंचेल अशी माझी खात्री आहे.

आरुणि——श्वेतकेतो, तूं अगदीं बरोबर बोललास. हीच स्थिति आत्मज्ञानाची आहे. अज्ञानाच्या ओसाड अरण्यांत सांपडलेल्या मनुष्यानें सत्पात्र सद्गुरूचें साहाय्य घेतल्यास त्याला आत्म्याचें पूर्ण ज्ञान होईल व आपण स्वतः तो आत्माच आहोंत असा अनुभव त्याला येईल व तो कृतकृत्य होईल.

मुलांनो, जेव्हां जेव्हां दुर्बलतेचे वारे तुमच्या अंतःकरणांत वाहूं लागतील तेव्हां आरुणीनें आपल्या मुलाला केलेल्या उपदेशाची आठवण करा. **तो सत्स्वरूप आत्मा तूंच आहेस.**

---

## गोष्ट ९ वी *

# तपश्चर्येनें ब्रह्मज्ञान

भृगूच्या अंतःकरणांत ब्रह्म काय आहे हें जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. तो आपला पिता वरुणी याच्याकडे गेला व त्याला म्हणाला, "भगवन्! ब्रह्म कशाला म्हणतात व त्याचें स्वरूप काय तें मला सांगा."

आपल्या पुत्राचा हा प्रश्न ऐकून वरुणीचें मन प्रसन्न झालें. मुलाच्या प्रश्नाचें ताबडतोब विस्तृत उत्तर देऊन त्याचें समाधान

---

* तैत्तिरीयोपनिषद्, भृगुवल्ली.

करणें वरुणीला शक्य होतें. परंतु शिक्षणाची ही पद्धति त्याल मान्य नव्हती. ही पद्धत विद्यार्थ्याची बुद्धि परावलंबी अतएव जड करते. भृगूनें स्वतःचीच बुद्धि चालवून आपल्या प्रश्नाचें उत्तर शोधून काढावें हें वरुणीला अधिक पसंत होतें. या संशोधनाच्या मार्गावर जेथें विद्यार्थ्यांची मति खुंटेल तेथेंच फक्त आपल्या सूचित प्रश्नानें अगर लक्षणानें तिला पुनः चालना देणें एवढेंच गुरूचें काम असावें, या मताचा तो होता. या पद्धतीमुळें विद्यार्थ्याची बुद्धि चौकस, धीट व तेजस्वी बनते. म्हणून ब्रह्माचें प्रत्यक्ष वर्णन न करतां वरुणीनें भृगूला पुढीलप्रमाणें त्याचें एक लक्षण सांगितलें.

"ही भूतसृष्टि ज्याच्यापासून उत्पन्न होते, उत्पन्न झालेली ज्याच्या योगानें जगते आणि शेवटीं ज्यांत जाऊन विलीन होते तेंच मूल तत्त्व ब्रह्म होय. म्हणून त्याचा तूं विचार कर व अभ्यास कर आणि तें जाणून घे."

पित्याच्या आज्ञेप्रमाणें भृगूनें अभ्यासपूर्वक विचार आरंभला व सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याला प्रारंभ केला. त्यावरून त्याला असें समजलें कीं, अन्न हेंच तें मूळ तत्त्व आहे. कारण सर्व प्राणिमात्रांचें शरीर अन्नाचें बनलेलें आहे व अन्नावरच त्याचे सर्व व्यापार अवलंबून असतात असें त्यानें पाहिलें. येथें पंचमहाभूतांनाच अन्न असें मानलें आहे. त्याचप्रमाणें जेव्हां प्राणी मरतात तेव्हां त्यांचें शरीर पंचमहाभूतांतच जाऊन मिळतें. ज्या अर्थी अन्नापासूनच सर्व प्राणिमात्र प्ररोह पावतात, त्याच्यावरच जगतात व त्यांतच विलीन होतात, त्या अर्थी अन्न हेंच सर्वश्रेष्ठ व म्हणून ब्रह्म असलें पाहिजे असें भृगू समजला. मनुष्याच्या बालबुद्धीला मनुष्य म्हणजे त्याचें जड शरीर असेंच वाटतें व हें शरीर अन्नावरच अवलंबून असतें. सर्व सृष्टींत या शरीराच्या धारणेसाठीं एक दुसऱ्याला खात

आहे तर त्याला तिसरा खात आहे असा देखावाच, माझ्या मित्रांनो, आपल्याला सर्वत्र दिसतो. सापाच्या तोंडांत स्वत: अर्धा गेला असतांनाच बेडूक माशीला खाण्याचा प्रयत्न करीत असतो. सृष्टि-व्यापार म्हणजे 'खाणें व खाल्लें जाणें' या क्रियेची अखंडावस्था, अशी जर कोणीं व्याख्या केली तर सकृद्दर्शनीं ती कोणालाहि बरोबरच वाटेल. मात्र वर सांगितल्याप्रमाणें अन्न म्हणजे मनुष्य ज्याला खाण्याचा पदार्थ समजतो तेवढेंच, असा संकुचित अर्थ येथें अभिप्रेत नाहीं. जें ज्याच्या जीवनाला उपयोगी पडतें तें त्याचें अन्न असा येथें अन्नाचा व्यापक अर्थ घेतला पाहिजे. भृगूनें या व्यापक अर्थानेंच अन्नाचा अभ्यास व विचार केला व हें मूळ तत्त्व आहे असें ठरविलें. तथापि आपल्या बुद्धीनें अन्न हेंच ब्रह्म असें ठरविलें असलें तरी आपल्या पित्याला विचारून मग नक्की ठरवावें असें त्यानें ठरविलें व तो वरुणीकडे येऊन त्याला म्हणाला,

"भगवन्! अभ्यासपूर्वक विचार करतां अन्न हेंच ब्रह्म आहे असें माझ्या बुद्धीला वाटतें. माझें हें वाटणें खरें आहे किंवा नाहीं तें मला सांगा."

वरुणीनें उत्तर दिलें, "तपाच्या योगानें ब्रह्माचें संपादन कर. तप हेंच ब्रह्म होय."

वरुणीनें भृगूच्या प्रश्नाला, तुझें वाटणें खरें आहे किंवा खोटें आहे असें कांहींच उत्तर दिलें नाहीं. अधिक अभ्यास कर, तप हेंच ब्रह्म आहे, एवढेंच त्यानें त्याला सांगितलें.

मुलांनो, वरुणीनें भृगूला तप करण्याला सांगितलें म्हणजे विचारपूर्वक अभ्यास करावयाला सांगितला हें अवश्य लक्षांत ठेवा. तप म्हणजे केवळ व्रतवैकल्य, उपासतापास किंवा शरीरदंड अशी आज पुष्कळ लोकांची समजूत झालेली आहे. परंतु लोकांची ही समजूत चुकीची आहे, हें आतां तुमच्या ध्यानांत

आलेंच असेल. विद्यार्जनासाठीं केलेला सशास्त्र अभ्यास हेंहि सर्वांत एक श्रेष्ठ तपच आहे. हें तपच ब्रह्म होय, असें वरुणी आपल्या मुलाला सांगतो. आणि तें बरोबर नाहीं असें कोण म्हणेल? तप हें ब्रह्मप्राप्तीचें साधन आहे ही गोष्ट खरी, परंतु त्याची मातब्बरी फारच मोठी आहे. कारण ' अगा उपायबळें। पंगु पहाड ठाकी ' असा आजपर्यंतचा श्रेष्ठांचा अनुभव आहे.

वडिलांच्या सांगण्याप्रमाणें भृगूनें पुन: अभ्यासाला व विचाराला प्रारंभ केला. अन्नापासूनच सर्व प्राणी उत्पन्न होतात व अन्नानेंच जगतात. अन्नावांचून कोणाचेंहि चालणार नाहीं हें खरें. परंतु मनुष्य केवळ अन्नानेंच जगतो असें नाहीं. त्याचप्रमाणें प्राण नसेल तर त्याला अन्नाचा काडीचाहि उपयोग नाहीं. अन्न मेलेल्या माणसाला प्राण देऊं शकत नाहीं. तेव्हां सर्व स्थावरजंगम स्थूल सृष्टीच्या अस्तित्वाला मुळांत प्राणाची जरूरी आहे. तेव्हां पित्यानें प्रथमारंभीं ब्रह्माचें जें लक्षण सांगितलें तें प्राणाला लागूं पडतें असें भृगूला वाटलें व प्राण हाच ब्रह्म असें त्यानें ठरविलें. तो आपल्या पित्याकडे आला व त्यानें त्याला हा निर्णय सांगितला. तेव्हां वरुणीनें उत्तर दिलें,

" तपाच्या योगानें ब्रह्म समजावून घेण्याचा प्रयत्न कर. कारण तप हेंच ब्रह्म होय." तुझा निर्णय खोटा आहे असें वरुणीनें भृगूला सांगितलें नाहीं हें खरें. परंतु तो सत्य आहे असेंहि त्यानें सांगितलें नाहीं. भृगूनें यावरून असा निष्कर्ष काढला कीं, आपला निर्णय अद्याप संपूर्ण सत्य नसला पाहिजे. तेव्हां पित्याच्या आज्ञेप्रमाणें त्यानें पुन: अभ्यासपूर्वक विचार करण्यास प्रारंभ केला.

भृगु जेव्हां अधिक विचार करूं लागला तेव्हां त्याला असें दिसलें कीं, जरी मनुष्याचें अस्तित्व प्राणावर अवलंबून आहे तरी

त्याचा सर्व व्यापार व व्यवहार त्याच्या मनावर अवलंबून आहे. हाल-चाल न करणारा व्यापारविहीन प्राणी जिवंत असूनहि, मुलांनो, जड मातीच्या गोळ्याप्रमाणें आहे. मनुष्याचें मन ही मोठी सूक्ष्म शक्ति आहे. खरें पाहिलें तर मनापासूनच सर्व सृष्टि निर्माण होते. आपल्यापैकीं प्रत्येकाला या मनाच्या शक्तीचा अनुभव आहे. मन इतकें सूक्ष्म आहे कीं, तें आपल्या पितामहाच्यासुद्धां हातांत सांपडणार नाहीं. तरी बसल्या जागेवरूनच तें दाही दिशा हिंडून व पृथ्वीला प्रदक्षिणा करून येतें. वर्गांत गुरुजी धडा समजावून सांगत असतात व तुमचें सर्व लक्ष गुरुजींकडे लागलेलें असतें. इतक्यांत तुमच्या डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच तुमचें मन गरकन् किती तरी दूर फेरा मारून परत येतें. शरीर वर्गांत असतांना आपलें मन कोठें कोठें जाऊन येतें याचा अनुभव सर्वांप्रमाणें मलाहि आहे. त्या अनुभवावरून जर मी तुमच्या मनाच्या दौऱ्यांतील अनुभव तुम्हांला सांगूं लागलों, तर माझी खात्री आहे कीं, तुम्ही पुष्कळ वेळां लाजेनें व कित्येक वेळां भीतीनें माझ्या तोंडावर हात ठेवाल. हें मन इतकें सूक्ष्म आहे कीं, त्याची सर्वत्र गति आहे. तसेंच, मुलांनो, मन हें केवळ प्राणि-मात्राच्याच शरिरांत आहे अशी जर तुमची समजूत असेल तर ती बरोबर नाहीं. प्राण्याप्रमाणेंच वनस्पतीसारख्या स्थावर पदार्थांत देखील तें आहे. तेव्हां प्राणापेक्षांहि मन श्रेष्ठ व सूक्ष्म आहे. त्याच्यापासूनच ही सर्व सृष्टि निर्माण होते व त्यांतच विलीन पावते. आत्मा पूर्वी एकटाच होता, परंतु त्याला करमेना. आपण बहुत व्हावें अशी त्याला इच्छा झाली व त्यानें आपल्या मनाच्या संकल्पा-पासूनच सर्व सृष्टि निर्माण केली. तेव्हां मन हेंच ब्रह्म आहे असें भृगूनें ठरविलें व तो आपल्या पित्याकडे आला. पित्यानें त्याला फिरून पूर्वीप्रमाणेंच सांगितलें,

"वत्सा, तपानें तूं ब्रह्मज्ञान संपादन कर. तप हेंच ब्रह्म आहे."

भृगु पुनः अभ्यासपूर्वक विचार करूं लागला. मनाची गति वायू-प्रमाणें आहे. तेव्हां वायु जसा जाळ्यांत सांपडणें कठीण त्याप्रमाणें मन हें कोणाच्या ताब्यांत राहणें सुदुष्कर आहे. होय; सकृद्दर्शनीं असें वाटतें व भृगूलाहि तसेंच वाटलें असेल. परंतु भृगु जेव्हां अधिक विचार करूं लागला तेव्हां त्याला समजलें कीं, आपणाला वाटतें त्याप्रमाणें मनाची स्थिति नाहीं. त्यालाहि ताळ्यावर आणून आपल्या ताब्यांत ठेवणारी एक शक्ति प्राण्यामध्यें आहे, असें भृगूच्या ध्यानांत आलें. बुद्धि हीच ती शक्ति होय. मुलांनो, हा तुमचा नेहमींचा अनुभव असेल. तुम्ही अभ्यास करूं लागलां म्हणजे कित्येक वेळां तुमचें मन तुमच्या मर्जीविरुद्ध दुसऱ्याच गोष्टींचा विचार करूं लागतें व तुम्ही जेथें बसलेले असतां त्या जागेंतून किती तरी दूर तें निघून जातें. तुमच्या अभ्यासांत व्यत्यय येतो. अशा वेळेस तूं करीत आहेस तें बरोबर नाहीं; तुला लक्षपूर्वक एकाग्र चित्तानें अभ्यास केला पाहिजे, असें मनाला बजावून त्याला परत आणून अभ्यासाला कोण लावतें बरें? तुमच्या वडिलांची रागीट मुद्रा किंवा तुमच्या मातेचे सदोप प्रेमळ बोल? बरोबर उत्तर दिलें नाहींत. तुमचें मन अभ्यासांत नाहीं हें त्यांना कसें समजलें? कारण तुमचें वाचन अगर अभ्यास बाह्यतः यंत्रवत् सुरूच आहे. तुमचें मन अभ्यासांत नाहीं ही गोष्ट तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याहि ध्यानांत येणें शक्य नाहीं. मुलांनो, तुमची बुद्धिच या वेळेला तुमच्या मदतीला धांवून येते व तीच मनाच्या मुसक्या बांधून त्याला परत आणते व पुनः अभ्यासाला जुंपते. तेव्हां मनापेक्षां बुद्धि श्रेष्ठ ठरली. बुद्धि हें तत्त्व मनाहूनहि श्रेष्ठ व सूक्ष्म आहे. तेव्हां तेंच ब्रह्म असलें पाहिजे, असें भृगूनें ठरविलें व त्याप्रमाणें पित्याकडे येऊन

त्याला सांगितलें. वरुणीनें मुलाला फिरून उपदेश केला,

"तपानेंच तूं ब्रह्म समजावून घेण्याचा प्रयत्न कर. तप हेंच ब्रह्म आहे."

"मुला, अभ्यास कर; मुला, अभ्यास कर" याचा माझ्या मित्रांनो, तुम्हांला अगदीं वीट आला असेल नाहीं? भृगूचा असा पिच्छा पुरविल्याबद्दल तुम्हाला वरुणीचा थोडा रागहि आला असेल. परन्तु भृगूला आपल्या वडिलांचा बिलकूल राग आला नाहीं. ज्याला विद्या पाहिजे असेल त्यानें अभ्यासाचा आळस करतां कामा नये हें त्याला माहीत होतें. योग्यता पाहिजे असेल तर अभ्यासाच्या बाबतींत दक्ष राहिलें पाहिजे. भृगू पित्याच्या आज्ञेप्रमाणें पुन: विचार करूं लागला.

अन्न, प्राण, मन व विज्ञान म्हणजे बुद्धि हीं तत्त्वें एकाहून एक श्रेष्ठ आहेत हें खरें. त्याचप्रमाणें प्राण्याला त्या सर्वांची आवश्यकता आहे हेंहि तितकेंच खरें. परन्तु त्यांची आवश्यकता कशासाठीं? अन्नाची आवश्यकता, प्राणाचें अस्तित्व, मनाचे व्यापार व बुद्धीचें जागणें हें कशासाठीं? भृगूला आंतून उत्तर मिळालें '**आनंदासाठीं.**' आनंद हा सर्व प्राणिमात्रांचें ध्येय आहे. एवढेंच नव्हे तर त्याचें खरें मूळस्वरूप आनंदमयच आहे. तुम्ही म्हणाल, हें कशावरून? कशावरून तें पहा. मन, बुद्धि वगैरे इंद्रियांच्या व्यापारांकरवीं कोणत्याहि बाह्य विषयापासून आपल्याला आनंद मिळत नसतांहि, मुलांनो, आपल्यापैकीं प्रत्येकाला 'आपण आहोंत व असावें' या भावनेपासून एक निर्मळ आनंद मिळत असतो. मनुष्यावर दु:खाचे डोंगर कोसळले तरी त्यांतून पार पडण्याची शक्ति हा आनंदच त्याला देतो. चारी बाजूंनीं दु:खाची आग पेटली तरी मनुष्याला त्यांत उडी घालून आपला अंत करून घ्यावा असें कां

वाटत नाहीं याचें पुष्कळ वेळां आपल्याला बहुत आश्चर्य वाटतें. परन्तु त्यांत आश्चर्य कांहीं नाहीं असें आतां तुमच्या लक्षांत आलें असेल. ' मीं नसावें ' असें कोणाहि मनुष्याला खरोखर मनापासून कधींहि वाटत नाहीं. तुम्हीं जरा आपलें मन शांत व एकाग्र केलेंत तर मी जें सांगत आहें तें सत्य आहे असें तुमच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. तुम्हीसुद्धां या आंतरिक शुद्ध आनंदाचा पुष्कळ वेळां अनुभव घेतला असेल. हा शुद्ध आनंद नित्य म्हणजे सदैव टिकणारा आहे म्हणूनच तो ब्रह्म आहे. आपला आत्मा शुद्ध आनंद अथवा प्रेमस्वरूप आहे. या आत्म्याचें आपलें ज्ञान जसजसें अधिक वाढत जातें तसतसें आपलें अंतःकरण अधिक अधिक प्रेममय बनत जातें व आपल्या प्रेमाची व्याप्ति वाढूं लागते. कारण आपल्यामधील प्रेममय आत्माच सर्व प्राणिमात्रांत भरलेला आहे ही गोष्टहि आपल्याला या प्रेमाच्या द्वारांच समजते. अखेर आपल्या आयुष्यांत असा एक दिवस उजाडतो कीं जेव्हां, चंद्र जसा पृथ्वीवर त्याप्रमाणें आपली दृष्टि सर्व प्राणिमात्रावर शीतल प्रेमामृताची वृष्टि करूं लागते. सर्व सृष्टींत आपण आपल्याशिवाय दुसऱ्या कोणालाच पहात नाहीं. आतां आपल्यांतील स्वार्थबुद्धि नष्ट झाल्यामुळें आपले सर्व व्यापार अखिल भूतसृष्टीच्या हिताच्या दृष्टीनेंच होऊं लागतात व आपल्याला त्यापासून शुद्ध आनंद मिळतो. जसें सरोवरांत सरोवर त्याप्रमाणें हा बाहेरचा शुद्ध आनंद व आंतील शुद्ध आनंद एकमेकांत मिळतात. जोंपर्यंत विषयभोगांत, आपल्या मनाच्या व्यापारांत अगर बुद्धीच्या विकासांतच सर्व आनंद भरलेला आहे असें आपल्याला वाटत होतें तोंपर्यंत जगाशीं आपला पूर्ण विरोध होता. जेथें विरोध तेथें घर्षण हें उत्पन्न होतेंच व घर्षणाच्या मागें अशांतता ठेवलेलीच. आणि, मुलांनो, ज्याप्रमाणें

आळसाच्या घरीं विद्या वस्ती करीत नाहीं त्याप्रमाणें अशांततेच्या घरीं सुख नांदत नाहीं. तेव्हां आत्म्याचें शुद्ध आनंदस्वरूप संपूर्णपणें समजलें म्हणजे मनुष्याला संपूर्ण आनंद मिळतो व हा शुद्ध आनंदच ब्रह्म आहे. आपल्या बुद्धीला एकदां ही गोष्ट समजली म्हणजे ज्याप्रमाणें अमृताची चव घेतलेला मनुष्य फिरून कांजीकडे ढुंकूनसुद्धां पाहत नाहीं त्याप्रमाणें ती फिरून विषयसुखाकडे वळत नाहीं. ती या ब्रह्मानंदांतच कायमची रममाण होते. अशा बुद्धीलाच आत्मनिष्ठ बुद्धि असें म्हणतात. भृगूची बुद्धि दीर्घ तप म्हणजे अभ्यासपूर्वक चिंतन व चाळणा केल्यावर आत्मनिष्ठ झाली व तिला ब्रह्म म्हणजे काय हें समजलें.

माझ्या मित्रांनो, ज्याप्रमाणें मुक्कामापाशीं मार्ग संपतो त्याप्रमाणें ब्रह्मप्राप्तीबरोबर भृगूचा शोध थांबला. भृगूला ब्रह्म समजलें व मिळालें, मग मी तरी माझी गोष्ट पुढें कशाला चालवूं? तुम्हांला भृगूच्या आनंदांत मजा लुटावयाला मिळावी म्हणून मीहि माझी गोष्ट येथें संपवितों.

**भृगुर्वै वारुणिः। वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तस्मा एतत्प्रोवाच। अन्नं प्राणं चक्षुः, श्रोत्रं मनो वाचमिति। तं होवाच। यतो वा इमानि भूतानि जायन्ते। येन जातानि जीवन्ति। यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति। तद्विजिज्ञासस्व। तद्ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा ॥**

**अन्नं ब्रह्मेति व्यजानात्। अन्नाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। अन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तं होवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा ॥**

प्राणो ब्रह्मेति व्यजानात्। प्राणाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। प्राणेन जातानि जीवन्ति। प्राणं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तं होवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा॥

मनो ब्रह्मेति व्यजानात्। मनसो ह्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। मनसा जातानि जीवन्ति। मनः प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा॥

विज्ञानं ब्रह्मेति व्यजानात्। विज्ञानाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। विज्ञानेन जातानि जीवन्ति। विज्ञानं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तं होवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा॥

आनंदो ब्रह्मेति व्यजानात्। आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। आनंदेन जातानि जीवन्ति। आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। सैषा भार्गवी वारुणी विद्या। परमे व्योमन्प्रतिष्ठिता। स य एवं वेद प्रतितिष्ठति। अन्नवानन्नादो भवति। महान्भवति। प्रजयापशुभिर्ब्रह्मवर्चसेन महान्कीर्त्या॥

NO..................
Date..................

## गोष्ट १० वी*

# ब्रह्मच जगाचा आधार

ज्याप्रमाणें आकाशांत तारे त्याप्रमाणें जनक राजाच्या सभेंत अनेक विद्वद्रत्नें चमकत होतीं. त्यांमध्यें गार्गीसारखीं कांहीं स्त्रीरत्नेंहि आपल्या तेजानें जनकाच्या सभास्थानाला अधिक शोभा देत होतीं. सभागृह विद्वानांनीं व विदुषींनीं गच्च भरून गेलें होतें. अनेक गहन विषयांवर वादविवाद व प्रश्नोत्तरें सुरू होतीं. पावसाच्या सरीवर सरी झडाव्यात त्याप्रमाणें उपस्थित विद्वानांकडून व विदुषींकडून याज्ञवल्क्यावर प्रश्नांच्या सरी झडत होत्या. याज्ञवल्क्यानें त्या सर्वांना सविस्तर व समर्पक उत्तरें देऊन त्यांचें समाधान केलें होतें. तेथें जमलेले विद्वान् आपापल्या विषयांत पूर्ण पारंगत होते. परंतु याज्ञवल्क्यापुढें कोणाचा टिकाव लागेना. ज्याप्रमाणें दिनकरापुढें ताऱ्यांची तेजसंपत्ति त्याप्रमाणें याज्ञवल्क्यापुढें सर्व विद्वानांचें तेज फिक्कें पडलें होतें. सर्व सभा तटस्थ बसली होती. परंतु तेजस्वी गार्गीला हें सहन झालें नाहीं. याज्ञवल्क्याशीं दोन हात करण्याचें तिनें ठरविलें व ती वादाला पुन: पुढें सरसावली. ती सभेमध्यें पूर्वी बोलली होती. म्हणून सभेच्या नियमांप्रमाणें तिनें अध्यक्षांना पुन: भाषण करण्याची परवानगी मागितली. सभेला अध्यक्ष असणें, एकदां बोलल्यानंतर पुन: भाषण करावयाचें असेल तर अध्यक्षाची परवानगी मागणें व एकाच वेळेला एका सभासदानें बोलणें वगैरे सभेचे नियम आजच्या-प्रमाणें उपनिषत्कालींहि पण, मुलांनो, होते. अध्यक्षानें गार्गीला पुन: बोलण्याला परवानगी दिली. तेव्हां गार्गी सभेला म्हणाली,

---

* बृहदारण्यकोपनिषद्, अ. ३, ब्रा. ८.

“अहो परमपूज्य ब्राह्मण हो, आतां मी याज्ञवल्क्याला दोन प्रश्न विचारतें. माझ्या प्रश्नांचीं जर यानें योग्य उत्तरें दिलीं तर तुमच्यापैकीं कोणीहि या ब्रह्मवादी ऋषीला केव्हांहि जिंकणार नाहीं.”

ब्राह्मण ऋषी म्हणाले, “हे गार्गि! तुझे प्रश्न विचार. तुझें म्हणणें आम्हांला मान्य आहे.”

माझ्या मित्रांनो, गार्गीचा सभाधीटपणा व थोर विद्वत्ता यांना ऋषींनीं मान्यतादर्शक माना डोलावल्या व याज्ञवल्क्यासारख्या ब्रह्मविद्येंतील बिनतोड मल्लाशीं आपल्या सर्वांच्या तर्फे दोन हात करण्याला तिला परवानगी दिली. यावरून गार्गीची विद्वत्ता त्या काळीं सर्वश्रुत व सर्वमान्य होती हें अगदीं स्पष्ट आहे. तसेंच गार्गी केवळ स्त्री आहे म्हणून त्या ब्राह्मण ऋषींनीं तिला आपल्यापेक्षां एक रतीभरहि कमी लेखलें नाहीं. याज्ञवल्क्य एवढा ब्रह्मवेत्ता ब्राह्मण पण त्यानेंहि गार्गीशीं समानतेच्या नात्यानें ब्रह्मविद्येसारख्या गूढ विद्येंत वाद केला व तिच्या प्रश्नांना समर्पक व समाधानकारक उत्तरें दिलीं. सध्यांचा काळ स्त्रीस्वातंत्र्याचा आहे असें आपण, मुलांनो, मोठ्या अभिमानानें म्हणतों. तथापि या स्त्रीस्वातंत्र्याच्या काळांतहि आपण आपल्या भगिनींना इतक्या समानतेच्या नात्यानें वागवितों किंवा कसें याबद्दल मला शंका आहे.

सभाध्यक्ष व सभासद यांची संमति मिळतांच गार्गी याज्ञवल्क्याला म्हणाली,

“हे याज्ञवल्क्या, मी तुला प्रश्न करतें. काशी देशांतील किंवा विदेह देशांतील क्षत्रिय दोरी उतरलेलें धनुष्य चटकन् पुनः सज्ज करतात आणि शत्रूला अतिशय घायाळ करणारे व तीक्ष्ण टोकें बसविलेले दोन बाण हातांत घेऊन शत्रूवर चालून जातात;

त्याप्रमाणेंच मी तुझ्यावर या दोन प्रश्नांच्या योगानें हल्लाच चढवीत आहें त्यांचीं मला उत्तरें दे."

याज्ञवल्क्य व गार्गी यांमध्यें वाग्युद्ध सुरू होणार होतें. तेव्हां गार्गीनें समयसूचकतेनें त्याच्यावर खऱ्या युद्धाचें रूपक करावें हें तिला गौरवास्पद नव्हतें असें कोण म्हणेल? पण याज्ञवल्क्यहि कांहीं कमी नव्हता. त्यानेंहि आतांपर्यंत वाक्समरभूमीवर अनेक योद्ध्यांना नामोहरम करून विजयश्री संपादन केली होती. तेव्हां तो गार्गीला म्हणाला,

"हे गार्गि, खुशाल विचार."

तेव्हां ती गार्गी म्हणाली, "हे याज्ञवल्क्या! हें ब्रह्मांड अधांत्रीं लोंबत आहे असें दिसतें. याला कांहीं आधार आहे काय?"

याज्ञवल्क्य म्हणाला, "हे गार्गि! या ब्रह्मांडाला आकाशाचा आधार आहे. वस्त्रांत जसे आडवे व उभे सुताचे धागे भरलेले असतात त्याप्रमाणें ब्रह्मांड आकाशाशीं संयुक्त असून आकाशावरच आधारलेलें आहे."

मुलांनो, याज्ञवल्क्य ज्याला आकाश म्हणतो त्यालाच अर्वाचीन शास्त्रज्ञ ईथर असें म्हणतात. आकाश हेंच मूलद्रव्य म्हणजे प्रकृति असून त्याच्याचपासून क्रमाक्रमानें स्थावर जंगम पदार्थांची उत्पत्ति झालेली आहे. ज्याच्यापासून जें बनतें तें त्याचें अधिष्ठान असें समजलें जातें. उदाहरणार्थ, लाकडापासून पेटी वगैरे अनेक वस्तू बनतात म्हणून लाकूड हें त्या पेटीचें व अन्य वस्तूंचें अधिष्ठान म्हणतात. त्याचप्रमाणें इतर वस्तूंचें आहे. तेव्हां आकाशापासून जगांतील सर्व पदार्थ उत्पन्न झाले आहेत म्हणून त्याला या पदार्थांचें अधिष्ठान म्हणतात.

गार्गी म्हणाली, "हे याज्ञवल्क्या ! ज्या सर्व ब्रह्मांडाचें अधिष्ठान आकाश आहे त्याचें अधिष्ठान कोण आहे ?"

याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें :

"हे गार्गि ! हें आकाश ब्रह्मांत ओतप्रोत भरलेलें आहे व तेंच त्याचें अधिष्ठान आहे. हें ब्रह्म इतकें मोठें आहे कीं, त्याचें कोणत्याहि मापानें माप करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें या ब्रह्माला कोणतेंहि रूप नाहीं; कसलाहि रंग नाहीं. ज्याच्या योगानें बारीक कण एकमेकांस चिकटून राहतात तो आर्द्रपणा या ब्रह्मांत नाहीं. तें सर्वांचा आधार आहे. परन्तु त्याचा कशाशींहि संबंध नाहीं. इंद्रियें ज्या शक्तीच्या साहाय्यानें आपले सर्व व्यापार करतात ती शक्ति या अक्षर ब्रह्माचीच आहे. तथापि या ब्रह्माला इंद्रियें नाहींत. तें एकजिनसी सर्वत्र भरलेलें आहे.

"हे गार्गि ! याच्याच सत्तेखालीं सूर्यचंद्र नित्य प्रकाशतात व पूर्व पश्चिमवाहिनी नद्या अखंड वाहतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रह्मांडांतील सर्व देवांचा, मानवांचा, पशुपक्ष्यांचा व वनस्पतींचा सर्व व्यवहार या ब्रह्मतत्त्वाच्या शक्तीनेंच चालतो. ही ब्रह्माची शक्ति निरनिराळ्या ठिकाणीं वाटलेली नाहीं व ती अदृश्य आहे. देशांतील निरनिराळे अंमलदार आपापला कारभार नियमित व सुसंघटित रीतीनें चालवितात असें आपण पाहतों. या अंमलदारांची शक्ति त्यांची स्वतःची आहे असें सकृद्दर्शनीं आपल्याला वाटतें. परंतु ती शक्ति खरोखर त्यांची नसून देशांतील राजाची असते व त्याच्यापासूनच ती त्यांना प्राप्त झालेली असते. त्याचप्रमाणें एखाद्या नदीचें किंवा तलावाचें पाणी निरनिराळ्या पाटांनीं निरनिराळ्या ठिकाणीं नेतात व त्याच्यावर निरनिराळीं पिकें तयार करतात. तथापि तें पाणी व त्याचा उगम एकच असतो. राजसत्तेचें हुबेहूब असेंच आहे व

ब्रह्मसत्ताहि पण अशीच आहे. हे गार्गि, त्या ब्रह्माच्या सत्तेशिवाय या विश्वांतील एक पानसुद्धां हालत नाहीं.

" हे ऋषिकन्ये ! जो मनुष्य या अक्षर ब्रह्माचें ज्ञान संपादन न करतां केवल कर्मे करतो त्याचीं तीं कर्मे वांया जातात. त्यांचा त्याला खरा उपयोग होत नाहीं. या गृहस्थाची स्थिति मिठाईवाल्या-प्रमाणें आहे. मिठाईवाला अनेक प्रकारची मिठाई तयार करतो, परंतु त्याला तिचा कांहींच उपयोग नसतो. ती दुसऱ्यांकरितांच तयार केलेली असते. त्याच्या डोळ्यांनाच फक्त मेजवानी मिळते; जो मनष्य अक्षर ब्रह्माचें ज्ञान संपादन न करतां मरतो तो कृपण समजावा. कृपणाप्रमाणेंच त्याला त्याच्या कर्मसंपत्तीचा काडीचाहि उपयोग होत नाहीं. जो या अक्षर ब्रह्माचें ज्ञान संपादन करून इह-लोकांतून जातो तोच ब्राह्मण म्हणजे ब्रह्मज्ञानी होय. हे गार्गि, याच अक्षरब्रह्मांत आकाश ओतप्रोत भरलेलें आहे."

आपल्या प्रश्नांचीं याज्ञवल्क्यानें दिलेलीं समर्पक व सविस्तर उत्तरें श्रवण करून, मुलांनो, गार्गीचें समाधान झालें. गार्गीच्यामध्यें खेळाडूची उदार वृत्ति होती, प्रतिपक्षामधील गुण मान्य करण्याइतकें तिचें हृदय सरल व गुणज्ञ होतें. माझ्या मित्रांनो, आपण आपल्या प्रतिपक्षाबद्दल इतकी सहिष्णुता, सरलता, गुणज्ञता दाखविण्याला शिकूं तर आपलें खाजगी व सार्वजनिक जीवन किती निर्मळ, प्रेमळ व शांत होईल ! आपले गुण व आपल्यांतील शक्ति परस्परांना विरोधासाठीं विरोध करण्यांत खर्च न होतां परस्परांना साहाय्यक होईल व आपलें सर्वांचेंच कल्याण होईल.

गार्गी यानंतर सभेला म्हणाली,

" अहो परमपूज्य विद्वान् हो, जर नमस्कारयुक्त धन्यवाद देऊन या ब्रह्मवेत्त्यापासून आपली सुटका करून घेतलीत तर तोच तुमचा

मोठेपणा आहे असें समजा. कारण तुमच्यापैकीं कोणीहि विद्वान् या ब्रह्मवेत्त्या ऋषीला केव्हांहि जिंकूं शकणार नाहीं." इतकें बोलून गार्गी वादांतून निवृत्त झाली.

माझ्या मित्रांनो, तुम्हीहि गार्गीप्रमाणें विद्वान्, बहुश्रुत, ब्रह्मजिज्ञासू, समयसूचक, सभाधीट, सरलहृदयी व गुणज्ञ होण्याचा प्रयत्न करा अशी माझी तुम्हांला नम्र प्रार्थना आहे.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला

# प्रकाशित झालेले ग्रंथ

***१, २. सत्याचे प्रयोग** अथवा **महात्मा गांधींचें आत्मचरित्र**

महात्मा गांधींनीं स्वतः लिहिलेल्या आत्मचरित्रावरून त्यांचें जीवनरहस्य, सत्याग्रहस्वरूप आणि त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत व चंपारण्यांत केलेल्या मोहिमांचें तत्त्व स्पष्ट होतें. या ग्रंथाचा सर्व जगांत मोठा गौरव झाला आहे. अनेक देशी-विदेशी पंडितांनीं याचा पुरस्कार केला आहे. किं. प्रत्येक भागास १ रु.

**३. खादी मीमांसा**—( शिल्लक नाहीं. ) किं. १२ आणे.

**४. स्वराज्य शिष्टाई**

महात्मा गांधींचीं गोलमेजपरिषदेपुढील भाषणें आणि विलायतेंतील इतर मुलाखती वगैरे. किं. ६ आणे.

**५. संयम कीं स्वैराचार**

महात्मा गांधींच्या ब्रह्मचर्य आणि संततिनियमनावरील लेखांचें सुबोध भाषांतर. किं. ८ आणे.

**६. हिंडलग्याचा प्रसाद**—काका कालेलकरकृत.

ग्रामसंघटनेंतील सर्व प्रश्नांची तात्त्विक आणि व्यावहारिक चर्चा करून काकांनीं महाराष्ट्रवाचकांना कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. गांधीवादाचें निर्मळ स्वरूप यांतून समजून घ्या. किं. ९ आणे.

***७. हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना**—

प्रख्यात तत्त्वज्ञ सर राधाकृष्ण यांच्या 'Hindu View of Life' या अत्यंत नांवाजलेल्या ग्रंथाचें सुबोध भाषांतर वाचून हिंदुधर्माचे सिद्धांत जाणून घ्या. किं. १ रु.

***८. उपनिषदांतील दहा गोष्टी**—( पुनर्मुद्रण ) ले. शंकर दत्तात्रय देव.

उपनिषदांतील गूढ रहस्यांचा सुबोधतेनें परिचय व्हावा म्हणून मुळांतील ठळक कथांचा यांत अनुवाद करण्यांत आला आहे. किं. ६ आणे.

***९. विद्यार्थिजीवन**——ले. श्रीपाद सदाशिव महाजन.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक उन्नतीला पोषक अशा विविध विषयांचें या पुस्तकांत सोप्या भाषेंत विवेचन केलेलें आहे. कि. ८ आणे.

***१०. फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास**—ले. त्र्यं. र. देवगिरीकर.

३५० वर्षांच्या पारतंत्र्यांत फिलिपिनोजनीं बंडें केलीं, परक्या राष्ट्रांच्या मदतीकरितां याचना केली, कौन्सिलें लढविलीं, राष्ट्रसंघापुढें गाऱ्हाणीं मांडलीं, पण व्यर्थ गेलें. जोसे रिझालचें चरित्र म्हणजे स्फूर्तीचा अखंड झरा आहे. स्पेनच्या ताब्यांतून सुटून अमेरिकेच्या ताब्यांत हीं बेटें कशीं गेलीं याचा संतापजनक इतिहास या पुस्तकांत आढळतो. कि. १ रु.

**११. कॉंग्रेसचा इतिहास**—( आवृत्ति दुसरी )

कॉंग्रेसच्या गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास म्हणजेच भारतवर्षानें आतांपर्यंत स्वातंत्र्याप्रीत्यर्थ केलेल्या चळवळीचा संपूर्ण इतिहास ह्या पुस्तकांत दिलेला आहे. प्रत्येक स्वातंत्र्येच्छु मनुष्यास हें पुस्तक संग्रहीं ठेवतां यावें म्हणून ह्या साडेआठशें पानांच्या पुस्तकाची कि. २ रुपयेच ठेवली आहे.

**१२. समाजवादच कां?**——ले. जयप्रकाश नारायण.

समाजवादच कां प्रस्थापित झाला पाहिजे, समाजवाद म्हणजे काय, समाजवाद प्रस्थापित झाला म्हणजे समाज कसा सुखी होईल, याचें अगदीं सोप्या भाषेंत या पुस्तकांत वर्णन केलें आहे. कि. १० आणे.

**१३. सोशॅलिझम** अथवा **समाजवादाचा ओनामा**—ले. पां. वा. गाडगीळ. कि. १ रुपया.

**१४. खानबंधूंचा अल्प परिचय**——ले. महादेवभाई देसाई.

अबदुल गफूरखान व डॉ. खान ह्या बंधुद्वयांचें अल्पचरित्र यांत वर्णिलेलें आहे. कि. ९ आणे.

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार विद्याखात्यांनीं शाळेंतील लायब्ऱ्यांकरितां मंजूर केलीं आहेत.

# जवाहरलाल नेहरू यांचें आत्मवृत्त

अनुवादकः—श्री. ना. ग. गोरे, बी.ए., एल्एल.बी.

या ग्रंथांत जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या जीवनांत बाळपणापासून कसें परिवर्तन होत गेलें याचें अतिशय जिव्हाळ्यानें वर्णन केलें आहे. इंग्लंडमधील शिक्षण, हिंदुस्थानांतील महायुद्धकालीन राजकारण, अमृतसरचा सत्याग्रह, महात्मा गांधींचा असहकारवाद, तुरुंगवास, युरोपांतील परिभ्रमण, कामगार चळवळ, स्वातंत्र्यवाद, सत्याग्रह आणि कायदेभंग यांच्या मोहिमा, शेतकऱ्यांचे प्रश्न, गांधीवाद आणि समाजसत्तावाद, जातीय भांडणें, अहिंसा आणि अडवणूक इत्यादि अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा; मोतीलाल नेहरू, देशबंधू दास, महंमदअली, मालवीय, सप्रू, शास्त्री इत्यादि पुढाऱ्यांचीं मार्मिक शब्दचित्रें; महात्मा गांधी यांच्याशीं वेळोवेळीं राजकीय बाबतींत झालेला मतभेद; प्रतियोगी, जातिवादी इत्यादि पक्षांच्या कार्याची सूक्ष्म तपासणी; कौटुंबिक सुखदुःखाचे प्रसंग आणि मानसिक क्षोभामुळें उत्पन्न झालेले विरोधी भावनातरंग यांचें हृदयवेधक वर्णन; या सर्व विशेषांमुळें हें आत्मवृत्त अतिशय रसाळ आणि उद्बोधक झालें आहे. नवीनच उत्पन्न झालेल्या समाजसत्तावादाची विचारपद्धति या ग्रंथाच्या वाचनानें सुलभतेनें समजेल. पृष्ठसंख्या ६२५; मूल्य ५ रुपये.

**केसरी** म्हणतोः "...... मूळचें आत्मचरित्र इंग्रजींत असून त्याचें मराठी रूपांतर श्री. नारायण गणेश गोरे यांनीं केलें आहे. हें रूपांतर इतक्या सफाईनें लिहिलें आहे कीं जणूं काय त्याची रचना प्रथमपासूनच मराठींत झाली आहे असा भास होतो.

इतरांनीं लिहिलेल्या चरित्रापेक्षां आत्मचरित्र वाचकाची उत्सुकता अतिशय वाढवितें. कारण असें कीं, त्यांत कोणाला माहीत नसलेल्या व लेखकाच्या अंतःकरणांतच खोल जाऊन बसलेल्या कथा व घडामोडी आपणांस वाचावयास मिळतील अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. प्रस्तुत आत्मचरित्र ती अपेक्षा तृप्त व्हावी असेंच आहे यांत शंका नाहीं. व तें भावनेच्या उबाऱ्यानें विशेषच फुललें आहे." ता. २३-२-३७

सुलभ-राष्ट्रीय-ग्रंथमाला, २९१ शनिवार, पुणें २.